# संतांचिया संगे

अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक

**संतांचिया संगे (संतवाङ्मय–चिकित्सा)**
**SANTANCHIYA SANGE (Sant Literature criticism)**

**लेखक**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
‘आई’, प्लॉट नं. ९, समर्थनगर, पाईपलाईन रोड,
श्रीराम चौक, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी (०२४१) २४२४१६७, मो. ९८८१५००९४२

**सर्व हक्क स्वाधीन – सौ. उषा सहस्रबुद्धे**

**प्रथम आवृत्ती २४ ऑगस्ट २०१४**

**प्रकाशक**

**मुद्रक**

**मुखपृष्ठ**

**मूल्य**



## सद्गुरूचरणी

# संवाद

भक्तियोगी संतांच्या साहित्याची, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यसौंदर्यात्मक, तात्त्विक अशा दृष्टीने समीक्षा करण्याचा प्रघात आहे. विविध सामाजिक, वैचारिक व्यूव्हांच्या दृष्टीने संतसाहित्याची चिकित्सा करण्याचा मोह समीक्षकांना होतो. प्रसंगी प्राश्चात्य विचारवंतांच्या वैचारिक व्यूव्हाच्या दृष्टीने ओढूनताणून, आग्रही स्वरूपात, क्वचित विवेकाने, तुलनात्मक अभ्यास स्वरूपात चिकित्सा करून; संतांच्या साहित्यातील उल्लेखांचा किंवा वर्णनांचा निष्कर्ष काढला जातो. अनेकदा सांस्कृतिक चर्चा करताना ऐतिहासिकता आणि सांस्कृतिक ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा विचार वर्तमानाच्या संदर्भाने करीत; साभिनिवेश चर्चा घडते. साम्यवाद, समाजवाद, स्त्रीवाद, परिवर्तनवाद या भूमिकांच्या आग्रहीपणासह चर्चा झालेली आढळते. खरेतर संतसाहित्याची चर्चा ज्याला जशी हवी तशी करण्यास कोणाची हरकत असण्याचे काही कारण नाही. सांप्रदायिक अनुयायी संप्रदाय अभिनिवेशाने काही आग्रही चर्चा करतात. प्रसंगी दोन्ही प्रकारच्या आग्रहाचा परिणाम राजकीय किंवा सामाजिक विद्वेष वाढवण्याएवढा असतो. संतांचे वाङ्मयीन आणि चरित्रात्मक विभूतिमत्व परमहंस स्वरूपाचे असते.



या सर्व गोष्टींपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संतसाहित्याचा पाया अध्यात्म हा आहे. अध्यात्म या केवल 'सत्या'पुढे सारेच पाखांड असते. त्या साऱ्याच पाखांडातून बाहेर पडण्याचा, पाडण्याचा प्रयत्न संत आपल्या प्रबोधक वचनातून करीत असतात. मात्र त्यांचे सर्वच पाखांडखंडन, चर्चा, प्रबोधन हे अध्यात्मलक्ष्यी असते हे सतत लक्षात ठेवून; अध्यात्मलक्ष्यी पद्धतीने संतसाहित्याची चर्चा करणेच श्रेयस्कर ठरते. आपल्याला हवा तसा; त्यापेक्षा संतांना त्या त्या सांस्कृतिक पर्यावरणातील प्रचलित सांस्कृतिक, व्यावहारिक, भाषिक, राजकीय स्थिगीतगीसह प्राप्त भाषिक उपयोजनांचा अर्थ, अध्यात्मलक्ष्यी पद्धतीने समजून घेतला व त्या साहित्याची, प्रयोगनिष्ठ, आशयनिष्ठ, शैलीनिष्ठ आणि आकृतिनिष्ठ समीक्षा घडली तर संत साहित्याला न्याय मिळेल.

भक्तियोग, नवविधाभक्ती आणि या मार्गाने सामूहिक स्तरावर आत्मोद्धार आणि लोकोद्धार करण्याचा संतांचा खटाटोप असतो. सर्वांना अध्यात्मानुभूती घडावी, संसार क्रीडा वाटावी, निरासक्त मनाने कर्तव्यतत्परतेने कर्म आणि पुरुषार्थ घडावा असा संतांचा, 'लाभावीण प्रित कळवळा असतो' हे सतत ध्यानात ठेवून श्रद्धेने 'संतांचिया संगे' असावे एवढेच! 'संतांचिया संगे' हे अष्टदल कमलपुष्प याच भावनेने सद्‌गुरूचरणी सादर.

**– अनिल सहस्रबुद्धे**

* * *

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | सनातनाची वहिवाट | ७ |
| २) | ब्रह्मविद्याप्राप्तीचा परिपूर्ण योगमार्ग : भक्तियोग | १५ |
| ३) | सद्‌गुरूनाथे धरिले हाता । धर्मभूमी केले ओजा ।। | ३१ |
| ४) | भक्तियोगाचा 'समर्थ' विनियोग | ५१ |
| ५) | माऊलींचा भक्तियोग | ७७ |
| ६) | श्री ज्ञानेश्वरीतील दृष्टांताची मात | ९० |
| ७) | संत साहित्य आणि पाखांडखंडन | १०८ |
| ८) | मनावरी स्वार व्हावे । अवघे आत्मस्वरूप व्हावे | ११५ |




# सनातनाची ही वहिवाट

अक्षर, अविनाशी, केवल, निर्गुण, निराकार आणि निर्विकार; अशा परब्रह्माला अहंकार उद्‌भवला आणि ह्यातून विश्वविकारित झाले. ते त्याच परब्रह्मतत्त्वाने स्वसंवेद्य आणि अहंकाराने पृथक भासमान झाले. तेव्हापासून विश्वाचे भासमान अस्तित्व अहंकारभावाने महत्‌तत्त्व, प्रकृति या स्वरूपात अथवा चिद्‌विलास किंवा माया स्वरूपात; संचारचक्रमान झाले. असे होऊनही त्या परब्रह्मस्वरूपाचा बीज वेध या अहंकाराने द्वैतरूपात आलेल्या विश्वालाही अनावरच आहे! या विरहार्ततेने हे विश्व स्वसंवेद्य संचारचक्रमान असूनही; सतत उर्ध्व झेपावते आहे. त्या परब्रह्म स्वरूपाविषयीचे अनावर प्रेम विश्वाठायी भरून आहे. हे विश्वाचे उर्ध्वमूलत्व विश्वमानसात, ब्रह्मासक्ति अर्थात भावासक्ति, भक्ति अथवा कृष्णस्वरूपात अद्वैत असलेली राधावृत्ती विग्रहित होऊन; पुन्हा अद्वैत होण्यासाठी नित्य आतूर आहे. ही परब्रह्मस्वरूपासक्ति, प्रेमरूपा, आविष्कृत स्वसंचारमान विश्वातून, निःसंगपणाने परब्रह्माकडे झेपावत आहे. हे परब्रह्म 'ॐ' या स्वसंवेद्य शब्दब्रह्मात आविष्कृत झाल्यापासून; मानवाने तर ॐकाराच्या वैविध्यपूर्ण शब्दब्रह्मविश्वविस्तारातून, त्या परब्रह्माचा इंद्रियांधारे, मनाच्या योगाने वेध घेऊन; ब्रह्मस्वरूप होण्याचा चंगच बांधला. ही मानवाच्याच नव्हे तर विश्वाच्याच मनातील पुनः स्वस्वरूप होण्याची ही भावासक्ति अर्थात भक्ति अशी परब्रह्मस्वरूपा,

सच्चिदानंदस्वरूपा, प्रेमस्वरूपा आहे. अगदी आरंभबिंदूपासून सनातनपणे; या शब्दब्रह्मातून आत्मज्ञान मुखरित झाले आणि भक्तियोगे पुन्हा परब्रह्मस्वरूप झाले. अशी निर्मितीच्या आरंभबिंदूपासूनची भक्तियोगाची ही सनातन वहिवाट होय. त्रिदेवांनी आणि शब्दब्रह्माने अवघी लीला याचसाठी मांडली. ही परब्रह्मक्रीडा, प्रेमक्रीडा हा त्या 'परब्रह्म' अस्तित्वाचा स्वभाव आहे. त्याशी 'अद्वैत' म्हणजे परमानंद! त्या परमानंदाची अनुभूती घेण्याची अवस्था म्हणजे भक्ताची भक्तिसाधना किंवा भक्तियोग होय. हा सनातन शिव-शिवा शांभवी योग, राधाकृष्ण योग होय. हाच भक्तियोग.

१. 'श्रीमद्भागवत' ग्रंथातील श्रीमद्भागवत महात्म्य विभागात नारद आणि भक्ती यांच्या भेटीची रम्य आणि उद्बोधक कथा येते -

पृथ्वी हाच सर्वोत्तम लोक होय. हे लक्षात घेऊन; श्री नारद पृथ्वीपर्यटनासाठी आले. सत्य, त्रैता, द्वापार युगे ओलांडून चौकडीचा प्रवास कलियुगात सुरू होता. पर्यटन करता करता श्री नारद; भगवंत लीला स्मरणांनी संपन्न अशा यमुनातटी आले. तेथे त्यांना एक आश्चर्यकारक दृश्य दिसते. एक सुंदर तरुणी, जवळ निपचित पडलेल्या दोन वृद्ध पुरुषांची वात्सल्यपूर्वक सेवा करून; त्यांना जागविण्याचा प्रयत्न करीत होती. भोवती सुंदर दासी होत्या. ती आपल्या रक्षणकर्त्याची आर्ततेने वाट पाहात होती. नारदांनी जवळ जाऊन; कुतुहलाने तिची विचारपूस केली. तेव्हा ती तरुणी म्हणाली, ''माझे नाव भक्ती आहे. हे दोन वृद्ध माझे पुत्र, 'ज्ञान' आणि 'वैराग्य' हे आहेत आणि भोवती असलेल्या ह्या दासी गंगादि नद्या आहेत. मी द्रवीद देशाची कन्या असून, कर्नातटकात वाढले, महाराष्ट्रातही माझा सन्मान झाला परंतु गुजराथमध्ये मला वृद्धापकाळाने घेरले. कलीप्रभावाने दुर्जनांनी मला छिन्नविच्छिन्न केले. मी तेथून वृंदावनात, यमुनातटी आले आणि येथे मला नवजीवन मिळाले. मी उत्तम, तेजस्वी सौंदर्यवती झाले. परंतु माझे पुत्र थकले भागलेलेच



आहेत. त्यांच्या रक्षणासाठी मी अन्यस्थानी जाऊ इच्छिते. आम्ही नेहमीच एकत्र राहतो; तरी असे विपरीत का घडावे? कृपया मला याचे कारण सांगून माझे रक्षण करा. आपण परमश्रेष्ठ नारदमुनी आहात, आपणच माझे रक्षण करू शकाल.'' भक्तीचे हे बोलणे ऐकून; नारद प्रसन्न झाले. त्यांनी ठायीच्या ज्ञानदृष्टीने भक्तीचे संपूर्ण दुःख जाणले आणि तिला अभय देऊन; नारद म्हणाले, ''हे दारुण कलियुग असल्याने आता सदाचार, योगसाधून, तप ही लुप्त झाली आहेत. यात धैर्यवानच ज्ञाना समजावा. या कारणाने पुत्रांसह तुझे दर्शनही विषयांध झालेल्या लोकांना घडत नाही. सत्य, त्रेता, द्वापार या तीन युगात ज्ञान आणि वैराग्य ही मुक्तीची साधने होती; परंतु कलियुगात केवळ भक्ती मोक्षप्राप्ती करून देणारी आहे. हे बघ, श्रीहरींनी स्वतःच्या 'तू' सत्स्वरूपापासून तुझी निर्मिती केली आहे. तू श्रीकृष्णांना प्रिय अशी श्रेष्ठ सुंदरी आहेस. मी काय करावे, हा तुझा प्रश्न ऐकून; श्रीकृष्णांनी तुला त्यांच्या भक्तांचे पोषण कर; अशी आज्ञा केली. ती स्वीकारून तू सेवारत झाल्याने; प्रसन्न झालेल्या श्रीकृष्णांनी, मुक्तीला दासीच्या रूपात आणि ज्ञान आणि वैराग्य या पुत्रांना तुझ्या स्वाधीन केले. तुझ्या मूळ रूपानेच तू वैकुंठामध्ये भक्तांचे पोषण करतेस; तर पृथ्वीवर भक्तांचे पोषण करण्यासाठी तू केवळ सावलीच्या रूपात राहिली आहेस. तू मुक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांसह पृथ्वीतलावर आलीस आणि सत्ययुग ते द्वापारयुगापर्यंत आनंदाने राहिलीस. कलियुगात मुक्तीला नास्तिकतेचा रोग जडला. ती ग्रस्त झाली. क्षीण झाली. ती तुझ्याच आज्ञेने पुन्हा वैकुंठात गेली. ज्ञान आणि वैराग्य यांना पुत्र मानून तू आपल्या जवळ ठेवलेस. ते कलियुगामुळे असे पूर्ण निरुत्साही झाले आहेत. परंतु, तू चिंता करू नकोस; मी घराघरात, मनामनात, तुझी स्थापना करून; कलिप्रभावाला पराभूत करीन आणि तुझ्या दोन्ही पुत्रांना पुन्हा चैतन्यमय करीन. पूर्वसंचिताने तू प्रेमस्वरूप होऊन मनात प्रकटलीस की ज्ञान आणि वैराग्य पुन्हा तुझ्याच प्रेमशक्तीने चैतन्यमय होतील. हा

माझा आशीर्वाद आहे. हे भक्ति मी ब्रह्ममानसपुत्र नारद याच कार्यासाठी पृथ्वीवर आलो आहे.'' एव्हढे भक्तीला आश्वासित करून; नारदांनी 'ज्ञान' आणि 'वैराग्य' यांच्या कानाजवळ वेदघोष, वेदान्तघोष आणि वारंवार गीतापठण करून त्यांना जागविले. तरीदेखील ते मृतप्राय असल्याचे पाहून नारदांना चिंता वाटली. नारद भगवद्चिंतन करू लागले आणि तेव्हढ्यात आकाशवाणी झाली, ''मुनिवर्य, खेद करू नका. तुमचे प्रयत्न निश्चितच सफल होतील. देवर्षी, यासाटी तुम्ही एक सत्कर्म करा. ते कोणते; ते तुम्हाला संतशिरोमणी सांगतील. त्या सत्कर्माचे अनुष्ठान करताच ज्ञान आणि वैराग्य यांची निश्चेतना मावळून; ते सर्वदूर भक्तीचा प्रसार करू लागतील.'' आकाशवाणी ऐकून त्यांनी संतशिरोमणींचा शोद सुरू केला व अखेर घोर तपश्चर्या करण्याचे ठरविले. ते बद्रिकाश्रमी आले. तेव्हा त्यांना पाच वर्षाचा बालक स्वरूपातील ब्रह्मपुत्र सनक, सनंदन, सनत, सनातन हे संतशिरोमणी भेटले आणि त्यांनी 'श्रीमद्भागवत कथा अनुष्ठान' हा गुह्य उपाय सांगितला. सनकादिकांना प्रेमपूर्वक बरोबर घेऊन गंगातटी आले. तेथे श्रीमद्भगवद् कथानुष्ठानचा निश्चय करून, तेथेच भक्ति आणि तिचे पुत्र 'ज्ञान' आणि 'वैराग्य' यांना नारदांनी आणले. तेथे सनकादिकांच्या मुखाने 'भागवत कथानुष्ठान' करविले. ही कथा ऐकण्यास सर्व ऋषीमुनी, श्रृतीस्मृती, उपनिषदे, पुराणे मूर्त होऊन उपस्थित होती. तेथे तारुण्यावस्था प्राप्त झालेल्या आपल्या 'ज्ञान' आणि 'वैराग्य' या पुत्रांना घेऊन; उल्हसित झालेली भक्ति, सनकादिकांच्या पुढ्यात, श्री नारदकृपेने उभी राहिली. तेव्हां सनकादिकांनी भक्तीला तिचा परिचय सांगितली. ते म्हणाले, ''भागवत कथेच्या अर्थातूनच तू प्रकट झाली आहेस, आता तू भक्तांना भगवतस्वरूप देणारी, त्यांचे अनन्य प्रेम संपादणारी आणि भवरोग नाहीसा करणारी आहेस. तू धैर्यपूर्वक विष्णूभक्तांच्या ह्दयांत निरंतर वास कर. तुझ्या वास्तव्यातूनच ज्ञान आणि वैराग्य चिरतरुण होऊन; तुझे अनुसरण करतील.'' सनकादिकांचे



हे आशीर्वाद ग्रहण करून; नारद, भक्ती, ज्ञान व वैराग्य प्रसन्न झाले. तेव्हा मुक्ती आपसूकच प्रकटली. नारदांच्या प्रेरणेने भक्तीचा वैष्णवांच्या मनातील प्रवास असा नित्य झाला.

२. श्रीमद्भागवतातील ही महात्म्य कथा अद्भूतरम्य वाटली तरी; सनातन योगमार्गांच्या दृष्टीने सूचक आणि विश्लेषक आहे. सनकादिकांच्या मुखातून भक्तियोगाची एक प्रकारे प्रतिस्तापना करून; नारदांनी सर्व ऋषीमुनी, योगी, सिद्ध, साधू यांनी अनुसरला अतिकठीण असा समाधीयोग, अर्थात ध्यानयोग, सिद्धसाधूंचा राजयोग, हटयोग आदींबरोबरच जप, तप इ. गोष्टी भक्तियोगात समाविष्ट करून; समूहनिष्ठेने योगसादना करण्याचा; लौकिकप्रिय मार्ग 'भक्तियोग' स्वरूपात प्रशस्त केला. सनकादिक संतस्वरूप अथवा परमहंस असलेल्यांनी हा मार्ग सिद्ध करून प्रामुख्याने वैष्णवांना अनुसरण्याचा मार्ग म्हणून घोषित केला. वैष्णवांना अर्थात लोकधारणातत्त्वानुसार, लोकी, लौकिकतः जगणाऱ्यांना हा मार्ग सुलभ स्वरूपात प्रसृत केला. भक्तीने ज्ञानप्राप्ती, ज्ञानाने वैराग्यप्राप्ती आणि वैराग्यपूर्वक लोकांप्रती प्रेमभावपूर्वक लौकिकास अनुकूल अशी सारणी, 'भक्तियोग'रूपाने अस्तित्ताव आली.

३. भगवद्गीतेतील श्रीकृष्ण मुखातून सर्व प्रकारच्या योगमार्गांची झालेली चर्चा यामुळेच भक्तियोगात समाविष्ट होऊ शकली, श्रीमद्भगवत्गीता आणि पुराणांचे संदर्भ भक्तीशी जोडले गेले आणि सगुण प्रेमरूपा भक्तीची स्थापना झाली. भगवद्गीता हे वेदउपनिषदांचे सारभूत असल्याने सनातन तत्त्वज्ञानाच्या भक्कम पायावर 'भक्तियोग' सिद्ध झाला. एव्हढेच नव्हे तर; भक्तीच्या अनन्यभाव अपेक्षेमुळे, मनोनिग्रह, मनसंयम, मनएकाग्रता, वासनारहितता याविषयीचा भक्तिपूर्ण अभ्यास, लोकव्यवहारात राहून; घडण्याची प्रक्रिया घडली. मुळातच कीर्तन

परंपरांचा, नामभक्तीचा पाया घालणाऱ्या श्रीमन् नारदमुनींनी नवविधा आणि एकादश आसक्ति रूपाचे सूत्रबद्ध अधिष्ठान भक्तिमार्गाला प्राप्त करून देऊन; सामान्यातील सामान्य माणसाला अध्यात्मज्ञानापर्यंत जोडले. वैराग्य – ज्ञान – आणि मुक्ती अशा प्रवासाला भक्ति – ज्ञान – वैराग्य – भक्तियुक्त वैराग्यपूर्ण लोकधारणेतील वर्तन म्हणजेच खरी मुक्ती असा अर्थ प्राप्त होऊन; लौकिक पारलौकिकाचा श्रेष्ठ अनुबंध प्रस्थापित झाला. कीर्तनपरंपरेने प्रसारित झालेल्या नारदभक्तीसूत्रांमुळे विविध संप्रदायावर सगुण भक्तीमार्गाचा प्रभाव जाणवू लागला.

४. नारदांनी गुणमहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति, दासासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयतासक्ति, परमविरहासक्ति अशा अकरा प्रकारच्या आसक्तींना सगुण भक्तीच्या प्रेमरूपात जोडून; लौकिकाचा पारलौकिकाशी थेट संबंध जोडला. लोकव्यवहारानुकूल अशी ही अध्यात्मसाधना सुरू झाल्याने, तंत्र, जप, मंत्र, विधी आदींना भक्तीचे परिमाण लाभले. सर्व संप्रदायांमध्ये– श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वन्दन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन असे नवविध भक्ति शासन सुरू झाले. नारद भक्तिसूत्रे म्हणजे शंकरांनी केलेला हा उपदेश सर्वांच्या कल्याणासाठीचे 'शिवानुशासन' आहे असे मान्य झाले आणि कळतनकळत सर्व संप्रदाय त्यांच्या त्यांच्या उपास्यासाठी भक्तिमार्गे जाऊ लागले. 'सर्व देवं नमस्कृत्यं केशवं प्रति गच्छति' ही वैष्णवांची उदार भावना, सर्वसमावेशक असल्याने, नारदीय परंपरा सर्वांनाच रूचली.

५. नाथसंप्रदायाने संपूर्णतः समाधीयोगमार्ग अवलंबिलेला असूनही मुख्यतः गुरूगोरक्षनाथांनी तंत्रात्मक मार्गांचा निषेध करून; त्यांचे उन्नयन करून योगमार्ग श्रेष्ठ असल्याचे म्हटले. एक प्रकारे मनाच्या एकाग्रतेने



आणि निग्रहाने समाधीपर्यंत जाऊन सच्चिदानंदपदी स्वस्वरूप होता येते; मात्र त्यासाठी सर्वसंगपरित्यागपूर्वक सद्गुरू 'आदेशा'ने विजनवासात जावे लागते. हे लोकजीवनातील व्यवहारपालन करणाऱ्यांना शक्य नाही. त्यासाठी ब्रह्मचर्य आणि संन्यास मार्ग स्वीकारावे लागतात. ऋषीपदाला पोचलेल्या सिद्ध साधू विभूतींनी प्रपंच, गुरूकुल स्थापन करून; ज्ञान आणि वैराग्यपूर्वक साधनेने श्रृती, स्मृती, उपनिषदे, दर्शने आदि ज्ञान मंडित केले. आत्मसुख प्राप्त करतांना इहजीवनातील संघर्षाला अध्यात्माचे नैतिक अधिष्ठान दिले. हे लक्षात घेऊन; नाथपरंपरेतील निवृत्तीनाथांनी ज्ञाननाथांना भगवद्गीतेच्या आधारे कृष्णभक्तीचा नारदीय मार्ग स्वीकारण्याचा आदेश दिला आणि एकप्रकारे नाथांचा योगमार्ग भक्तियोगात मिसळून गेला. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी भागवत संप्रदायाचा समकालीन नारदीय परंपरेतील नामदेवांसारख्यांना बरोबर घेऊन; भक्कम पाया घातला. भक्तिमार्गाला वर्तमानात; या समृद्ध सनातन परंपरेमुळे आणि सुलभीकरणामुळे सन्मानाचे स्थान मिळाले. सत्संग म्हणजे भक्तियोगमार्गाचे अनुसरण असे जणू समीकरणच झाले. या संतपरंपरेतील श्री संत तुकाराम महाराजांपर्यंतच नव्हे तर उत्तरकालीन अनुयायी परंपरेने, विठ्ठलभक्तियोगे सर्व सिद्धींचे परिमाण दिले. रामदासांनी काहीसा पर्याय निवडला असला; तरी साधना मार्ग तोच निवडून; जणू नारदीय परंपरा मार्गच स्वीकारला. महाराष्ट्रात भागवत संप्रदाय अर्थात वारकरी संप्रदाय अर्थात पांडुरंग भक्ति संप्रदाय; वर्धिष्णुपणाने प्रचलित झाला.

सनातनातून, 'सच्चिदानंदस्वरूप' याचि देही याची डोळा भोगण्याचा हा अद्वैत अनुभूती लौकिकात घडवून; ज्ञान आणि वैराग्ययुक्ततेने, निष्कामकर्म स्वरूपात लोकसेवात्मक धर्मपालनाचा हा मार्ग; स्वतःबरोबर सर्वांना आनंदसागरात समरस करविणारा ठरला. भक्तियोगातून ज्ञान आणि वैराग्यपूर्णतेने परब्रह्मस्वरूप होऊन सम दृष्टीने चराचराला स्वतःत पाहून; चराचरात सामावून, निखळपणे आनंद भोगण्याचा हा मार्ग,

अद्वैताची सर्व कवाडे लौकिकात उघडविणारा ठरला. प्रसन्नमनाने पांडुरंगाचे स्मरण झाले की सोलीवसुखाचा अनुभव देहीच विदेही होऊन भोगावयाचा; असा हा प्रेमरंग चराचराला स्वात्मभावाने चिंब करणारा! संतांचा हा सनातनातून वहिवाटीत आलेला शाश्वत मार्ग! सर्वकल्याणात्मक, आनंदात्मक भाववृत्तीने जीवन सफल करण्यासाठी जावे संतांचिया संगे! अवीट अनुभूती भोगण्यासाठी!

* * *



# ब्रह्मविद्याप्राप्तीचा परिपूर्ण योगमार्ग : भक्तियोग

*अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीअष्टादशाध्यायिनी ।*
*मम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।*
*सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।*
*पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।*

अद्वैतामृताचा वर्षाव करणारी, सर्व उपनिषदांचे सारभूत असलेली श्रीमद्‌भगवद्‌गीता श्री संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेतून, श्री ज्ञानेश्वरी रूपाने, बोली भाषेत प्रगट झाली आणि भागवत संप्रदायाने श्री ज्ञानेश्वरांना आणि श्री ज्ञानेश्वरीलाही माऊलीपण बहाल केले. जनताजनार्दन 'माऊली' झाला. सद्‌गुरू आणि शिष्य, वक्ता आणि श्रोता, ज्ञान आणि ज्ञानसाधक अद्वैत झाले. सच्चिदानंदघनवर्षाव अवघ्या विश्वावर झाला. ज्ञानियांचा राजा, जगद्‌गुरू श्रीकृष्ण, आदिनाथसद्‌गुरू, समर्थ, श्री ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयमूर्तीतून अनुभूत झाले. श्री ज्ञानेश्वरांनी अमृतानुभावात म्हटल्याप्रमाणे –

*आता उपायवनवसंतु । जे आज्ञेचा आहेवतंतु ।*
*अमूर्तीचि परि मुर्तु । कारुण्याचा ।।१।।*
*अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ।*
*तया चैतन्याच्या द्यावे । धावेकारू जो ।।२।।*

(सद्‌गुरूवंदनम् – अनुभवामृत)

सद्गुरू माऊली श्री ज्ञानेश्वरांच्या रूपाने, प्रकाशमय असे सर्वज्ञतेचें महाद्वार समोर दिसू लागले. याच अनुभवाने श्री ज्ञानेश्वरांच्या समकालीन आणि उत्तरकालीन; भागवत परंपरेने श्री ज्ञानेश्वर माऊलींना आणि त्यांच्या गुरूपरंपरेला शिरोधार्य असलेले; तत्त्वज्ञान प्रमाण मानले. भागवत संप्रदायातील संत परंपरेने 'वेद', 'उपनिषदे', 'षटदर्शने', रामायण, महाभारत, पुराणे आणि श्रीमद्‌भगवद्‌गीता प्रमाणपूर्वक स्वीकारले आहे यासाठी त्यांचे वाङ्मय हेच श्रेष्ठ प्रमाण होय.

१. भागवत परंपरेने श्रीकृष्णभक्ती, अर्थात महाराष्ट्रात श्री विठ्ठलभक्ति अनन्यपणे अनुसरली आहे. त्यासाठी श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील भक्तियोग, श्रीमद्‌भागवत ग्रंथराज आणि श्री नारद भक्तिसूत्रे व त्यातील नवविधा भक्ति यांचा अंगीकार केला आहे. महाराष्ट्रातील सकलसंतांचे वाङ्मय भक्तीने ओतप्रोत आहे हे खरे. या सर्व संतांनी केवळ स्वसुखासाठी किंवा आत्मोद्धारासाठी भक्तिसाधना केली असे म्हणणे मात्र सर्वथा चूक ठरेल. प्रापंचिकांना संसारसाधनेशी साम्य राखणारी नवविधा भक्ति अनुसरतांना; त्यांनी 'अद्वैतानुभूती' हे लक्ष्य कधीही ढळू दिले नाही. याचे स्पष्ट प्रमाण, 'सगुणनिर्गुण एक गोविंदु रे' या उक्तीत आहे. याचा सरळ अर्थ, भागवद् संतांनी परमार्थ साधन परंपरेचा एक अधिक विकसित असा, लौकिकात अलौकिकाची अनुभूती घडवू शकणारा, नाथ. सिद्ध, समर्थ, तंत्र आदि मार्गांपेक्षा वेगळा आणि विकसित सर्वसमावेशक असा भक्तिमार्ग वहिवाटीत आणला, असे म्हणता येते. भगवद्‌गीतेतील ब्रह्मविद्यामार्गांच्या, अर्थात योगमार्गांच्या व्यापक समन्वयासह, समावेशात्मक, सामरस्यातून हा मार्ग प्रशस्त झाला आहे असे म्हणता येते–

२. सद्गुरू श्री गोरक्षनाथांच्या 'पिण्ड–संवित्ती'चा अनुसार भक्तिसंप्रदायात श्री ज्ञानेश्वर कसा करतात हे पाहण्यासारखे आहे. सर्व साधना मार्गांचा सामरस्यपूर्वक समावेश, भक्तियोगात कसा साधला आहे हे यांतून स्पष्ट होईल. भगवद्‌गीतेच्या अठराव्या अध्यायातील, ११३३



व्या ओवीत श्री ज्ञानेश्वर म्हणतात –

*ज्ञानी इयेतें स्वसंवित्ति । शैव म्हणती शक्ती ।*
*आम्ही परमभक्ती । आपुली म्हणों ।।*

३. भागवत संप्रदायाच्या दृष्टीने भक्तिमार्गाचा स्वीकार श्री संत ज्ञानेश्वरांसह त्यांची भावंडे, श्री संत नामदेव आणि प्रभावळीतील संत, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, श्री संत चोखा, सोराबाई, बंका, कर्मेळा, निर्मळा आणि त्यांचे आप्त, तसेच श्री संत गोरा, सेना, नरहरी, सांवता असे अनेक, यांनी केला. अर्थातच भक्तिमार्ग स्वीकाराबरोबरच, नारदीय भक्तिसूत्रांतील सगुण भक्तीची कल्पना, नवविधा भक्ति यांचा स्वीकार मनाने आणि तनानेही केला. या नवविधा भक्तीप्रमाणे –

*श्रवणं कीर्तनं विष्णो । स्मरणं पादसेवनम् ।*
*अर्चनं वंदनं दास्यं । सख्यमात्मनिवेदनम् ।।*

या सूत्राप्रमाणे नारदीय भक्तिसूत्रातील – गुणमहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति, दासासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयतासक्ति, परमविरहासक्ति, एकधाप्येकादशधा भवति ।।८२–भक्तिसूत्रे।। अशी अकरा प्रकारे आसक्ति प्रकटीकरणाचा मार्ग स्वीकारला गेला. संसारामधील, कौटुंबिक संबंधांना जवळचा असा हा मार्ग आहे. त्याचबरोबर सामूहिक, विधिनायट्यात्मक प्रकटीकरण आणि व्यक्तिगत पातळीवरील विधिनाट्यात्मक प्रकटीकरण यांत सहज साध्य होते. त्यामुळे स्वाभाविकपणे नारदीय कीर्तन, प्रवचन, भजन परंपरांबरोबरच, पूजापाठ, अर्चन, नैवेद्य, तांबूल इ. सह सर्व संस्कार, सगुणोपासनेत आपोआप समाविष्ट झाले. भूपाळीपासून शेजारतीपर्यंतची सगुणोपासना या मार्गाने होऊ लागली. केवळ मानसिक एकाग्रतेने जे योगिक मार्गाने साध्य होणार ते, नित्याच्या सांसारिक वर्तन पद्धतीतून साध्य होऊ शकेल, अशा शक्यता वाटू लागली. या नवविधा भक्तीमध्ये, समोर सगुण असे उपास्य असल्यामुळे त्यांशी निदान सहज

हालचाल, हावभाव, वर्तन, साधन यांतून संपर्क सुरू झाला. हे प्रत्यक्ष करीत असतांना किमान मानसिक एकाग्रतेची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे लोक एकवटला, समूह पातळीवर भक्तिभाव प्रकट होत राहिला. अर्थात प्रापंचिकांना प्रिय आदरणीय, श्रद्धेय, पूजनीय सगुण स्वरूपाची, प्रेम सेवा करणे सुलभ झाले. संतांनी या उपासनेला, भक्तिसाधनेला, कीर्तन, प्रवचन, निरुपण, अर्चन, भजन इ. मधून बळ दिले. समुदायासह आत्मप्रकटीकरण करतांना, प्रकटणाऱ्या वाङ्मयाला श्री संत ज्ञानेश्वरांनी निश्चित दिशा, मर्यादा आणि भावात्मकता दिली –

*वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवे रसिकत्व ।*
*रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ।।*

(ज्ञा. १८ ओ. ३४७)

वाङ्मयाची युगशैलीच, अशी भक्तिमार्गपूरकतेने प्रसृत झाली. श्री संत नामदेवांनी 'शतकोटी तुझे करीन अभंग' ही प्रतिज्ञा याच प्रेरणेतून केली. श्री ज्ञानेश्वर नामदेवांच्या प्रभावळीतील सारे स्त्रीपुरुष कीर्तन, भजन, दिंडीतील नर्तन गायन यासह काकडा, पूजा, आरती, सारे काही करण्यात उद्गारासह उभारून सरसावले. 'दुमदुमली पंढरी' असे याचे वर्णन करता येईल. अवघा संसारी, गृहस्थाश्रमी समाज यात दंग झाला. किमान परतत्त्वाचा आठव आणि त्यामुळे नीतीमत्तेची चाड, यामुळे दैवीगुणसंपत्ती मनात जागविण्यास मदत झाली हे खरे. या समावेशक मार्गाला पुरुषार्थासह प्रेममयतेचे, सच्चिदानंद प्राप्तीचे लक्ष्य देण्याचे महत्त्वाचे कार्य या भक्तिमार्गात अपेक्षित होते हे लक्षात घ्यावयास हवे. श्री ज्ञानदेव नामदेवांनंतर श्री संत एकनाथ, श्री संत शेखमहंमद आणि अखेर भक्तिमार्गाचा कळस करणारे तुकोबाराय आणि या संतांची प्रभावळ, शिष्य आणि याबरोबरच आख्यानकवींनीही, या भक्तिमार्गाने आपली वाङ्मयसेवा उभारली. शाहिरांनीही त्यात भर घातली. शाक्त, शैव, गाणपत्य, रामदासी हे सर्वच थोड्याफार फरकाने भक्तिसंप्रदायाच्या जवळ



आले. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।' हे सूत्रच जणू नामदेवांनी आणि नंतर नाथांनी या संप्रदायात दृढ केले. भागवत भक्तिसंप्रदाय, एक जीवन सारणीच्या स्वरूपात, महाराष्ट्रात रुजण्यास या सर्व संतांच्या, वाङ्मयाचा आणि मार्गातील सादरीकरणात्मकतेचा उपयोग झाला. श्री संत एकनाथ आणि अन्य आख्यानकवींनी पुराणे, महाभारत कथा याबरोबर रामायण या महाकाव्याचा सरसहा उपयोग केला. त्यामुळे 'राम, कृष्ण, हरी' हा एक प्रकारे मंत्र उमटला. श्री समर्थ रामदासांनी तर रामोपासना हा भक्तहनुमानाच्या आदर्शातून पर्यायी उपास्य भक्तिमार्गात उभे केले. महानुभाव काहीसे वेगळे, संन्यास मार्गी आहेत; तरी श्रीकृष्ण भक्तीचा, सगुणोपासनेचा अंगीकार महानुभावीय महात्म्यांनी केला. भारतात बाहेरून आलेल्या सुफी संप्रदायाला; भक्तिमार्ग हा, प्रेमपुरस्कार मार्ग असल्याने, जवळचा वाटला. सुफीसंतही या मेळाव्यात सामील झाले. श्री ज्ञानेश्वरांपासून तुकाराम महाराजांपर्यंत आणि उत्तर काळातही भक्तिसंप्रदायाचे प्रमाण वाढतेच राहिले आहे.

श्री संत ज्ञानेश्वरांनी पांडुरंगाचे रूप लोकांसमोर मांडून अद्वैत तत्त्वज्ञान आणि द्वैतपूर्वक उपासना यांचा संगम घडविला ज्ञानेश्वरांनी –

*'तुज सगुण म्हणो की निर्गुण रे ।*
*सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।।*

असे म्हणून योगमार्गाकडून हळूवारपणे भक्तिमार्गाकडे स्वतःबरोबर सर्वांना ओढून नेले आणि

*रूप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी ।।१।।*
*तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।२।।*

असे म्हणून श्री नामदेवांच्या नारदीय परंपरेला बळ दिले. श्री संत नामदेवांनी –

*भक्तीवीण मोक्ष नाही हा सिद्धान्त ।*
*वेद बोले हात उभारोनि ।।१।।*

*तरी तेंचि ज्ञान जाणत्या लागुनि ।*
*संता बोळगोनि वश्यकिजे ।।२।।*
*प्रपंच हा खोटा शास्त्रे निवडिला ।*
*पाहिजे साक्षिला सद्गुरू तो ।।३।।*
*नामा म्हणे सेवा घडावी संतांची ।*
*घ्यावी कृपा त्याची तेचि ज्ञान ।।४।।*

असे कीर्तनातून स्पष्टपणे बजावीत श्री ज्ञानेश्वरांना आणि पूर्वपरंपरेला अपेक्षित आणि प्रचलित मार्गातील धारणा भक्तिमार्गात पुन्हा आणली. तेव्हढाच सगुण भक्तीचा प्रकर्ष करतांना –

*अमृताहुनि गोड नाम तुझे देवा । म*
*न माझे केशवा का बा ने घे ।।१।।*

म्हणत नामभक्ति जागविली.

संत एकनाथांनी श्री विठ्ठलभक्तीला श्री दत्त आणि श्री राम असे आणखी पर्याय देऊन विस्तार केला –

*दत्त माझी माता दत्त माझा पिता*
*बहिणी बंधू चुलता दत्त माझा ।।१।।*

नाथ महाराजांच्या बरोबरीने शेख महंमदांनी संताची भक्तीची वाट चोखाळली आणि भक्तिसंप्रदायात

*ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे ।।१।।*
*काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ।।२।।*
*फणसा अंगी काटे । आत अमृताचे साठे ।।३।।*
*नारळ वरुता कठीण । परी अंतरी जीवन ।।४।।*
*शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।५।।*

सगुण भक्तीबरोबरच भक्तिसंप्रदायाची समावेशकता अधोरेखित केली आहे.

संत मुक्ताबाईंनी सगुण भक्तीतून मुक्तीची साधना सिद्ध केली आहे.



त्या म्हणतात –

*माधव मुकुंद हरिनाम चित्ती ।*
*सर्वत्र पै मुक्ती नामपाठे ।।३।।*
*मुक्ताईचे धन हरिनाम उच्चार ।*
*अवघाचि संसार मुक्त केला ।।४।।*

संत जनाबाईंनी सगुणभक्तीचा परमोत्कर्ष संसारातील श्रमजीवनात साधला आहे –

*दळणाच्या मिशे । विठ्ठल सावकाशे ।।१।।*
*देहबुद्धीचे वैरण । द्वैत खडा रे निसून ।।२।।*
*एकलीच गावां । दुजा साद उमटता ।।३।।*
*कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ।।४।।*
*खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा ।।५।।*

श्री संत तुकाराम महाराजांनी

*'तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ।।'*
*असे म्हणून सगुण भक्तीचा कळस केला आहे.*

भक्तिमार्ग स्वीकारलेल्या या संतांनी ओवी, अभंग, पदे, गौळणी, रूपके, भूपाळ्या, भारुडे, आरत्या, भजने अशा कितीतरी सहजगम्य आणि समाजाला समाविष्ट करून; सादरीकरणातून गेयतेने अर्थात संगीतात्मकतेने प्रकट होऊ शकतील अशा रचना केल्या. स्वतः भक्तिरंगात रंगून गेले. लोकगंगेला भक्तिरंगात रंगवून टाकले. श्री संत ज्ञानेश्वरांपासून श्री तुकोबारायांपर्यंत भरून वाहत आलेल्या भक्तिगंगेचे उद्गाते आणि प्रवाहही; हे संतपदाला पोचलेले भागवत होते. भक्तिरंगात ऐहिकता विरघळून टाकणाऱ्या या संताचे लक्ष्य होते 'अद्वैत' हे मात्र विसरता कामा नये.

४. भगवद्गीतेतील भक्तियोगाला प्राधान्य देणाऱ्या या भागवत संतांना भक्तियोग साधना करून 'अद्वैत' लक्ष्य गाठावयाचे होते हे स्पष्ट

आहे; कारण भगवद्गीतेतील योग विश्लेषण संपवितांना व्यासांनी स्पष्ट म्हटले आहे –

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतीसूपनिषस्तु
ब्रह्मविद्यायायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुसंवादे
भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ।। गी. १२ ।।

याचा सरळ अर्थ असा आहे की, ब्रह्मविद्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योगशास्त्रात 'ब्रह्मस्वरूप', 'सच्चिदानंदस्वरूप', 'सोहं', 'स्वस्वरूप' होण्यासाठी, ते भोगण्यासाठी, ते अनुभवण्यासाठी जे अनेक मार्ग भगवद्गीतेत निवेदिले आहेत त्यातील 'भक्तियोग' हा साधना मार्ग भागवतांनी स्वीकारला आणि संतपदाला पोचले.

संतपदाला गेलेल्या विभूतिमत्वाची उपलब्ध माहितीच्या आधारे एक सामान्य जीवनसारणी मांडता येते – ती अशी –

**ब्रह्मविद्येतील भक्तियोग मार्ग**

| | **(अ)** | | **(ब)** |
|---|---|---|---|
| १) | भक्तिमार्गाची परंपरेनुसार किंवा गुरूकृपेने निवड | १) | योगभ्रष्ट अवस्थेची वर्तमान जन्मात अनुभूती |
| २) | भक्तीच्या अनन्यतेतून, भक्तीची परमावधी, ज्ञान प्राप्ती, ज्ञानात्मकता | २) | भक्तीची परमावधी ज्ञानमय अवस्था, वैराग्य |
| ३) | भ्रामक संसार, प्रपंच, ऐहिकता यांपासून पूर्ण वैराग्य | ३) | ज्ञानोत्तर भक्ति वैराग्यपूर्वक लोकव्यवहार, लोकप्रबोध, लोकोद्धार यासाठी जीवन प्रवास |
| ४) | वैराग्यपूर्वक अर्थात ज्ञानोत्तर भक्तिव्यवहार, लोकसेवा लोकांना प्रबोधित करण्याची धडपड, लोकांना 'सच्चिदानंद' प्राप्त होण्यासाठी धडपड | ४) | आनंदमयतेने, आनंद वाढवीत आनंदमग्नतेने चिरंतनाचा प्रवास |
| ५) | आनंदमयतेने आनंद वाढवीत आनंदमग्नतेने चिरंतनाचा प्रवास | | |



भक्तियोग मार्गात भक्ति – ज्ञान – वैराग्य – वैराग्यपूर्वक लोकव्यवहार – आत्मोद्धारा बरोबरच लोकोद्धार श्री संत तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगावयाचे तर –

*अणुरेणुया थोकडा । तुका आकाशा एवढा ।।१।।*
*गिळुनी सांडिले कळेवर । भवभ्रमाचा आकार ।।२।।*
*सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ।।३।।*
*तुका म्हणे आतां । उरलो उपकारा पुरता ।।४।।*

*दुसऱ्या एका अभंगात तुकाराम म्हणतात –*

*आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।*
*बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ।।१।।*
*झाडू संतांचे मारग । आडरानें भरले जग ।*
*उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ।।२।।*
*अर्थ लोपली पुराणें । नाश केला शब्द ज्ञानें ।*
*विषयलोभी मन । साधन बुडविले ।।३।।*
*पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।*
*तुका म्हणे करा । जयजयकार आनंद ।।४।।*

मुमुक्षु होऊन विजनवासात जाणे भक्तियोगाला मान्य नसले तरी; पूर्ण वैराग्य अर्थात ब्रह्मस्वरूप होऊन; आत्मज्ञानी अवस्थेत लोकव्यवहार करीत लोकोद्धार करणे अभिप्रेत आहे.

*विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।*
*कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।*

यातील सर्वेश्वर दुसरातिसरा कोणी नसून आत्मारामच आहे. स्वतःची

पूर्णज्ञानमय अवस्थाच संतांना अभिप्रेत आहे. या अवस्थेतूनच 'आनंदाचे आवारू मांडू जगा' अशी घोषणा घडते आणि 'स्वस्वरूपाला' 'पसायदानाची' प्रार्थना केली जाते. संतांच्या जीवनसारणीची ही परमावधी आहे.

याचा अर्थ असा की योगेश्वर श्रीकृष्णांपासून आणि नाथसंप्रदायाच्या श्री गुरू गोरक्षनाथांकडून 'सिद्ध सिद्धांत पद्धति'चा अनुसार भक्तियोगात करून 'अवधूत' पदाला अर्थात संतपदाला पोचण्याचाच हा मार्ग होय – 'सिद्ध सिद्धांत पद्धति' या ग्रंथातील षष्ठोपदेशात 'अवधूत योगी लक्षण' स्पष्ट केली आहेत –

*'यः सर्वान् प्रकृतिविकारान् अवधूनोतीत्यवधूतः ।'*

असे म्हटले आहे. अर्थात जो सर्व प्रकृतिजनित विकारांना आपल्यापासून दूर ठेवतो तो अवधूत असतो. (श्लोक १) मात्र अवधूताचे आणखी एक लोकव्यवहारातील लक्षण लक्षणीय आहे –

*क्वचिद्भोगी, क्वचित्यागी, क्वचिन्नग्नः पिशाचवत्*
*क्वचिद्रानां क्च्चाचारी सोऽवधूतोऽभिधीयते ।।२०।।*

जो कधीं भोगी, कधीं त्यागी, कधी नग्न, कधीं पिशाचवत्, कधीं राजा, कधीं आचारी असतो त्याला अवधूत म्हणतात.

*सदा स्वरूपानुसंधान । हे मुख्य साधूचें लक्षण ।*
*जनी असोन आपण । जना वेगळा ।।*

असे साधू लक्षण प्रसिद्ध आहे. एव्हढेच नव्हे तर जनी असूनही तो संन्यासी (श्रेष्ठतम आचरण – ब्रह्मस्वरूप आचरण) वृत्तीने असतो; असे श्री ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे.

*तरी गेलियासी से न करी । न पवतां चाड न धरी ।*
*जो सुनिश्चळु अंतरीं । मेरू जैसा ।।*

(ज्ञा.अ. ५ ओ. १९)



*आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण ।*
*पार्था, मी तो संन्यासी जाण । निरंतर ।।*

(ज्ञा.अ. ५ ओ. २०)

संतांचा व्यवहार आणि साधना यांचा असा जीवनसारणी स्वरूपात विचार करणे क्रमप्राप्त आहे. भागवत संप्रदायात संतांच्या अभंगाची सोडवण करतांना अर्थात उकल करतांना शिरोधार्य ग्रंथांबरोबरच, ब्रह्मसूत्रे, विचारसागर, वृत्तीप्रभाकर, पंचदशी, पंचीकरण, तर्कसंग्रह, वेदान्त परिभाषा या शास्त्रीय ग्रंथांचा व्यासंग असावा; असे अपेक्षित असते. याचे कारण हेच आहे की केवळ लौकिकअनुभूतीतील व्यवहारात्मक भावावस्था संतांच्या अभंगानुभूतीत नाही. तर ज्ञानप्रसृतीबरोबर आत्मानुभवपूर्वक व्यवहार चिकित्सा त्यात अभिप्रेत असते.

५. ब्रह्मविद्येतील योगशास्त्रांतर्गत भक्तियोगाचा स्वीकार केला असल्यामुळे योगशास्त्रातील समाधीयोगाचा, सच्चिदानंदपदभोकृत्वाविषयीचा विचार, सर्वच संतांनी केलेला दिसतो. श्री संत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव अर्थात 'अनुभवामृत', 'भगवद्गीतायोगशास्त्र' अर्थात श्री ज्ञानेश्वरी, श्री नाथ महाराजांनी श्रीमद्भागवत टीका, श्री शेखमहंमदांनी योगसंग्राम, श्री रामदासांनी 'दासबोध' असे ग्रंथ प्रसिद्ध केले; तर श्री संत मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव आणि प्रामुख्याने श्री संत तुकाराम महाराज यांनी थेट अभंगरूपातून योगमार्गावर भाष्य केले, हे लक्षात घ्यावे लागते. याचा स्पष्ट अर्थ असा की, ब्रह्मविद्येमध्ये 'योग' कोणताही असो तेथे मनावर पूर्ण ताबा मिळवून आत्मस्थितीला अर्थात 'अमनस्क' अवस्थेस पोहचून; स्वस्वरूपानंद भोगावयाचा असतो. हा लौकिकाशी अर्थात प्रकृतिजन्यतेशी ब्रह्मतत्त्वाचा संग्राम असतो. तो 'अद्वैत' स्थिती 'पूर्ण' स्थिती प्राप्त होण्यासाठी. भक्तियोगामध्ये अशा स्वस्वरूप, सच्चिदानंदस्वरूप, स्थितीप्राप्तीसह समस्त 'लोक'ला चराचराला आपणात पाहून ऐश्वर्ययोगासह सच्चिदानंद भोगण्याची

परमावधी साधावयाची असते. ही मानसिकता साधण्यासाठी ध्यानधारणापूर्वक योगस्थिती साधणे अभिप्रेतच आहे. संतचरित्रांचा धांडोळा केला तर; श्री संत तुकाराम महाराज भंडाऱ्या डोंगरावर जाऊन ध्यानमग्न होत असत; तसेच सर्व संत ध्यानधारणा करीत असत; असे लक्षात येते. भक्तीची परमावधी अशी सच्चिदानंदस्थितीतच असते. ती साधण्याची साधना, अर्थात अभ्यास अनन्यएकाग्रतेसह अपेक्षितच असते.

६. भागवत संप्रदायातील संतपदी पोचलेल्या संतांचे एक वैशिष्ट्य सिद्धयोगी पुरुषांसारखे अनुभवता येते. संतांच्याकडून घडलेले चमत्कार हा चर्चेचा, कुतुहलाचा, जिज्ञासेचा, दिव्यत्वदर्शनाचा इ. विषय म्हणून चर्चिला जातो. श्री संत माऊली ज्ञानेश्वरांनी पार्थिव भिंत चालविणे, रेड्यामुखी वेद बोलविणे, पाठीवर मांडे भाजविणे, असे काही ठळक चमत्कार नेहमीच सांगितले जातात. श्री संत नामदेवांनी श्री विठ्ठलाला भोजन भरविणे, जनाबाईबरोबर श्री विठ्ठलाने जाते ओढणे, विसोबांनी प्रत्येक ठिकाणी पायाखाली पिंडी उत्पन्न करविणे, गोरोबांनी चिखलात मुल तुडविणे आणि हाक मारताच परत येणे, सावताच्या हृदयात पांडुरंगाचे दर्शन घडणे, चोखोबांच्या हाडांमधून विठ्ठलभजन ऐकू येणे, नाथ महाराजांच्या घरी श्रीखंड्याने पाणी भरणे, श्री शेखमहंमद श्रीगोंदेकर यांच्या बाबतीत तर; अलमगीर बादशहाने चार माणसांचे ओझे डोक्यावर देऊन चालविले पण ते सव्वाहात उंच राहिलेले पाहून शरण येणे व इनाम देणे, बळजबरीने दिलेल्या मांसाहाराची फुले होणे, देहूस चाललेल्या तुकाराम महाराजांचे कीर्तन मंडपास लागलेली आग श्रीगोंद्याहून हाताने विझविणे व लोकांकडून विझविल्याची खात्री करून घेणे, अलिबाग येथील बुडत असलेले जहाज श्रीगोंद्यातून वर काढणे, मोदोबास चोराने तोडलेले हातपाय परत देणे, दामाजीपंतांचे महार बनून, दरबारात प्रत्यक्ष विठ्ठलाने पैसेभरणे, श्री संत तुकाराम महाराज यांची गाथा इंद्रायणीने तेरा दिवसानंतर, कोरडी परत करणे - याच प्रकारचे नाथांचे भागवत व



शेखमहंमदांचा योगसंग्राम पाण्यातून परत जसाच्या तसा मिळणे, श्री संत तुकाराम महाराजांचे सदेह वैकुंठगमन घडणे आणि नाथ महाराजांना ज्ञानेश्वरांनी दृष्टांतपूर्वक श्री ज्ञानेश्वरी शुद्ध करावयास सांगणे; असे अनेकानेक चमत्कार संत चरित्रात आढळतात. भक्तिमार्गी भागवत परंपरेत दासगणु, गुलाबराव महाराज, गाडगे महाराज यांच्यापर्यंत धांडोळा केला तरी; असे चमत्कार घडलेले दिसतात व घडत असल्याचे सांगितले जाते. याची संगती या भक्तियोगी साधना परंपरेत कशी लावायची? की त्या दिव्यत्व दर्शविणाऱ्या केवळ बोलवा आहेत? बुद्धिप्रामाण्यवादी लोक यांविषयी नेहमीच वितंड करीत असतात. अंधविश्वास म्हणून संभावनाही करीत असतात. मात्र येथे हे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की; हे चमत्कार वगैरे काही नसून; ब्रह्मविद्येतील योगमार्गाच्या साधनामार्गावर सकलसिद्धी कार्यान्वित होतात; त्या सिद्धींच्या कार्यान्विततेने असे चमत्कार अनुभवास येतात. याचा अर्थ, संत सिद्धींचा वापर करू चमत्कार दाखवून, नमस्कार घडवितात, गारुड्याच्या खेळाप्रमाणे; हे नजरबंदी, हातचलाखीचे भोंदविणे असते; असे अजिबात नसते. सिद्धसाधूपदी पोचलेल्या विभूतिमत्वाच्या संदर्भात, तात्कालिक, अनिवार्य अशा, लौकिकातील लोकभावना, वासना, इच्छा यांमुळे संतपदावरील सिद्धपुरुषांच्या ठिकाणी आपसुकच असलेल्या सर्व प्रकारच्या सिद्धी कार्यान्वित होतात आणि जडचेतन वस्तूंनाही निर्गुणनिराकार परब्रह्मस्वरूपाचा अहंकार स्पर्श घडतो. चतन्या कार्यान्वित होते. मात्र प्रत्यक्ष हे संतपुरुष यात दुरान्वयानेही लिप्त नसतात. किंबहुना अशी लिप्तता त्यांची योगसाधना भ्रष्ट करून; त्यांना स्वरूपापर्यंत पोचण्यात बाधक ठरते हे ज्ञानी पुरुषांना माहीत असते. सिद्धीनिर्मित चमत्कार हा लौकिक जीवनातील वासनादेहांच्या, सुष्टदुष्ट वासनांचा तात्कालिक परिणाम असतो. अर्थातच लौकिकात वावरणाऱ्या म्हणजेच जडचेतनाशी व्यवहार करणाऱ्या अवधूत, सिद्ध, स्थितप्रज्ञ, संत, साधू, संन्यासी, सच्चिदानंदपदवीप्राप्तांच्या संदर्भातच हे आपसुक घडते. अन्यथा सिद्धी

प्राप्त करून घेण्यापर्यंतची साधना करणारेही आढळतात व सिद्धींचे दुकान मोडून व्यवहार करतांना दिसतात. तांत्रिक, मांत्रिक यांच्यातील काही लोक या तऱ्हेने या शक्तींचा उपयोग करतात. भक्तिमार्गात सिद्धी या अडसर होत; असे श्री एकनाथ महाराजांनी स्पष्ट केले आहे. एकनाथी भागवतातील पंधराव्या अध्यायामध्ये; भक्तिमार्गात सिद्धींचे विघ्न; अष्टमहासिद्धी व दहा इतर सिद्धी ह्यांची प्राप्यता, सिद्धीसाधनोपाय; अष्टसिद्धी, दशसिद्धी व पंचसिद्धी ह्यांचे वर्णन सिद्धींची बाधकता व त्यांच्या त्यागाची आवश्यकता अशा विषयांवर नाथ महाराजांनी टीका केली आहे. श्री भगवान श्रीकृष्ण आणि श्री उद्धव यांच्या संवादात श्री भगवान सांगतात –

*जितेन्द्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः ।*
*मयि धारयतश्चेत उपतिष्ठन्ति सिद्धयः ।।१।।*

या वरील टीकात नाथ महाराज सांगतात– पंधराव्या अध्यायामध्ये असे निरुपण आहे की; भक्तांनी माझे भजन केले असता सिद्धी ह्या हटकून उत्पन्न होतात. पण विघ्नकारक होतात म्हणून त्यांचा त्याग करायला सांगतात – ज्याला प्राणापनजय साधला, ज्याला इंद्रियांचा निग्रह झाला, आणखी माझ्या भक्तीविषयी उल्हास उत्पन्न होऊन; रात्रंदिवस चित्त माझ्याच ठिकाणी लागले, उद्धवा! त्याच्या ठिकाणी अनिवार सिद्धी उत्पन्न होतात, आणि तो ज्या ज्यावेळी जी जी इच्छा करतो, ती ती त्याची इच्छा पूर्ण होते यात संशय नाही.

याचा स्पष्ट अर्थ असी की, सिद्धींची प्राप्ती ही साधनामार्गावरील आपसुक आणि अनिवार्य गोष्ट होय. त्यांचा त्याग करून पुढे साधना करणारा सच्चिदानंदपदी अद्वैत होतो, हे खरे. परंतु लोकोद्धारार्थ सिद्ध झालेल्या अशा ज्ञानी विभूतिमत्वाशी 'लोक'च्या भावना, वासना, इच्छा येऊन खेटतात त्यांपासून 'लोक'ला निष्कामतेपर्यंत पोचवितानाही त्या सर्व इच्छांची तृप्ती आपोआपच घडते. पर्जन्य पडले की बी रुजतेच तसे



हे घडते. म्हणूनच भक्तियोगी संतपदाला पोचलेल्या विभूतिमत्वाच्या चमत्कारांची संगती नीट लक्षात घेतली पाहिजे. किंबहुना लोकजीवनातील अनेक लोक श्रद्धेने या विभूतिमत्वांनी शरण जाऊन इहजीवनातील अपेक्षा त्यांच्या पुढे मांडतात आणि श्रद्धेच्या प्रभावाने सिद्धी कार्यान्वित होऊन; बहुधा अपेक्षा पूर्ण होतात. दिव्यत्वाची प्रचिती आल्याचा हा अनुभव वाटला; तरी साधना मार्गावरील ही प्राथमिक अवस्था असते.

७. भक्तिमार्गी संत परंपरेतील संतांनी जे प्रबोधन केले आहे. त्यासंदर्भात; आधुनिक विचारवंत समाजवाद, साम्यवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता इ.इ. सह अनेकानेक पाश्चात्य व पौर्वात्य वाद (वैचारिक व्यूव्ह) या दृष्टीने या प्रबोधनातील, प्रामुख्याने पाखांडखंडनाची चर्चा करतात. संतांचे पाखांडखंडन हे प्रामुख्याने; रुढीग्रस्तता, भेदाभेद, स्पृश्यास्पृश्यता, नवससायास, व्रते, उपासना इ.संदर्भातील लौकिकव्यवहारात्मकता आणि अंधविश्वास, भोंदूपणा, केवळ अंध कर्मठता, तंत्रमंत्रातील यांत्रिकतेने आणि देखाव्याने आलेली निरर्थकता या संदर्भात असते. त्यांचे हे पाखांडखंडन कोणत्याही भौतिक विचारप्रणालींना तर्काच्या पातळीवर बळ देण्यास उपयुक्त ठरते. व्यवहारतः त्यात काही चूक नाही. 'लोकी अलौकिक तुकाराम' या ग्रंथाच्या मलपृष्ठावर मी स्पष्टपणे याविषयी लिहिले आहे 'लौकिक आणि पारलौकिक मानवी जीवनासंबंधी भौतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात जे जे म्हणून वैचारिक व्यूह अखिल विश्वात गत युगाब्दात मांडले गेले आहेत; त्या सर्व वैचारिक व्यूहांना मूलभूत स्वरूपात लौकिक जीवनातून दृष्टांतासह आधार श्री तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेत मिळतातच; याचा अर्थ त्या त्या वैचारिक व्यूहांचे विचार श्री तुकाराम महाराजांच्या अभंगात आले आहेत किंवा श्री तुकाराम महाराजांचे विचार त्या वैचारिक व्यूहांचा थेट पुरस्कार करून त्या पृथक वैचारिक व्यूहांना पुष्ट करण्यासाठीच प्रकटले आहेत असे म्हणणे अव्याप्त ठरेल.' जे श्री संत तुकाराम महाराजांच्या बाबतीत तेच सर्व संतांच्या

बाबतीत होय. संतांना प्राप्त जन्म हा स्वस्वरूपाचा, सच्चिदानंदपदाचा, आनंद भोगण्यासाठीची अपूर्व संधी आहे. म्हणून लौकिकातील तात्कालिक, भ्रामक, रूढ, कर्मठ, अंध गोष्टींकडे आणि स्वार्थपर व्यावहारिकतेकडे त्याज्य म्हणून पाहण्याचे ज्ञान व्हावे; यासाठी कठोर, स्फोटक असे प्रहार करून संपूर्ण मिथ्यात्मकतेवर अर्थात पाखशंडीपणावर संतांनी प्रहार केले आहेत. निखळ आनंद, सुख हे परमार्थसाधनेत आहे त्यासाठी प्राप्त भौत्तिक जीवन; हा आपत्धर्म म्हणून करावयाचा व्यवहार धर्म आहे. तो भ्रामक आहे. देहच नश्वर म्हणजे त्याच्या वासनाही नश्वर. म्हणून त्यातील शाश्वत चैतन्यावर, ब्रह्मावर लक्ष केंद्रीत केले तर 'सुख पर्वताएव्हढे' असा अनुभव येऊ शकेल. अन्यथा 'सुख पाहता जपावाडे' ही लौकिक संसारातील वासनानिष्ठ अनुभूती येतच राहील. त्या भ्रामकतेपासून दूर व्हायचे असेल; तर जगत मिथ्या आहे, हे पाखांडखंडनातूनच पटवून देता येईल. 'आनंदाचे आवारू मांडू जगा' हे साध्य, साधण्यासाठीचे संत पाखांडखंडन, अर्थात प्रबोध करीत आहेत हे लक्षात घेऊन त्या पाखांड खंडनाची अध्यात्मलक्षी पद्धतीनेच चिकित्सा करावयास हवी.

८. **समारोप –** संतांनी स्वीकारलेला 'भक्तियोग' भागवत मार्ग हा ब्रह्मविद्या, योगशास्त्रातील एक साधनेने साध्य असा योगमार्ग आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आत्मोद्धार आणि लोकोद्धार हे जीवनाचे 'लक्ष्य'; या योगमार्गावरील 'पावनमनाच्या योग्यांचे' असते. नवविधाभक्ति म्हणजे अध्यात्मविद्येचा रंजनात्मक संगीतमय बाजार नाही. तो एक व्यापक, समावेशक असा विश्वात्मक सामरस्य साधणारा पूर्ण आनंदमार्ग आहे. संतचरित्र, संत वाङ्मय यांचे परीशील व संतभक्ति ही या सामंजस्यासह होण्याची अपेक्षा आहे.

* * *



# सद्‌गुरुनाथे धरिले हाता ।
# धर्मभूमी केले ओजा ।।

'परब्रह्म' (Far Greater Truth) हे अंतिम सत्य होय. समस्त दृष्यमानाचे मूल कारण आणि दृष्यमानात्मक अस्तित्व 'परब्रह्म' हेच होय. परब्रह्माची कैवल्यता आणि परिपूर्णता; या ना त्या परीने सर्व मानवी समूहधारणांनी मान्य केली आहे. भूलोकीच्या मानवेतर चर आणि अचर मात्रांना या अस्तित्वाची संवेदना स्पंदित होत असावी; याविषयी मतभेद होऊ शकतील; परंतु ते अद्यापही संशोधनप्रक्रियेतच आहे. मानवाला मात्र या अस्तित्वाचे ज्ञानात्मक संवेदन झाले आहे; याविषयी दुमत नाही. मानवाच्या बाबतीत, 'ब्रह्म सत्यम्' व 'जगत् सत्यम्' असे ज्ञानात्मक अस्तित्व, उपलब्ध ज्ञानविज्ञान योगसाधनांच्या आधारे, गृहित धरता येते. नरदेहाचे जिवंतपण हे या गृहितकाला बळकटी देणारे आहे. उपलब्ध शब्दब्रह्माच्या परिशीलनाने, अभ्यासाने, प्रयोगात्मक क्रियात्मकतेने, प्रत्यक्ष अनुभूतीने, मानव या गृहितकाच्या जवळ पोचला आहे. परब्रह्मानुभूतीविषयी, या अनुभूतीच्या आवश्यकतेविषयी, परब्रह्मस्वरूप होण्याविषयी आणि परब्रह्मस्वरूप होण्याच्या आवश्यकतेविषयी; प्राचीनतमतांपासून आजवर मांडले गेलेले वैचारिक व्यूह, सिद्धान्त परस्पर द्वंद्वात्मक, विरोधी किंवा पूरक, शंकास्पद किंवा

पूर्णसत्यात्मक, अशा कोणत्याही स्वरूपात असले; तरी ‘परब्रह्म’ या अवस्थेचे आणि दृष्यामान असलेल्या अवस्थेचे अस्तित्व मानवाने मानलेच आहे. ‘परब्रह्म’ ज्ञान-साधना करीत असतांना; प्रत्येक दृष्यमानता, तात्कालिक, परिवर्तन होणारी; म्हणून भ्रामक किंवा क्षणभंगूर वाटली; तरी त्या दृष्टमानतेचे अस्तित्व अमान्य करणे कोणालाही शक्य झाले नाही. त्यातील अविनाशित्व थेट, ‘परब्रह्म’ या कैवल्यातच परब्रह्मस्वरूप होते; हेही कोणी नाकारत नाही. ‘परब्रह्म’ या अंतिम आणि पूर्ण सत्यात पूर्णतः परब्रह्मस्वरूप होणे किंवा परब्रह्मस्वरूपानुभूती भोगणे, एवढेच अंतिम लक्ष्य नरजन्माचे ठरते. त्यांत परब्रह्मस्वरूप होणे ही वैयक्तिक मोक्षप्राप्ती अर्थात सायुज्यमुक्ती ठरेल. ‘लोक’ अवस्थेमध्ये या अवस्थेला स्वीकार्य व पूज्य मानले; तरी लोकांतात या अवस्थेला स्थान नाही. लोकांतामध्ये परब्रह्मस्वरूपानुभूती लोकसह भोगणे हीच अवस्था स्वीकार्य होय. भारतीय परंपरेमध्ये चतुर्युग कल्पना, परंपरेने मान्य केली आहे. त्यानुसार आणि विद्यमान विज्ञाननिष्ठ आणि आसक्तीनिष्ठ जीवनात; हीच परब्रह्मस्वरूपानुभूती साधणे श्रेयस्कर होय. याकरिता भारतीय परंपरेत परब्रह्मस्वरूप प्राप्ती किंवा अनुभूतीसाठी योगसाधना हा मार्ग; योगी किंवा अवधूत, साधू किंवा संत यांनी ऋषी परंपरेतून स्वीकारलेला दिसतो. या ‘योग’ मार्गांची विविधता सैद्धान्तिक स्वरूपात मंडित आहे. त्यातील ‘भक्तियोग’ हा योगमार्ग अनेक मार्गांच्या सामरस्यातून प्रकटला असून परिपूर्ण आणि विद्यमान परिस्थितीत सुलभ म्हणून संतांनी स्वीकारला आहे.

१. ‘भक्तियोग’ मार्ग स्वीकारून अवघ्या जगताला आपल्या बरोबर परब्रह्मस्वरूप सुखानुभूती भोगण्याचे भाग्य प्राप्त करून देण्याचा प्रयास भागवत संतांनी केला आहे; करीत आहेत. महाराष्ट्र भूमी आणि मराठी शब्दब्रह्म या अवकाशाने, जणू हा विडाच उचलला आहे. ऋषींच्या तपश्चर्येतून सुरू झालेली ही परंपरा, महाराष्ट्रातील संत श्री विठ्ठल भक्तियोगाने



पुढे नेत आहेत. विश्वाचे रहस्य नरदेहात अनुभूत करून; परब्रह्मस्वरूप सुख सोहळा, याचिदेही याचिडोळा, भोगण्याचा हा सनातन प्रयत्न होय. योगी अरविंदो यांनी The Riddle of This World' या पुस्तकात याविषयी केलेले विवेचन मननीय आहे - 'A far greater truth' या लेखात ते म्हणतात- 'I meant by it the descent of the supra-mental consciousness upon earth; all truths below the supramental (even that of the highest spiritual on the mental plane, which is the highest that has yet menifested) are either partial or relative or otherwise deficent and unable to transform the earthly life; they can only at most modify and influence it. The Supermind is the Vast Truth-Consciousness of which the ancient seers spoke; there have been glimpses of it till now, sometimes an indirect influence or pressure, but it has not been brought down into the consciousness of the earth and fixed there. To so bring it down is the aim of our Yoga.'

२. परब्रह्मस्वरूप भोगण्याची ही साधना भक्तियोगमार्गाने करावयाची असेल; तर ‘अद्वैत’ भावृत्तीने भक्तियोगाची साधना आवश्यक आहे. हे अद्वैत ‘अर्धनारीनटेश्वराच्या’, ‘राधाकृष्णरूपाच्या’ किंवा ‘मोहिनीराजांच्या’, ‘प्रिय-प्रिया’ अद्वैत रूपकानुभूतीमधून जनमानसात प्रकट करण्याची परंपरा श्री ज्ञानेश्वरांनी अनुसरली आहे. या रूपकाची परिणती ‘सद्‌गुरू-शिष्य’ अद्वैतात केली आहे. हे मोठे मनोवेधक आणि विलोभनीय आहे. ‘उपास्य अथवा भज्य-भक्त आणि भक्ति’ यांच्या परस्पर प्रेममय विलयातून साधलेले हे अद्वैत म्हणजे भक्तीची परमावधी होय. या अद्वैतानुभूतीची परंपरा वेद, उपनिषदे यांतून ‘योगेश्वर’ श्रीकृष्णांनी तात्त्विक स्वरूपात श्री अर्जुनाला कथन केली. ‘नारायण-नर’ यांच्या

साधनेसह, श्री ब्रह्मर्षी नारदांनी ही परंपरा 'सिद्ध' परंपरेकडे पोचवून योगमार्गाला भक्तीचे संस्करण घडविले. नारदांनी भक्तिसूत्रांत भक्तीची सूत्र रूप व्याख्या केली आहे.

*अथतो भक्तिं व्याख्यास्यामः ।।१।।*
*सात्वऽस्मिन् परमप्रेमरूपा ।।२।।*
*अमृतस्वरूपा च ।।३।।*
*यल्लब्धा पुनाम् सिद्धो भवत्ममृतो भवति तृप्तो भवति ।।४।।*
*यत्प्राप्य न किंचिद्वाच्छति न शोचति*
*न द्वेष्टि न रमते नात्साही भवति ।।५।।*
*यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति ।।६।।*

आम्ही भक्तीची व्याख्या करतो आहोत. असे म्हणून श्री नारद म्हणाले, 'भक्ति ही ह्या परमात्म्याविषयी परमप्रेमरूपा आहे, आणि अमृतरूपा आहे. ती प्राप्त झाली असता, पुरुष सिद्ध म्हणजे कृतकृत्य होतो, अमर होतो, तृप्त होतो अर्थात परिपूर्ण होतो. ती पावली की तो अन्य कशाचीही इच्छा करत नाही किंवा शोक करत नाही, कोणाचाही द्वेष करीत नाही, ऐहिक विषयांच्या ठिकाणी रमत नाही, व कसलाही हव्यास धरीत नाही. भक्तीचा आनंद भोगून तो उन्मत्त होतो अर्थात परब्रह्मस्वरूपात लीन होतो. परब्रह्मस्वरूप सुखसोहळा सानंदसंभोगतो. ही अद्वैतानुभूतीती परमोत्कर्ष आनंदस्थिती होय.

योगेश्वर श्रीकृष्णांनी हीच अद्वैत अवस्था वर्णन करून; श्रीकृष्णमय होण्याचा सुत्ररूप उपदेश केला –

*सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।*
*अहं तयां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।*

(गी. १८ अ. श्लोक ६६)

सर्वधर्मपरित्याग करून अर्थात ज्ञानविज्ञानात्मक देहवासना आसक्ति इ.सह सर्व धर्म अर्थात धारणांचा त्याग करून; मला, परब्रह्मालाच केवळ शरण



जा, अनन्यता वृत्ती स्वीकार, मीच तुझ्या सर्व पापातून अर्थात सर्व शंका, भ्रम, भंगुरता इ.पासून तुझी मुक्तता करीन ही मुक्तता आपोआपच होईल कारण –

*यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति ।*
*तस्याहं न प्रणस्यामि स च मे न प्रणश्यति ।।*

(गी. ६. श्लोक ३०)

सर्व प्राणिमात्रात माझा अनुभव घेणाऱ्याला आणि माझ्यात सर्व प्राणिमात्रांचा अनुभव घेणाऱ्याला मी कधीच दृष्टीआड करीत नाही. तो सतत माझ्यात असतो (दृष्टीसमोर असतो) एवढी एकात्मता या शरण्यप्रेममयतेत आहे. भज्य, भक्त आणि भक्ति यांचे संपूर्ण अद्वैत झाल्याची अनुभूती येते. प्रेमाच्या उत्कटतेत उभयतांचे सामरस्य प्रकटते. सदगुरू आणि शिष्य यांचे असे प्रेमस्वरूप अद्वैत भक्तियोगाने घडते आणि परापराच्या सर्व शंका फिटून जातात.

श्री ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवात' 'अर्धनारीनटेश्वराच्या' रूपकातून हे प्रेमरूपा अद्वैत; 'शंभू-शांभवी' आणि 'सद्गुरू-साधक' या द्वैता-द्वैत युगुलातून ही परब्रह्मस्वरूप सुखसोहळ्याची कल्पना मोठ्या चतुरायीने आणि स्पर्शतेने वर्णिली आहे.

'शिवशक्तिसमावेशन' प्रकरणात श्री ज्ञानेश्वर म्हणतात –

*''जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरीं ।*
*चारूस्थळीं एकाहारी । एकांगांचा ।।२।।''*

प्रियु आणि प्राणेश्वरी हे द्वैतच राहात नाही तेव्हां प्रिया प्रेमाच्या अपार आवेगाने आपल्या प्रियकराकडे जाते; तेव्हा खरेतर त्या प्रियेचेच निरतिशय प्रेम, आंतरिक आवडीच्या उत्कटतेमुळे उलटून प्रियुशी एकरस होणे घडत असते तेव्हां हे चारुता, एकात्मता, एकांगता आकारास येते, अद्वैत भासमान होते.

*दोहो अंगांची आटणी । गिवसीत आहाती एकपणी ।*
*झाली भेदाचिया वाहणी । आधाधी जिये ।।१५।।*

या प्रसंगाचे निरुपण करतांना 'अमृत अनुभवाचे' संपादक डॉ. मधुसूदन बोपर्डीकर लिहितात, 'प्रीतिमीलनाच्या आनंदाला बाहेरच्या अंगांचा अथवा आतल्या वृत्तीचा दोनपणा यत्किंचितही सहन होत नाही. आनंदाच्या एकपणात ही दोघें दोनपणाचा भास उत्पन्न करण्याच्या अंतर्बाह्य अंगागांची आटणी करण्यांत, ती पार संकोचून टाकण्यात गुंतली आहेत. शोध-शोधून दोंनपणांची सारी अंगांगें एकपणात विलीन करीत आहेत. या त्यांच्या अव्यक्त अभेदात्मक अशा आनंदमय लीलेंतून जें प्रवाहित झालें, ते विश्वरूपाने व्यक्तपणास येतांच, जणू भेदाचा प्रवाहच आकारात आल्यासारखें दिसतें. वस्तुतः प्रत्येक भेदाच्या अंतरंगांत यांचे अर्धे अर्धे अंगच असते.' या अद्वैत अनुभूतीला प्रमाण देताना श्री ज्ञानेश्वर म्हणतात-

*जिया चेवलिया शिवु । वेद्याचे बोणें बहु ।*
*वाढितेणासि जेवु । धाला जो ।।३६।।*
*सांडुनि मीठपणाचा लोभ । मिळें सिंधूत्वांचा घेतला लाभू ।*
*तेवि अहं देवोनि (मी) शंभु । शांभावी झालों ।।६३।।*

शिवांना शक्तीने चेवविला आणि व्यापक समग्र ब्रह्मपसारा, जो जाणून घ्यावयाचा तोच जणु पक्वान्न आहेत आणि शक्ति ती पक्वान्ने जेववित आहे; असे वाटून, जेवू लागला आणि जेवणात एवढा रममाण झाला की; वाढपाचे पदार्त आणि वाढणारी दोहोंनाही खाऊन तृप्त झाला. अर्थात भक्ति आणि भक्त दोहोंनाही स्वतःतच ग्रासून टाकले. स्वतःचा मीठपणाचा लोभ सोडून (स्थूल अहंकार टाकून) मीठाने विशाल द्रवरूप सागराचा लाभ घ्यावा; त्याप्रमाणे अहंभावाचे दान देऊन स्वतः शंभू शांभवीत विलीन झाले, प्रेम आणि प्रेयू, प्रेयसीतच सामावले, समरस झाले. असे 'अद्वैत' अवघ्या स्थूलपणातील तात्कालिक अहंकार सांडून शाश्वत 'कैवल्या'त समरस करते, अर्थात दृष्यमानाचे अंतिम सत्य



गाठते. आसक्ति, भेद आणि क्षणभंगुरता लोपून अवघेच आनंदमय होते. येथे एक गोष्ट श्री ज्ञानेश्वरांनी मार्मिकतेने निवेदित केली आहे; ती म्हणजे जेवणाचे पदार्थ अर्थात स्थूलातील आसक्ति (कुलाची आसक्ति) आणि आसक्त जीव अर्थात (कुल) प्रिया यांतच स्वतः सामावून त्यांचा ग्रास घेऊन स्वतःत सामावून टाकते. समग्र पदार्थ हीच भक्तियोगातील अवघी चराचर प्रेमासक्ति होय, यासह परब्रह्म सुखसोहळा भोगणे अभिप्रेत आहे. सर्वात्मक ब्रह्ममयतेची अंतिम अवस्था, अर्थात सत्य अवस्था भोगण्याची ही 'द्वैतातील' 'अद्वैत' अनुभूती होय. भक्तियोगातील परिपूर्णता, हाच अभिप्रेत असलेला 'अमृतानुभव' होय.

हा अमृतानुभव लौकिक जीवनापलिकडे भासमान असणाऱ्या 'शिव-शक्ति', 'राधा-कृष्ण' या अद्वैत युगलातून भोगण्याचे सामर्थ्य सद्‌गुरू, सिद्ध देऊ शकतो. कारण त्याचेही अस्तित्व लौकिकातच अभिप्रेत आहे. म्हणूनच सद्‌गुरू आणि साधक शिष्य यांचे सामरस्य अर्थात स्वस्वरूपता ऋषी, नर-नारायण, नाथ, योगेश्वर श्रीकृष्ण-पार्थ, यांनी अपेक्षिली, परंपरागत केली. हीच परंपरा भागवत संतांनी पुढे नेली. म्हणूनच श्री ज्ञानेश्वर 'सद्‌गुरूवंदनम्'मध्ये म्हणतात-

*म्हणोनि शिष्य आणि गुरूनाथु । या दोही शब्दांचा अर्थु ।*
*श्रीगुरूचि परी होतु । दोहो ठायीं ।।६१।। अनुभवामृत ।।*

अर्थात शिष्य आणि सद्‌गुरू या दोन्ही पदांचा एकच अर्थ तो म्हणजे सद्‌गुरू. दोन्ही ठिकाणी एकत्व आहे, ते सद्‌गुरूतच आहे. सुवर्ण आणि लेणे, चंद्र आणि चांदणे, कापूर आणि परिमळ, गुळ आणि गोडी या प्रमाणांप्रमाणे -

*तैसे गुरूशिष्य मिसें । हाचि एकु उल्हासे ।*
*जऱ्ही कांही दिसे । दोनीपणे ।।६८।।*

अर्थात गुरूशिष्य द्वैत भासमान झाले; तरी त्या दोघातही हाच एक सद्‌गुरू उल्हासत असतो.

३. भक्तियोगाच्या माध्यमातून असे भज्य, भक्ति आणि भक्त यांत सामरस्य साधता येते. हे सामरस्य चराचराच्या ठिकाणी भोगता यावे, यासाठी नारदीय भक्तियोग परंपरा अर्थात नारदांची भक्ति संकल्पना स्वीकार्य होय. ही संकल्पना व्यक्ति आणि समष्टीला सारख्याच उत्कटपणाने हे सामरस्य घडविण्यास समर्थ आहे. म्हणूनच श्री संत ज्ञानेश्वरांच्या मार्गदर्शनानुसार श्री नारदांपासून प्रचलित असलेली ही नारदीय भक्तिपरंपरा, भागवत धर्मात प्रसारित केली. स्वतः प्रवचन किंवा टीकाविधी स्वरूपातील, सामूहिक विधिनाट्यात्मकतेने, त्या भक्तीचे, प्रेमरूपा अवस्थेचे अनुसरण केले. त्यासाठीच कीर्तन, भजन आणि नित्यावर्तन, यासाठी स्फुट अभंगरचना, गोळणी, रूपके लिहिली. अर्थात भजन कीर्तनाचा अनुसार केला. नित्यक्रमासाठी 'हरिपाठाचे' अभंग लिहिले. भक्तीच्या व्यक्तिगत अवस्थेसह, समूहाला अर्थात 'लोक'लाही, अष्टसात्विकभावासह हा भज्य-भक्ति-भक्त-सामरस्य सुखसोहळा भोगण्याची अनुभूती मिळावी त्यासाठी विठ्ठलभक्तीचा अर्थात 'सगुण भक्ती'चा पाया घातला. सहज सोपेपणाने, नामस्मरणभक्ति सर्वकाळ करता येते हे दाखवून दिले. 'दळिता कांडिता तुज गायिन अनंता' असे, कर्मब्रह्मरूप करण्याची कळ लोकाहाती सोपविली. श्री ज्ञानेश्वरांचे हरिपाठाचे अभंग ही भागवतांची त्रिकाल संध्या झाली. 'सहजयोग' अर्थात सहजभक्तियोग प्रकट केला. त्यांनी स्वतःबरोबर सर्वांना संथा दिली – त्यासाठी विठ्ठलध्यानाचे मंगलाचरण केले –

*सुंदर ते ध्यान उभें विटेवरी ।*
*करकटेवरी ठेवूनिया ।।१।।*
*तुळसी हार गळा कांसे पितांबर ।*
*आवडें निरंतर हेंचि ध्यान ।।२।।*
*मकरकुंडले तळपति श्रवणीं ।*
*कंठीं कौस्तुभमणी विराजित ।।३।।*



*तुका म्हणे माझे हेचि सर्वसुख ।*
*पाहीन श्रीमुख आवडीनें ।।४।।*

या लौकिक सगुण रूपाचे नामस्मरण 'परब्रह्मस्वरूप' होण्याचा योग साधू शकेल; ही नारदीय परंपरेची 'लोक'सागराला सांगी. म्हणूनच

*देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ।*
*तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।।१।।*
*हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा ।*
*पुण्याची गणना कोण करी ।।२।।*
*असोनि संसारीं जिव्हे वेगु करीं ।*
*वेद शास्त्र उभारी बाह्या सदा ।।३।।*
*ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणें ।*
*द्वारकेचे राणे पांडवा घरी ।।४।।*

या हरिपाठातील 'असोनि संसारी जिव्हें वेगु करीं' आणि 'वेद शास्त्र उभारी बाह्या सदा' ही सांगी समूहभक्तीला आणि 'जगत्सत्' आणि 'ब्रह्मसत्' या गोष्टींना कर्मपरतेने आवाहित करते. 'कर्मज्ञानवान' होण्यासाठीचा हा शास्त्रबाह्य असा, आत्मसुख देणारा विधी करण्याची सांगी, नाथ संप्रदायाची परंपरा सांगणारे श्री ज्ञानेश्वर योगेश्वर श्रीकृष्णाच्या प्रमाणाने आणि शांकर तत्त्वज्ञानासह देण्याचा प्रयत्न; रूढीग्रस्ततेविरुद्ध बंड उभारून करतात. हेच त्यांचे भागवत संप्रदायाचे पाया भरण असते. 'वेदप्रामाण्य' लोकांतात; तत्त्वज्ञानाला, प्रमाणे देऊन रुजविण्याचा श्री ज्ञानेश्वरांचा प्रयत्न म्हणजे; आपद्‌काली आपल्या लेकरांना परिस्थितीवर मात करण्याचे बाळकडू देतांना, परिस्थितीनुरूप दुःखे झेलतांनाही; मानव्य आणि शाश्वत मूल्य राखण्याचे बाळकडू देण्यासारखे आहे. हे ऋषींपासून सुरू असलेले कार्य भागवत संप्रदायाच्या पायाभरणीसाठी आणले हे लक्षात घ्यावे लागते.

४. भागवत धर्माची पायाभरणीच नव्हे; तर पायारचणी करणारे

श्री संत ज्ञानेश्वरांची प्रेरणा, दृष्टी आणि भूमिका परंपरेसह पुन्हा पुन्हा लक्षात घेतल्याशिवाय 'भक्तियोग' मार्गाची अर्थात नवविधाभक्तीची म्हणजे सगुण भक्तिमार्गाची, परंपरा लक्षात घेता येत नाही. भागवत धर्माची इमारत ज्या पायावर उभी आहे; तो पाया कोणत्या भूमीवर किंवा भूमीत रोविला आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय दिमाखदार कळसाची फडकती यशपताका अनुभवता येणार नाही. ही भूमिका कशी तयार झाली? युक्त किंवा शुद्ध झाली अर्थात कशी सिद्ध केली; हे समजून घेतांना; श्री ज्ञानेश्वरांच्या एकूण वाङ्मयावर आणि व्यक्तिमत्त्वावर लक्ष केंद्रित करावे लागते. त्यात **(i)** श्री ज्ञानेश्वर वेदप्रामाण्य मानणाऱ्या भाष्याकारांना अर्थात आद्यशंकराचार्यांना वाट पुसत तत्त्वज्ञान खंडन मंडन करतात हे श्री ज्ञानेश्वरीच्या प्रथम अध्यायातील पहिल्या पंचवीस ओव्यांच्या प्रमाणावरून स्पष्ट होते. त्यांनी वेदप्रतिपादन करणाऱ्या, स्वसंवेद्य, आत्मरूप ॐकारास प्रथम वंदन केले. पाठोपाठ श्री गणेशांना वंदन केले आहे. तेथे वेदप्रामाण्यविषयक सर्वथा चर्चा करणाऱ्या आणि त्याआधारे धारणात्मकतेने व्यवहार करणाऱ्या, सर्व शब्दब्रह्मांची कल्पना गणेशांच्या ठायी करीत गणेशांना वंदन केले. त्यापाठोपाठ सद्गुरू आणि शारदेला वंदन केले आहे हा केवळ उपचार नाही. त्या मंगलाचरणातील उल्लेख मुद्दाम केले आहेत. आणि ते उल्लेख, श्री ज्ञानेश्वरांची भागवतधर्म भूमिका कशातून प्रकटली हे सूचित करणारे आहेत.

*ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।*
*जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।*
*देवा तूंचि गणेशु । सकलमतिप्रकाशु ।*
*म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।२।।*
*हे शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष ।*
*तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।।३।।*
*स्मृति तेचि अवयव । देखा अंगीक भाव ।*



*तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ।।४।।*
*अष्टादश पुराणें । तेचि मणिभूषणें ।*
*पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांची ।।५।।*
*पदबंध नागर । तेंचि रंगाथिलें अंबर ।*
*जेथ साहित्य वाणे सपूर । उजाळाचें ।।६।।*
*देखा काव्यनाटका । जे निर्धारितां सकौतुका ।*
*त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ।।७।।*
*नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहता कुसरी ।*
*दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भली ।।८।।*
*तेथव्यासादिकांच्या मती । तेचि मेखळा मिरवती ।*
*चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ।।९।।*
*देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भूजांची आकृती ।*
*म्हणऊनि विसंवादे धरिती । आयुधे हातीं ।।१०।।*
*तरी तर्कु तोचि परशु । नीतिभेदु अंकुशु ।*
*वेदान्तु तो महारसु । मोदकु मिरवे ।।११।।*
*एके हाती दंतु । जो स्वभावता खंडितु ।*
*तो बौद्धमत संकेतु । वार्तिकांचा ।।१२।।*
*मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु ।*
*धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ।।१३।।*

केवळ वाङ्मयशोभा वाढविण्यासाठी हे सर्व उल्लेख आलेले नाहीत. सांगरूपकाने वाङ्मयशोभा तर वाढलीच परंतु कोणत्या भूमिकेवरून धर्माचे पुनर्स्थापन करावयाचे आहे, हे येथे स्पष्ट आहे. **(ii)** स्वतःला 'निवृत्तिदासु' असे या मंगलाचरणात म्हणून त्यांनी सद्गुरू परंपरा उल्लेखिली आहे –

*मज हृदयी सद्गुरू । जेणें तारिलों हा संसारपुरू ।*
*म्हणऊनि विशेषे अत्यादरू । विवेकावरी ।।२२।।*

(ज्ञा.अ. १)

श्री ज्ञानेश्वरांचा मनःपिंड सद्‌गुरू संस्काराने विवेकसंपन्न झाला आहे. ते संस्कार ज्या मार्गाने आले, ती गुरूपरंपरा श्री ज्ञानदेवांनी स्पष्टपणे मांडली आहे. श्री ज्ञानेश्वरांवर सिद्ध-समाधी योग परंपरांचे संस्कार होते. हे योगी 'अद्वैत' मताचे होते. वेदप्रामाण्य अर्थात वेदांत मानणारे होते हे लक्षात घेतले पाहिजे.

*तैसे अध्यात्मशास्त्रीं यिये । अंतरंगचि अधिकारिये ।*
*परी लोकु वाक्‌चातुर्ये । होईल सुखिया ।।७४९।।*
*ऐसें श्रीनिवृत्तीनाथाचें । गौरव आहे जी साचें ।*
*ग्रंथु नोहे हे कृपेचें । वैभव इये ।।५०।।*
*क्षीरसिंधुपरिसरीं । शक्तीचा कर्णकुहरीं ।*
*नेणों कें श्रीत्रिपुरारीं । सांगितलें जे ।।५१।।*
*तें क्षीरकल्लोळा आंतु । मकरोदरीं गुप्तु ।*
*होतो तयाचा हातु । पैठे जालें ।।५२।।*
*तो मत्सेंद्र सप्तश्रृंगी । भग्नावयवा चौरंगी ।*
*भेटला तो सर्वांगी । संपूर्ण जाला ।।५३।।*
*मग समाधि अव्युत्पया । भोगावी वासना यया ।*
*ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ।।५४।।*
*तेणें योगब्जिना सरोवरू । विषयविध्वंसैकवीरू ।*
*तिये पदीं का सर्वेश्वरू । अभिषेकिले ।।५५।।*
*मग तिही ते शांभव । अद्वयानंदवैभव ।*
*संपादिलें सप्रभव । श्रीगहिनीनाथा ।।५६।।*
*तेणें कळि कळितु भूतां । आला देखोनि निरूता ।*
*ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ।।५७।।*
*ना आदिगुरू शंकरा । लागोनि शिष्यपरंपरा ।*
*बोधाचा हा संसारा । जाला जो आमुते ।।५८।।*

नाथपरंपरेने आलेली शांभवी-शांकरी अनुभूती भोगण्यासाठी आणि प्रसिद्ध करण्यासाठी 'अनुभवांमृत' अर्थात अमृतानुभव आणला; तरी देखील श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर टीका करण्याची आज्ञा श्री निवृत्तीनाथांकडून ज्ञाननाथांनी स्वीकारली याचे कारण बहुतांशी श्री गुरूगोरक्षनाथांच्या 'सिद्धसिद्धान्तपद्धति' या ग्रंथातून स्पष्ट होते. श्री गुरूगोरक्षनाथांच्या उदार आणि सर्वव्यापी दृष्टीमुळे सिद्धयोगी नाथ संप्रदायाचे 'अद्वैत' तत्त्वज्ञान शांभवी विद्या, अधिक उदारतेने सर्वांपर्यंत पोहोचावयाची असेल तर; ती विविध मतांमध्ये आणि रूढीग्रस्ततेत अडकून गुप्त आणि कुंठीत होता कामा नये; हे गुरूगोरक्षनाथांनी लक्षात घेतले आणि सिद्धसिद्धान्तपद्धति मंडित करताना ही उदारता अवधूत लक्षणांसह, उपदेश प्रकरणात स्पष्टपणे मांडली. त्यांना सिद्धमताचे स्पष्ट आणि ठाम मंडन करावयाचे असले तरी समाधीयोगातही भक्तीची अनन्यता स्पष्ट आहे. ही उत्कटता 'पिंडे पिंडाचा ग्रासु' करून अमनस्क योग साधणे आणि अमनस्क योगांतून समाधीचा आनंद लुटणे; त्यांना अभिप्रेत होते हे खरे. तरी त्यांनी अन्य सर्व अतिरेकी अथवा आग्रही, वितंडकारी मतांचे खंडन करून; परब्रह्मविषयक भक्तीची अनन्यता स्पष्ट केली ही मोठीच कामगिरी होय. खंडन करताना प्रसंगी -

- गुरूगोरक्षनाथांनी विविध मतांचे उन्नयन करण्याची दृष्टी अनुसरली. उदा. शाक्त तांत्रिकांचे पंचमकार त्यांनी उन्नयनित केले -

*मदो मद्यं मतिर्मुद्रा माया मीनं मनः पलम् ।*
*मूर्च्छनं मैथुनं यस्य तेनाऽसौ शाक्त उच्चेते ।।५१।।*
*यथा भासस्फुरद्रूपं कृतं चैव स्फुटं बलात ।*
*तां शक्ति यो विजानाति शाक्तः सेऽक्षाभिधीयते ।।५२।।*
*यः करोति निरूत्थानं कर्तृचित्प्रसरेत्सदा ।*
*तद्विश्रान्तिस्तया शक्त्या शाक्तः सोऽत्राभिधीयते ।।५३।।*

मद हे मद्य, मति ही मुद्रा, माया हा मीन, मन हें मांस, मूर्च्छा हेच मैथून असे जो मानतो तो शाक्त होय. याचा अर्थ सरळ आहे कर्मठपणा,

तांत्रिकता यांत अडकण्यापेक्षा शरीर आणि मनाचे 'लक्ष्य'केंद्री, अर्थात ब्राह्मस्वरूप होण्याची अनन्य कांक्षा श्री गुरूगोरक्षनाथांना महत्त्वाची वाटते. पुढे श्लोक क्र. ७६ ते ७९ मध्ये गुरूगोरक्षनाथांनी अध्यात्म क्षेत्रातील विविध विचार व आचारप्रणालींचा खंडन व मूल्यमापनात्मक विचार करून; सिद्धमत सर्वश्रेष्ठ असल्याचे घोषित केले आहे –

*वेदान्ती बहुतर्ककर्कशमतिर्ग्रस्तः परं मायया ।*
*भाट्टाः कर्मफलाकुलाहृतधियो द्वैतेन वैशेषिका ।*
*अन्ये भेदरताः विवाद विकला स्ते तत्त्वतोवञ्चिताः*
*(सत्तत्त्वतोवञ्चिताः) ।*
*तस्मात्सिद्धमतं स्वभावसमयं धीरः सदा संश्रयेत् ।।७६।।*
*सांख्या वैष्णवा वैदिका विधिपराः संन्यासिनस्तापसाः ।*
*सौरा वीरपराः प्रपञ्चनिरता, बोद्धा जिनाः श्रावकाः ।*
*एते कष्टरता वृथापथगतास्ते सत्तत्त्वेतो वञ्चिताः ।*
*तस्मात्सिद्धमत् स्वभावसमयं धीरः सदा संश्रयेत ।।७७।।*

या प्रमाणे वेदांती, भाट्ट, वैशेषिक, सांख्य, वैष्णव, पांचरात्र, वैदिक विधिनिषेधतत्पर, संन्यासी, तापसी, सूर्योपासक, वीर, बौद्ध, जैन यांचे खंडन केले आहे.

श्री ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात, स्वरूपानंद प्रकरणात सिद्धमताचे विवेचन केले आहे. आणि चिद्विलासवाद मांडला आहे. तरीही श्री ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर टीका करण्याचे ठरविले; याचे स्पष्ट कारण सिद्धयोगी यांपेक्षा संसारप्रपंच करणारांना बरोबर घेऊन; स्वरूपानंद भोगणे त्यांना आवश्यक वाटले. श्री निवृत्तीनाथांनी वडीलकीच्या आणि गुरूत्वाच्या अधिकाराने; श्री गुरूगोरक्षनाथांची उदार व स्वरूपानंदलक्ष्यी दृष्टी स्वीकारून चराचराला स्वरूपानंद भोगण्यासाठी योगेश्वर कृष्णांचा मार्ग स्वीकारला. याचेही कारण स्पष्ट आहे की; नाथसंप्रदाय हा 'शिव–शांभवी' अद्वैत सांप्रदाय मानणारा सिद्धयोगी संप्रदाय असला तरी; तो



संप्रदाय नवनारायणाचे अवतार स्वरूपात प्रकटला असल्याची धारणा होती आणि नारायण–श्रीकृष्ण – अर्थात भगवान विष्णू हेच शिवांचे सगुण निर्गुण परमभज्य होय. म्हणूनच श्रीकृष्णांनी म्हणजे नारायणांनी नराला प्रतिबोधित केलेली श्रीमद्भगवद्गीता टीकेसाठी स्वीकारून; नर अर्थात मानवी जीव यांनी स्वरूपानंद भोगण्याचा मार्ग प्रशस्त केला.

**(iii)** भगवान श्रीकृष्णांनी प्राश्निक अर्जुनाला प्रामुख्याने विभूति योग आणि विश्वरूपदर्शन योग तसेच प्रकृतिपुरुषविवेक योग, गुणातीत योग, पुरुषोत्तम योग, दैवासुरपंदद्विभाग योग, श्रद्धादिनिरुपण योग यांचे दर्शनात्मक निरुपण करून; 'ब्रह्मसत्यम्' आणि 'जगतसत्यम' यांचा अन्योन्यसंबंध दर्शवून एकप्रकारे चराचरात्मक परब्रह्माच्या अस्तित्वाची कर्मयोगात्मक, वर्तनात्मकतेने भक्तियोगपूर्वक सेवासाधना करूनही; भक्तियोगाच्या माध्यमातून अन्य सर्व मार्गांना सेवासाधना करूनही; भक्तियोगाच्या माध्यमातून अन्य सर्व मार्गांना अभिप्रेत असलेली; परब्रह्मस्वरूप अनुभूती घेता येऊ शकते ह्याकडे लक्ष वेधले. सनातन कालापासून श्री नारदांनी भक्तिसाधनेसह चराचराच्या कल्याणासाठी सुरअसूर मानव आदि सर्व प्रकारच्या भूतमात्रांमध्ये संचारपूर्वक सत्संगसाधना करण्याची परंपरा निर्माण केली होती. ती समस्त लोकसमूदायांत भजन, पूजन, कीर्तनादि नवविधाभक्तीसह कशी अवलंबिता येते हेच स्पष्ट केले होते. ते भक्तियोगाच्या माध्यमातून साधत असतांनाही भक्तियोगी योगी हा परब्रह्मस्वरूपानंद मिळवू शकतो हेच दाखवून दिले. आणि प्राप्त परिस्थितीत –

*श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात स्वनुष्टितात् ।*
*स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।।*

(अ. ३ – २५ भ.गी.)

प्राप्त स्वधर्म लौकिकजीवनात, (अनुबंधाने आलेले स्वप्राप्त कर्म) विहिततेने करावा. परधर्माच्या मोहात पडू नये. असे प्राप्त परिस्थितीत प्राप्तविहित

कर्म नेहमीच दुःखकारक वाटते. परंतु तेच स्वतःस पेलणारे असते; हे लक्षात घेऊन; कर्तव्यतत्परतेने आसक्तिविरहिततेने ते करावे आणि संसारात अलिप्ततेने, नवविधाभक्तिमार्गाने हरिभक्तीपरायण व्हावे; असे प्रबोधन भगवद्गीतेच्या माध्यमातून करतांनाच; चातुर्वर्ण्य व पुरुषार्थ स्वतःच्या अधीन असतो हे अधोरेखित केले. कर्तृत्वाची क्षमता लक्षात घेऊन; आपले प्राप्त परिस्थितीत धर्मकर्म ठरविता येते हेही स्पष्ट केले. स्वातंत्र्य, क्षमता, तत्परता आणि परमात्म साधनेतील आत्मनिष्ठा याकडे लक्ष केंद्रित करण्याचा प्रबोध करून; ज्ञानेश्वरांनी अध्यात्मानुभूतीविषयक घोषणा केली – 'आनंदाचे आवारू मांडू
जगा ।' सर्वात्मक परमेश्वराच्या अनुभूतीसह कर्मनिष्ठेने जीवन व्यतित केले तर 'पसायदाना'तील चराचराच्या सुखात्मकतेची, अध्यात्मनिष्ठ परमेश्वरी इच्छा सफल होण्याची ग्वाही दिली. श्री योगेश्वर श्रीकृष्णांच्या समन्वय व सामरस्यात्मक सर्वात्मक आनंदकारक भूमिकेचा पुरस्कार; संघर्षमय दुःखकारक लोकजीवनाचा उद्धार करण्यासाठी श्री ज्ञानेश्वरांनी केला. भक्तिमार्ग अथवा भागवत धर्माची भूमिका तयार करण्यासाठी श्रीमद्भगवद्गीतेचा उपयोग झालाच. त्याबरोबरच परमप्रेमरूपा, भक्तिसाधनेसाठी श्रीमद्भागवत ग्रंथाचाही विचार त्यामुळेच पुढे एकनाथांनी पुरस्कृत केला. याचाच सरळ अर्थ असा की, द्वापारयुगातील भारतीय महायुद्धानंतरच्या काळात, सर्वसमावेशक असा 'भागवत धर्म' भक्तियोगाच्या मार्गाने सर्वांना परब्रह्मसुखसोहळा भोगण्याचे सामर्थ्य लोकांतात प्रदान करू शकेल याची खात्री पटली आणि भगवंतांच्या सगुणभक्तीचा प्रकर्ष करून; श्री ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माच्या परंपरेला बळ देऊन केला. अशी वेद, उपनिषदे, दर्शने इ. सर्व शब्दब्रह्म आणि अनेकविध योग मार्ग, यांच्यातून संशोधनपूर्वक भागवत धर्माकरिता भूमिका प्रसिद्ध केली गेली आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

५. श्री संत ज्ञानेश्वरांनी पूर्वसूरींनी निर्माण केलेल्या पुण्यभूमिकेचा



मोठ्या योजकतेने जगतासाठी उपयोग केला. 'श्री विठ्ठल' हे सगुणभक्तीसाठी भज्य समोर ठेवून; 'सगुण निर्गुण एकु गोविंदु रे' असे म्हणत प्रपंच आणि परमार्थाचे अद्वैत समोर प्रस्थापित केले.

*'आजी संसार सुफल झाला गे माये ।*
*देखियेले पाय विठोबाचे ।।१।।'*

असा परमार्थ संसारात आणला. संसाराची आसक्ति पांडुरंगचरणी निर्माण केली. आसक्तीचे 'लक्ष्य' परमार्थ झाले!

श्री ज्ञानेश्वरांनी भागवतधर्माची, भक्तियोगमार्गी मुहूर्तमेढ रोवली त्याचा अनुकार नामदेवांपासून श्री तुकोबांपर्यंत आणि उत्तरकाळातील हरिभक्तीपरायण वारकरी, वैष्णव यांनी दृढ भावाने आणि सव्यसाचित्वाने केला आणि करीत आहेत. 'दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले । बापरखुमादेवी वरू मज ऐसे केले' ही भक्तीची उत्कटता, अनन्यताच नव्हे तर; भक्तियोगातील स्वस्वरूपानंदअनुभूती क्षमता प्रत्येकात निर्माण झाली. ऋषींचा मार्ग, भक्तियोग मार्गे वैष्णवांनी सर्वात्मक केला.

श्री नामदेवांनी 'भक्तीवीण मोक्ष नाही । वेद बोले हात उभारूनी ।। असे घोषित केले. संत जनाबाईंनी श्री विठ्ठलाला सांसारिक केले. 'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा' असे म्हणून प्रत्येक वैष्णव श्रीकृष्णस्वरूप झाल्याचे अनुभवले. मुक्ताबाईंनी 'नामेचि वैकुंठा गणिका गेली' हा अनुभव सांगितला. महारी चोखयाची म्हणते, 'अवघ्या उपाधी तुटताती नामें । भाविकांसी वर्म सोपें हेचि ।।'

गोरोबाकाका 'केशवाचे ध्यान धरोनि अंतरी । मृत्तिकेमाझारी नाचतसे ।।' तर सावता म्हणतात, 'वैकुंठीचा देव आणुया कीर्तनी । विठ्ठल गाऊनी नाचे रंगी ।। एकनाथ महाराजांनी 'वेदांचा विवेक शास्त्रांचा हो बोध । तो हा परमानंद विठ्ठलमूर्ती ।। असे म्हणून ही भक्तियोग भागवत परंपरा भक्कम केली. संत कबीरांनी 'भक्ती विमुख जो धरम ताहि अपधम करि गायो' असे म्हणून भक्तीची पताका उंचावली. हृदयात

गोविंद अनुभवणारे शेख महंमद म्हणतात, 'अहिंसा विज्ञान दुःखी सुख कळले । आत्मज्ञान फळले शेख महंमद ।।' संत रामदास म्हणतात, 'भगवद्‌भक्ती हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम । काळसार्थक हाचि परम लाभ जाणावा ।। या सर्व संतांचा मार्ग तुकाराम महाराजांनी कळसाला पोहचविला 'तुका म्हणे भेदाभेद । गेला वाद सांडोनी ।।' त्यांनी भागवतांचा मार्ग सोपा करून सर्वात्मक केला –

*'मुखी नाम हाती मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांची ।।१।।*
*वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा वस्तूंसी ।।२।।*
*भस्म दंड नलगे काठी । तीर्था आटी भ्रमण ।।३।।*
*तुका म्हणे आडकाठी । नाही भेटी देवाचे ।।४।।'*

संसार हा आसक्तिरहिततेने करतांना पांडुरंगचरणीच आसक्ति असावी असे सांगत, 'तुका म्हणे माझी नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वाचोनियां ।।' म्हणून 'तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख ।' अशी ग्वाही देऊन; भ्रामक संसाराचे अवघे पाखांड खंडन केले –

*'आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।*
*बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ।।१।।*
*पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।*
*तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।।'*

असे सांगतांनाच ही भक्ति कशी असावी हेही तुकाराम महाराजांनी सांसारिकांना सांगितले –

*आसन, शयन भोजन गोविंद ।*
*भरलें आनंदे त्रिभुवन ।।१।।*
*अवघिया केली काळे तडातोडी ।*
*अवसरे घडी पुरों नये ।।२।।*
*वांटणी घातले शरीराचे भाग ।*
*दुजियाचा लाग खंडियेला ।।३।।*



*आवडीच्या आलें आहारासी रूप ।*
*पृथक संकल्प मावळले ।।४।।*
*काम तरी क्रोधबुद्धि मन नासे ।*
*भ्रमाचे वोळसें गिळलें शांती ।।५।।*
*तुका म्हणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ।।६।।*

अशी एकविध भक्ति घडू लागली की 'आनंदाचे डोही, आनंद तरंग' असा अनुभव येतो. आणि अवघी शारीर आसक्ति गळून पडते आणि चराचरात भक्तच ब्रह्मस्वरूप असल्याचे अनुभवास येते हेच अद्वैत; म्हणजेच भक्तियोगाची परमावधी भोगता येते – 'अणुरेणुया थोकडा । तुका आकाशा एवढा ।।' हा अनुभव प्रत्येक भक्ताला येतो आणि प्रत्येक परब्रह्मस्वरूप झालेला भक्त लोकसमूहासाठी 'आता उरलो उपकारा पुरता' अशा चराचराच्या सेवेला अर्थात स्वस्वरूप सेवेला प्रवृत्त होतो. हाच भक्तीचा कळस! तुकाराम महाराजांनी भागवत धर्माला असे कळसास पोचविले. वर्तमानातील मानवी अवस्थतेत 'ज्ञानकर्मवान आणि कर्मज्ञानवान' हे कविवर्य मंगेशकरांचे अपेक्षित घडण्याचा, सर्वलोक सच्चिदानंदस्वरूप होण्याचा हाच मार्ग होय.

**समोराप** : श्री तुकारामोत्तर काळात आजतागायत आणि पुढेही प्रलयापर्यंत मनुष्यमात्रांला कर्मात्मक आणि सेवात्मक असा हा सहजयोग मार्ग म्हणजे 'भक्तियोग'मार्ग देणारा, भागवत धर्म होय! संत बहिणाबाई म्हणतात –

*'संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।*
*ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।*
*नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें ते आवारा ।।३।।*
*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।४।।*
*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।५।।*
*बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपणा केले ओजा ।।६।।'*

भागवत धर्माची इमारत कळसा जाऊन विजयपताका फडकत आहेत हे खरेच. मात्र या इमारतीची पुण्यभूमी त्या अगोदर सनातनपणे तयार होत होती आणि त्या भूमीचा अद्वैत गंध प्रसारित करण्याचे काम यज्ञकर्म, अर्थात त्यागपूर्ण सेवाभाव प्रकटवून सर्वाभूती परब्रह्माचा गंध प्रकटविण्याचे कार्य; फडकणारी पताका करीत आहे असे प्रमाण संतांचे वाङ्मय आणि साधना देत आहे. म्हणूनच प्रशस्ती जोडाविशी वाटते –

*कैवल्य कृपा झाली । सच्चिदानंद दीपावली ।*
*झाले ऋषी वेदोपनिषद । एकाक्षराचे भांडार ।*
*नारद कृष्ण गोरक्ष । अवघे उघडिले कवाड ।*
*सद्‌गुरूनाथे धरिले हाता । धर्मभूमी केले ओजा ।*

याच धर्मभूमीवर भागवतधर्माची सूर्यतेजस्वी इमारत उभी राहिली आणि विजयपताका लहरू लागली.

* * *



# भक्तियोगाचा ‘समर्थ’ विनियोग

‘दासबोध’ ग्रंथाच्या पहिल्या दशकात, पहिल्या समासातच ग्रंथनिरुपणाचे कारण ‘भक्तिमार्ग’ विशद करणे; हे स्पष्टपणे समर्थ रामदासांनी सांगितले आहे –

*‘ग्रंथा नाम दासबोध । गुरूशिष्य संवाद ।*
*येथे बोलला विशद । भक्तिमार्ग ।।*
*नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण ।*
*बहुधा अध्यात्मनिरोपण । निरोपिले ।।३।।*
*भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव ।*
*ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथी ।।४।।*
*मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्धज्ञानाचा निश्चयो ।*
*अलिप्तपणाचा निश्चयो । बोलिला असे ।।५।।*

भक्तिमार्गाच्या प्रस्थापनेसाठी आपण ‘दासबोध’ मांडतो आहोत हे स्पष्ट करून; रामदासांनी थेट, नम्रपणे, तेव्हढ्याच उपरोधपूर्ण सूचकतेसह उपदेशपूर्वक माणसाच्या मनालाच सांगितले –

*‘मना सज्जना भक्ति पंथेची जावे ।*
*तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।।’*

समकालीन भागवत संतांनी लोकधारणेसाठी आणि प्रपंची राहून परमार्थ साधण्यासाठी स्वीकारलेला भक्तिमार्ग, रामदासांनी स्वीकारला, हे अगदी

उघड आहे. म्हणूनच लोकधारक विष्णूतत्त्व हेच उपास्य अथवा भज्य म्हणून स्वीकारले. भेद एवढाच की भागवत संतांनी, निखळ भक्तिसाधनेने, अध्यात्म सिद्धी प्राप्तीस अनुकूल; अर्थात सच्चिदानंदपदी नेण्यास अनुकूल; असा विष्णूअवतार श्रीकृष्ण हे उपास्य स्वीकारले व त्यातही भूवैकुंठ निर्मिती करणारे; कर कटेवरी ठेऊन; अठ्ठावीस युगे भक्तीची अनन्यता अनुभवीत भक्तांना सच्चिदानंदपदी घेऊन जाणारे दैवत; श्रीविठ्ठल हे स्वीकारले श्री समर्थ रामदासांनी कोदंडधारी श्रीराम हे भज्य स्वीकारले आणि भक्त पुंडलिकांदि ऐवजी श्री हनुमानांचा आदर्श, भक्तमंडळींसमोर ठेवला. भागवत संप्रदाय आणि रामदासी संप्रदाय हे दोन्ही संप्रदाय 'भक्तियोगी' किंवा भक्तिमार्गी संप्रदायच होत. हे लक्षात घेतले तर तुलनात्मक विचार करता साम्यदर्शक गोष्टीच समोर येतात. मात्र मार्गसारणीच्या काही अपवादात्मक गोष्टी वेगळेपणाने विचारात घेता येतात.

१. भागवत संप्रदाय आणि समर्थ रामदास निर्मित रामदासी संप्रदाय या दोन्ही संप्रदायांनी, श्री नारदांनी सांगितलेली नवविधाभक्ती ही गुणमाहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति, दासासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयासक्ति, परमविरहासक्ति अशा अकरा आसक्तींसह –

*'श्रवणं कीर्तनं विष्णो । स्मरणं पादसेवनम् ।*
*अर्चनं वंदनं दास्यं । सख्यमात्मनिवेदनम् ।।'*

अशी नवविधा भक्तीची परंपरा अनुसरली.

*'नाना ग्रंथांच्या समती । उपनिषदें वेदांत श्रृती ।*
*आणि मुख्य आत्मप्रचिती । शास्त्रेंसहित ।।'*

असे, श्रृती, स्मृती, पुराणे, षट्शास्त्रे आदि प्राचीन ऋषीपरंपरेने आलेले ब्रह्मविद्या प्रसृत करणारे ग्रंथ, श्रीमद्‌भगवद्गीतेसह रामदासांनीही स्वीकारले. एव्हढेच नव्हे तर तोच दासबोधाचा विषय असल्याचे स्पष्ट केले. तसेच ते दासबोधात पाहावयासही मिळते.



भागवत परंपरेत आलेला नाथसंप्रदायातील समाधी योगमार्ग रामदासी संप्रदायातही आलेला दिसतो. नाथसंप्रदायाच्याच प्रभावामुळे योगशास्त्रटीका निरनिराळ्या सिद्धसाधकांनी किंवा योगी, समर्थ यांनी केली. उदा. रामदास पूर्व काळातील श्री स्वामी समर्थ त्र्यंबकराज यांचा 'बालावबोध' किंवा 'बालबोध' ग्रंथ व त्यांनी स्थापन केलेला 'सिद्ध' संप्रदाय, त्यांचेही परिशीलन रामदासांनी केलेले दिसते. एव्हढेच नव्हे तर–

*'शिवगीता, रामगीता । गुरूगीता गर्भगीता ।*
*उत्तरगीता, अवधूतगीता । वेद आणि वेदांत ।।*
*भगवद्गीता, ब्रह्मगीता । हंसगीता पांपडवगीता ।।*
*गणेशगीता, येमगीता । उपनिषदे भागवत ।।*
*इत्यादिक नाना ग्रंथ । समतीस बोलिले येथ ।*
*भगवद्वाक्यें येथार्थ । निश्चयेंसीं ।।'*

असे सर्व प्रकारचे प्राचीन आणि पूर्वसूरींचे ज्ञान भागवत परंपरेप्रमाणे रामदासांनी स्वीकारून; त्यामागील समन्वय आणि संशोधनाची दृष्टी स्पष्ट केली आहे –

*'पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगा च ठेवी जो दूषण ।*
*तो दूरात्मा दुराभिमान । मत्सरे करी ।।'*

सद्गुरूपरंपरेत साम्य दिसते ते असे की नाथसंप्रदायांप्रमाणे आदिनाथ शिवापासूनची परंपरा सांगितलेली आढळली तरी सद्गुरू आणि परमात्मा किंवा भज्य यांत अद्वैत पाहम्याची परंपरा दिसते. श्रीकृष्णांना जगद्गुरू मानले आहे हेही लक्षणीय आहे. तसेच श्री ज्ञानेश्वर आणि श्री संत तुकाराम यांनाही श्री विष्णू अवतार मानले आहे. येथे एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते की श्री विष्णू हे शिवोपासक आहेत. एव्हढेच नव्हे तर शिव आणि विष्णू यांतील अभेद पाहण्याची परंपरा आणि साधना दृष्टी भागवत संतांमध्ये पाहावयास मिळते. श्री विठ्ठलांनी तर शिवास मस्तकी धारण

केले आहे. नारदांनी मांडलेली भक्तिसूत्रें म्हणजे नारदांनी सांगितलेले 'शिवानुशासन' आहे. श्री समर्थ रामदासांनी शिवविष्णू अद्वैत श्री प्रभुरामचंद्रांमध्ये दोन तऱ्हेने अनुभवले; एक म्हणजे श्रीराम शिवोपासक आहेत तर दुसरे प्रभु रामचंद्रांचे दास्य स्वीकारणारे, दास्यभक्तियुक्त श्री हनुमान आदर्श मानले आहेत. तसेच रामदासांनीही नमनामध्येच –

*'गणेशः शारदा चैव सद्‌गुरूः सज्जनस्तथा ।*
*आराध्यदैवतं गुह्यं सर्वंमे सधुनंदनः ।।'*

असे निवेदन करून सद्‌गुरू व शिष्य यांचेही अद्वैत पाहिले आहे. भागवत संतांनी सद्‌गुरू व शिष्य यांचे अद्वैत मानले आहे. श्री संत एकनाथ, श्री संत शेख महंमद ही यांची समकालीन उदाहरणे म्हणता येतील. श्री संत ज्ञानेश्वरांनीही असे अद्वैत कल्पिले आहे. रामदास गुरूपरंपरेविषयी म्हणतात –

*'गणेश शारदा सद्‌गुरू । संत सज्जन कुळेश्वरू ।*
*सर्वहि माझा रघुवीर । सद्‌गुरू कृपे ।।'*

सद्‌गुरू कृपेच्या संदर्भात 'पारमार्थिक दृष्ट्या सोलिवसुख' या श्री कल्याणस्वामी (बहुधा) यांच्या रचनेत आलेला उल्लेख श्री समर्थांच्या सद्‌गुरूचा निर्देशक आहे असे म्हणण्यास जागा आहे –

*आपण आपणा ते पावे । ऐसे माझे मनी बोलावे ।*
*ते दातारे गोचर करावे । रोकडे ब्रह्म ।।६।।*
*ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी ।*
*ज्ञानाचे भरते आले स्वामी लागोनि ।*
*आता सांडोनिया तये क्षणी । कडकडोनि भेटले ।।७।।*
*रे बाळका, ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर ।*
*माझे कंठी बैसला साचार । बरे घेई निजा-वस्तु ।।८।।*
*मग स्नेहाळ नवल केले । वोसंगाशी शिष्या घेतले ।*
*अर्धमात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्री ।।९।।*



*खडतर औषधी दिव्यरसायन । नयनी झोंबले जाऊन ।*
*डोळियाचा डोळा फोडून चित्सूर्य भेदिले ।।१०।।*
*पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्कतो पिंडी माजी उतरला ।*
*त्रिकुट श्री हाटा चुराडा केला ।*
*सेखी भरला गगन गर्भी ।।११।।*
*उग्रतेज लखलखाट । तेथे जाला चौदेहाचा आट ।*
*भ्रांति पडली बळकट । तेव्हां बाळ निचेष्टित पडे ।।१२।।*
*ऐसे पाहोनी सद्‌गुरूनाथ । पद्‌महस्त मस्तकी ठेवित ।*
*वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुले ।।१३।।*

*जय जयाजी करुणा सिंधु । जयजयाजी भवरोग वैदु ।*
*जयजयाजी बाळबोधु । कृपाधना समर्था ।।४०।।*
*कल्याण म्हणजे जी रामदासा । माझा मुकेपणाचा ठसा ।*
*ते मोडोनि वसोसा । मज आपणा ऐसे केले ।।४४।।*
*अनिर्वाच्य बोल बोलबोलिले । साधकाचे उपेगा आले ।*
*सिद्ध तरी डोळो लागले । बद्धमुमुक्षु होताती ।।४८।।*

या रचनेतील ओवी क्र. ६ ते १३ यांत शक्तिपाताचे वर्णन आहे. तर ओवी क्र. ४० मध्ये 'बोळबोधु' असा उल्लेख आहे. हा उल्लेख परंपरागत योगशास्त्र संदर्भातील श्री त्र्यंबकराज स्वामी समर्थ यांच्या 'बालावबोध' किंवा 'बोळबोध' या ग्रंथाचा असू शकेल. कारण गुरूशिष्य संवाद व त्यातून समाधीयोग मार्गाचे मार्गदर्शन करण्यासाठी श्री त्र्यंबकराज यांनी लिहिलेला ग्रंथ पुढे; अल्पकाळ परंपरा राहिलेल्या सिद्ध संप्रदायाचा सांप्रदायिक ग्रंथ झाला. ओवी क्र. ४८ मध्ये 'सिद्ध डोलो लागले' असा उल्लेख आहे. ही गुरूपरंपरा 'वडाची साल पिंपळाला लावण्यासारखी' वाटली तरी बाळबोधमधील विषय प्रतिपादन आणि 'दासबोधा'तील विषयप्रतिपादन यांत साम्य दिसते. श्री तुळजाभवानी या देवतेशी, तसेच

सप्तशृंग गडाशी, या परंपरेचा संबंध आहे हेही सूचक वाटते. तथापि श्री समर्थ रामदास स्वामी मात्र थेट उल्लेख करीत नाहीत; हे खरे! त्यांनी सद्‌गुरू म्हणून श्री रामांचाच उल्लेख केला आहे.

पूर्वसूरींचे ऋण, नारदीय भक्तिपरंपरा, योगविज्ञानाचा पुरस्कार भक्तियोग स्वरूपात आणि सद्‌गुरू व शिष्य अद्वैतभाव या सर्व बाबतीत आणि भज्य दैवत श्री विष्णू याही बाबतीत भागवत संत आणि श्री समर्थ रामदास यांत विलक्षण साम्य आहे हे जाणवते. सांप्रदायिक कर्मठपणा बाजूला ठेवला तर हे साम्य अनुभवता येईल.

२. श्री संत ज्ञानेश्वर हरिपाठात 'बैसोनिसंसारी जिव्हे वेगु करी' असे म्हणून; 'देवाचिये द्वारी । उभा क्षणभरी । तेणे मुक्तिचारी साधियेल्या।।' असे सर्व संसारी माणसांना आश्वासित करतात.

*'म्हणोनि मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे ।*
*अलौकिकां नोहावे । लोकांप्रती ।।'*

अशी सांगी देऊन; ज्ञानियांनाही ज्ञानेश्वरांनी लोकाभिमुखतेने कर्तव्यतत्पर होण्यास सांगितले. लोकरक्षण, लोकशिक्षण करून; समाजाचे सर्वार्थे पुढारपण करण्यासाठी तत्पर व्हावे 'धुरेचा बैसणा' व्हावे असे सुचविले. 'संसार सुखाचा' झाला तरच विश्वात्मक माणूस सुखाने नांदेल; ह्याची जाणीव त्यांच्या विवेचनातून सतत होत राहिली. मुख्यतः भगवद्‌गीतेवर भाष्य करावयाचे ठरवूनच; त्यांनी ही दृष्टी स्पष्ट केली.

श्री संत नामदेवांनी समाजाच्या खालच्या स्तरापासून, वरच्या स्तरापर्यंत सर्वांना, समाजपुरुषाचा जबाबदार घटक बनविण्याच्या दृष्टीने, भक्तिमार्गातील कीर्तन परंपरा मोठ्या हिरीरीने पुढे आणली. या परंपरेत स्वाभाविकपणे सर्व स्त्रीपुरुष समाविष्ट होऊ शकले. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' हेच त्यांचे कीर्तन सादरीकरणातील ध्येय होते. निरहंकारी वृत्तीने कर्तव्यतत्परतेबरोबरच पांडुरंग भक्ति करण्याचा त्यांनी संदेश दिला.



संत एकनाथांनी संसार आणि परमार्थाची सांगड घालून अतिशय स्पष्टपणे सांसारिकांना प्रबोधित केले. ते म्हणतात –

*'नरदेहा ऐसे गोमटे । शोधिता त्रैलोक्यी न भेटे ।*
*आणि देहा ऐसे वोखटे । अत्यंत खोटे आन नाही ।।*
*वोखटे म्हणोनि त्यागावे । तरी मोक्ष सुखा नागवावे ।*
*गोमटे म्हणोनि भोगावे । ते अवश्य जावे अधःपाता ।।*
*हे भोगवे ना त्यागवे । निजपुरुषार्थ लाघवे ।*
*भगवन्मार्गी तरीच पावावे परमसुख ।।'*

असे संत एकनाथांनी संपूर्ण समाजाला प्रबोधित केले. त्यांच्या भारूडांतून, रूपकांतून आणि त्यांनी लिहिलेल्या 'भावार्थ रामायण' आणि 'एकनाथी भागवतां'तून प्रामुख्याने हे प्रापंचिकांना पुरुषार्थपर करण्यासाठी प्रवचन केले आहे.

तुकारामांनीतर सांसारिकांना सर्वांगे प्रबोधित करून; प्रबुद्ध समाजनिर्मितीची चळवळच आरंभिली होती; असे म्हणणे सयुक्तिक होईल. 'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात ।।' ही त्यांची संतत्वाविषयीची धारणा; प्रपंच आणि परमार्थ यांच्या समन्वयासाठीची त्यांची दृष्टी स्पष्ट करते.

*'न जावे लागे वनांतरा । सुखे घरा येतो नारायण ।।'*

असे लोकांना सांगत; त्यांनी आपल्या प्रबोधन कार्याची दृष्टी स्पष्ट केली–

*'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।*
*शांतिरूपें नव्हें कोणाची वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ।।*
*तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचे ।।'*

हे सांगतांना अंततोगत्वा प्रपंच क्षणभंगूर आहे हे ओळखून निष्कामतेने पुरुषार्थ करावा, असेच तुकाराम सुचवितात मात्र –

*'तुका म्हणें मन उन्मन जो होय ।*
*तोंवरी हें सोय विधि पाळी ।।५।।'*

तुकारामांचे उपदेशपर अभंग अनुभवू लागले की संसार सांडून परमार्थ करावा असे तुकाराम सांगत नाहीत. उलट अतिशय स्फोटक शब्दात प्रपंचातील दांभिकता, रूढीग्रस्तता, स्वार्थपरता, भेदमूलकता यांवर प्रखरपणे प्रहार करून; समग्र पाखांडखंडनात्मकतेने समाजप्रबोधनाची चळवळ करून; सम दृष्टीने, निष्काम कर्मपरतेने आणि सर्वात्मक परमेश्वर मूलकतेने प्रपंच क्रीडा करून; पांडुरंगस्वरूप होण्याची सांगी तुकाराम देतात, असे लक्षात येते.

भागवत संतांच्या सांगीत प्रपंच असार आहे असे सांगतांना प्रपंच त्यागून परमार्थ करावा, असे वरवर पाहता सूचित झाले असे वाटते हे खरे; परंतु श्री ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या धुरेच्या संतांनी परमार्थलक्ष्यी पद्धतीने प्रपंच करण्याचा उपदेश केला हे स्पष्ट आहे. प्रपंचाची असारता ही कर्मतत्परतेच्या आड येता कामा नये; हेही पुरुषार्थ आणि आश्रमांचे महत्त्व विषद करून सांगितले आहे.

श्री समर्थ रामदासांनी यापेक्षा स्पष्ट शब्दात 'प्रपंच नेटका' करावा असे सांगून त्याचबरोबर 'परमार्थ साधावा' यासाठी पुरुषार्थ करण्याचा प्रबोध केला आहे. भागवत संत आणि संत समर्थ रामदास यांच्या प्रबोधनाचे लक्ष्य सारखेच आहे. ते म्हणजे प्रपंचातील कर्म डोळस, कर्तव्यतत्पर आणि ज्ञानवान असावे हेच आहे. यादृष्टीने रामदासांचे 'मूर्खलक्षण' विचार लक्षणीय आहेत. उदा–

*'अनीतीने द्रव्य जोडी । धर्म नीती न्याय सोडी ।*
*संगतीचे मनुष्य तोडी । तो येक मुर्ख ।।*
*लक्ष्मी आलिया वरी । जो मागील वोळखी न धरी .*
*देवी ब्राह्मणी सत्ता करी । तो येक मुर्ख ।।'*

मूर्खांची लक्षणे सांगून; समर्थांनी प्रपंची चातुर्य आणि पुरुषार्थ तत्पर नेटकेपणा कसा बाणता येतो; हेच प्रबोधित केले. हे प्रबोधित करतांना तुकारामांची स्फोटकता त्यांच्या सांगीत आहेच; त्याचप्रमाणे शिक्षकाची



आणि शासकाची जरब आहे. हे सर्व लोकप्रेमापोटीच होय. या बाबतीत तुकारामांप्रमाणेच 'बुडती हे जन न देखवे डोळा' अशीच समर्थांची दृष्टी दिसते –

*'ऐसे अवघेचि नासले । सत्यासत्य हरपले ।*
*अवघे अनायक जाहले । चहुकडे ।'*

ही स्थिती समर्थांना बघवत नाही.

*'या नरदेहाचेनि आधारे । नाना साधनाचेनि द्वारे ।*
*मुख्य सारासार विचारे । बहुत सुटले ।'*

हे लक्षात घेऊन; जनांस सारासार विचार करण्याची सवय लावावी या साठीची चळवळ समर्थ करतात. सारासार विचारपूर्वक प्रपंच करतांना, आत्मज्ञान संपादन करण्याचे 'लक्ष्य' असावे असेच समर्थांचे म्हणणे होते. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड सारासार विचारानेच शक्य आहे, असे ते ठामपणे सांगतात –

*'नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।*
*यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमी लावावे ।।*
*ईश्वरी प्रेमा अधिक । प्रपंच संपादी लौकिक ।*
*सदा सन्निध विवेक . तो सत्वगुण ।।'*

असे सत्वगुणाने प्रापंचिकाचे वर्तन घडले तर नरदेह सफल होईल असे समर्थांना वाटते. म्हणूनच समर्थांचे स्पष्टच सांगणे आहे –

*'आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।*
*येथे आळस करू नका । विवेकी हो ।'*

ते पुढे जाऊन म्हणतात –

*'या कारणे गृहस्थाश्रम । सकळांमध्ये उत्तमोत्तम ।*
*परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ।।'*

समर्थ रामदासांनी प्रापंचिकांना 'मनाचे श्लोक', 'मूर्ख लक्षणे' आणि 'दासबोध' अशा सर्वच रचनांतून; प्रबोध केला आहे. समाजातील

पुढाऱ्यांनी, विवेकी धुरिणांनी

*'आपण करावे करवावे । आपण विवरावे विरववावे ।।*
*आपण धरावे धरवावे । भजन मार्गासी ।।'*

असे सुचविले आहे. अन्यथा

*'संसार मुळीच नासका । विवेके करावा नेटका ।।*
*नेटका करिता फिका । होत जातो ।।'*

असे साधे सूत्र रामदासांनी प्रापंचिकांना दिले आहे. म्हणूनच ते स्पष्टपणे सांगतात –

*'संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधि न सांडिता ।*
*जनांमध्ये सार्थकता । विचारिच होये ।।*
*काहीं सोडावें लागत नाही । काहीं मांडावे लागत नाहीं ।*
*एक विचार शोधून पाही । म्हणजे कळे ।।'*

याचा स्पष्ट अर्थ हा आहे की; प्रापंचिकांनी प्रपंचात सावध राहून पुरुषार्थपूर्ण प्रपंच करतांना प्रपंचातील सर्व कर्मांमध्ये आत्मस्वरूप शोधण्याचा प्रयत्न करावा. आत्मज्ञानाची साधना प्रपंचातच करता येते. यासाठीच समर्थांनी लोकांसमोर 'दासबोध' मांडला आणि ग्वाही दिली

*'मार्ग सांपडे सुगम । न लगे साधन दुर्गम ।*
*सायोज्य मुक्तिचें वर्म । ठाई पडे ।।'*

समर्थ रामदासांनी भागवत संतांप्रमाणेच भक्तिमार्गाने प्रपंचात परमार्थाची ग्वाही दिली आहे. हे करतांना श्री रामोपासना, रामभक्ति हे साधन पर्याय म्हणून रामदासांनी समोर ठेवले; हे मात्र सतत लक्षात ठेवावे लागते.

३. सर्वाभूमी परमेश्वर आहे, हे आत्मज्ञान लोकसागरातील सर्वांच्या ठिकाणी प्रकटले तर अवघा संसार, जीवमात्र सच्चिदानंद भोगतील असे संतांना वाटत होते. संतांच्या सर्व प्रकारे साधनेचे अंतिम 'लक्ष्य'ही स्वतःबरोबर सर्वांना सच्चिदानंद अनुभूती घडावी आणि परब्रह्म सुखसोहळा लौकिकात सर्वांना नरदेही भोगता यावा.



श्री ज्ञानेश्वर म्हणतात –

*'तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थे विश्वभरूं ।*
*आनंदाचे आवारूं । मांडू जगा ।।'*

साधनेचा आणि शब्दब्रह्म वाग्विलासाचा हेतूच मुळी विश्वात्मक परमेश्वराला शरण जाऊन; विश्वात्मक होऊन; संपूर्ण विश्वच आनंदाने भरून टाकायचे हा आहे. त्यासाठी विश्वातच आनंद कोंदून, आनंदाचेच आवार, विश्वाला अर्थात जगाला घालावयाचे. त्यासाठी साधना करतांना, साधन मात्र गीतार्थ हे असले पाहिजे. गीतार्थ याचा अर्थच कर्मपरता, संघर्षपूर्णता आणि प्रेमपूर्णता होय. या सर्व गोष्टी विश्वातील भूतमात्रांना केंद्रस्थानी ठेवून व्यवहार करतांना; सोहंभावे, विष्णूमय जग, या भावनेने करावयाचा. अवघे विश्व सच्चिदानंद मग्न व्हावे हेच 'लक्ष्य'. हे कसे साध्य होईल; याचे एकमेव उत्तर म्हणजे – भक्ति : ज्ञान – वैराग्य – वैराग्यपूर्ण भक्ती म्हणजेच लोकप्रबोध आणि लोकसेवा : लोकाठायी भक्तिभाव – ज्ञानात्मकता – वैराग्यशीलता – त्यातून व्यवहारातील अलिप्त कर्मपरता, पुरुषार्थ संपादनात्मकतेने यशपूर्णता – म्हणजेच सच्चिदानंदानुभूतीमग्नता होय. ही ज्ञानदेवांची वहिवाट नामदेवांमध्ये 'नाचु कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' या उक्तीतून प्रकटते. नाथमहाराज भागवताच्या आधारे आणि भावार्त रामायणाच्या माध्यमातून हेच सांगतात आणि श्री तुकाराम तर –

*'अनुभवे आले अंगा । ते या जगा देतसें ।।१।।'*

असे म्हणतात. यासाठीच 'अनुरेणुया थोकडा' असलेल्या श्री तुकारामांचे आकाशव्यापीपण भोगणे आणि ज्ञानपूर्णतेने लोकप्रबोध साधत – अवघे विश्वच 'आनंदाचा डोह' करणे होय.

श्री संत ज्ञानेश्वरांपासून ते तुकारामांपर्यंत संतांच्या विभूतीमत्त्वातील 'लक्ष्य'केंद्री विचार केला; तर 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' हेच विभूतिमत्त्वाचे सारसर्वस्व राहते. त्यासाठी वैयक्तिक पातळीवर 'न लगे मुक्ती आणि संपदा', प्रत्येक भागवतसंतांच्या विभूतिमत्त्वाचा सारांश

एकच राहतो 'चिंता करितो विश्वाची !' अर्थात 'आता उरलो उपकारा पुरता !' याच विभूतिमत्त्वाचा प्रकर्ष श्री ज्ञानेश्वरांच्या 'पसायदानात' घडला आहे. तुकारामांच्या 'विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ' या उक्तीत प्रकटला आहे. श्री स्वामी समर्थ रामदासांची 'आनंदवनभूवन' कल्पना, ही संसार सांडून विजनवासात नेणारी वाटली; तरी प्रत्यक्षात संसारात राहून संसारापासून अलिप्तपण भोगण्याचा 'अकर्ता' होण्याचा संदेश देणारी आहे. मात्र 'अकर्ता' म्हणजे कर्मविमुख नव्हे; तर निष्काम कर्मतत्पर होय. भगवद्‌गीतेची संगती, प्रपंच आणि परमार्थ एकरूपतेसाठी, लावण्याचा, जो संतांचा खटाटोप आहे, तोच रामदासांच्या 'आनंदवनभूवन' कल्पनेत आहे. सुख पाहता जवा पाडे । दुःख पर्वता एवढे । ही प्रापंचिकाची अनुभूती लक्षात घेऊन; श्री संत तुकाराम महाराज सांसारिकांना सांगतात, 'आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ।।' अगदी तसेच स्वामी समर्थ रामदास म्हणतात –

*जन्म दुःखे, जरा दुःखे । नित्य दुःखे पुन– पुनः*
*संसार त्यागणे जाणे । आनंदवन भूवनी ।।१।।*
*संसार वोडिता दुःखे । ज्याचे त्यासीच ठाउके ।*
*परंतु येकदा जावे । आनंदवन भूवनी ।।३।।*
*कष्टलो, कष्टलो देवा । पुरे संसार जाहला ।*
*देहत्यागास येणे हो । आनंदवन भूवनी ।।५।।*
*जन्म ते सोसिले मोठे । अपाय बहुता परी ।*
*उपाय धाडिले देव । आनंदवन भूवनी ।।६।।*
*त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंद–विमोचने ।*
*मोहीम मांडली मोठी । आनंदवन भूवनी ।।१८।।*
*कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ, दैत्य बुडावया ।*
*कैपक्ष घेतला दैवी । आनंदवन भूवनी ।।२७।।*
*उदंड जाहले पाणी । स्नान संध्या करावया ।*
*जप तप अनुष्ठाने । आनंदवन भूवनी ।।३६।।*
*बंड पाषांड उडाले । शुद्ध अध्यात्म वाढले .*
*रामकर्ता, रामभोक्ता । आनंदवन भूवनी ।।३९।।*
*देव भक्त एक जाले । मिळाले जीव सर्वही ।*
*संतोष पावले तेणे । आनंदवन भूवनी ।।४६।।*
*येथूनि वाचती सर्वे । ते ते सर्वत्र देखती ।*
*सामर्थ्य काय बोलावे? । आनंदवन भूवनी ।।५४।।*
*महिमा तो वर्णवेना । विशेष बहुता परी ।*
*विद्यापीठ ते आहे । आनंदवन भूवनी ।।५८।।*
*सर्व सद्या, कळा, विद्या । न भूतो न भविष्यति ।*
*वैराग्य जाहले सर्वे । आनंदवन भूवनी ।।५९।।*

श्री समर्थ रामदासांच्या 'आनंदवनभूवन' स्फुटरचेनतील काही ओव्या चर्चेसाठी घेतल्या; तरी हे सहज लक्षात येते; की येथे संसार भवसागरातील कालप्राय संकटांशी झुंज देऊन; आनंदवनभूवनात, सच्चिदानंदस्वरूप, अर्थात प्रभुरामस्वरूप व्हावयाचा ध्यास आहे. चराचराला रामस्वरूप होण्यासाठी, एकमेव निधान म्हणजे, श्रीरामस्वरूप. हे होण्याचे स्थान म्हणजे आनंदवनभूवन होय. अर्थातच हे 'आनंदवनभूवन' भक्ति, ज्ञान, वैराग्याचे विद्यापीठ म्हणून साकारले आहे. प्रत्यक्ष असे कोणते गाव, स्थान अस्तित्वात नाही. जेथे 'रामकर्ता' 'रामभोक्ता' आहे आणि रामभक्त रामस्वरूपच असल्याने तो अकर्ता आहे अशा रामस्वरूपाशी अद्वैत अवस्था घडली की तेथेच 'आनंदवनभूवन' आकारते. संसारातील घर, दार, शेतीपोती, गाव, राज्य, समाज, राष्ट्र, विश्व यातील अवघा अधर्ममूलक म्हणजे आसूरी संपत्तीमुळे निर्माण झालेला, विनाशकारी प्रसंग केवळ रामभक्तीच्या अनन्यतेने रामस्वरूप होऊन पराभूत होतो. तत्कालीन औरंगजेबाचे उदाहरण समर्थांनी आवर्जून दिले आहे. 'यदा यदाही धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत । अभ्यूथ्थानमधर्मस्य तदात्मानम्

सृजाम्यहम् ।' ही भगवद्गीतेतील आश्वासकता, रामरूपातून रामभक्तांच्या ठिकाणी साकारते; म्हणूनच देव-भक्त एक झाला की भक्तच श्रीरामकार्य करतो. समाजपुरुषच विराटपुरुष भगवान श्री विष्णू होऊन प्रकटतो आणि महाप्रलयांनी 'आनंदवनभूवन'च राहते.

स्वामी समर्थांचे अंतिम 'लक्ष्य' हे सामूहिक अर्थात सर्वात्मक रामस्वरूप प्रकटविणे; म्हणजेच परब्रह्मस्वरूप चराचराचे ठिकाणी प्रकटविणे हे आहे. महाराष्ट्रातील भागवत संतांनी हीच तर चळवळ आरंभिली आहे. हे समर्थांचे आनंदवनभूवन भागवतांनी पंढरपुरात 'वैकुंठ'कल्पनेत अनुभवले. अवघी दुरीते वाटण्याचे सामर्थ्य प्रेमस्वरूपा मृदुतर भक्तीमध्ये असतेच असते. भक्ति ही अविद्येशी संग्रामक शक्ति आहे हेच भागवत संतांनी आपल्या आंदोलनात मांडले. 'भक्ति'च्या मिशाने 'करकटेवरीचा' पांडुरंग शंकचक्रगापद्मधारी विष्णू भगवंत किंवा चक्रसुदर्शनधारी श्रीकृष्ण होतो. श्री समर्थांनी मात्र मुळातच तात्कालिक परिस्थितीनुसार कोदंडधारीराम उपास्य म्हणून स्वीकारले आहे. समकालीन तुकारामांची स्फोटकता ही रामबाणांसारखीच प्रकटली हे लक्षणीय होय. एकूणच संतांचे भक्तिसाधनेचे भक्तियोगमार्गाचे 'लक्ष्य' भौत्तिकतेतील दुरितांवर, सर्वात्मक परमेश्वरी सामर्थ्याने मात करून; सर्व दुरिते वाटण्याचे आहे. पुरुषोत्तम विराटसमाजपुरुषाच्या रूपाने प्रकटून 'आनंदवनभूवन' निर्माण व्हावे हेच 'लक्ष्य' आहे. आत्मोन्नती आणि लोकोन्नती ह्यासाठीच 'आनंदाचे आवारू मांडू जगा' ही श्री ज्ञानेश्वरांची घोषणा 'आनंदवनभूवना'त सुफल संपूर्ण होईल; असा रामदासांचा दृढ विश्वास आहे.

४. भागवत संतांचा आणि श्री स्वामी समर्थ रामदासांचा समकालीन राजकीय स्थितीगतीशी स्वाभाविकपणे संबंध येतच असणार. भाषेचा विचार करता राजकीय परिवर्तनानंतर; सत्ताधाऱ्यांच्या भाषेचा समाजात होऊ लागलेला वापर, संतांच्या साहित्यात मोठ्या प्रमाणावर होतच



होता हे नाथमहाराजांच्या साहित्यातून सहज ध्यानात येत होते. तरी प्रत्यक्ष सत्ताधाऱ्यांशी किंवा सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष करणाऱ्यांशी संतांचा फारसा संबंध आला नाही असेच दिसते. नाथमहाराजांचे गुरू श्री जनार्दन स्वामी हे राजदरबारी होते; तरी नाथांचा तसा थेट संबंध दिसत नाही किंवा नाथांचा प्रत्यक्ष हस्तक्षेपही जाणवत नाही. यादवकाळापासून परकीय आक्रमणे होत होती. स्वत्त्वाचा अर्थात एतद्देशीयांच्या स्वत्त्वाचा प्रश्न ऐरणीवर होता; तरी भागवत संतांचा राजकीय चळवळीमध्ये थेट संबंध दिसत नाही. मंदिरे आणि मूर्ति यांच्या विनाशाकडेही भागवत संतांनी नेमके कोणत्या तऱ्हेने पाहिले; याच्या उल्लेखापेक्षा पांडुरंग भक्तीमध्ये अंतर पडले नाही, वारीत खंड पडला नाही, भजनी मंडळ्या, कीर्तने यांत खंड पडला नाही, राजकीय स्थितीगती परमेश्वरावर सोपवून, दैवाधीन मनोवृत्तीनेसमोर येतील त्याला सामोरे जात समाजातील संत परंपरा धैर्याने स्थैर्यासह सुरूच होती असे दिसते. कदाचित राजकीयदृष्ट्या निरुपद्रवी म्हणूनच या परंपरेकडे पाहिले गेले. धर्म आणि राजकीय स्थितीगती यांचा अन्योन्य संबंध असतो; हे भगवद्गीतेवरील टीका श्री ज्ञानेश्वरी, भागवत, रामायण, पुराणे यांच्या कथांमधून सर्वामुखी जात असतांनाही; 'यदा यदाही धर्मस्य' यावर ठाम राहून; 'अवतार' कार्याची वाट पाहात; श्रद्धेने, स्थिरमनस्क वृत्तीने संतपरंपरा विठ्ठल भक्तिरंगात रंगलेलीच पाहावयास मिळते. श्री संत शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर हे मुस्लिम असूनही; तेही या संत आणि योगमार्ग परंपरेत दाखल झालेले दिसतात. सत्ताधाऱ्यांशी त्यांचा संबंधही केवळ चमत्कारपूर्वक मनःपरिवर्तन करून सत्ताधिशांची धर्मश्रद्धा जागविणे एवढ्या मर्यादितपणेच आल्याचे दिसते.

शिवकाळात ही परिस्थिती बदलली. याचे कारण संतपरंपरेच्या भक्तियोग मार्गाच्या; राजकीय स्थितीगतीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनापेक्षा, स्वत्त्वाचे अर्थात धार्मिक परंपरा, एतद्देशीयता यांचा आत्माभिमान

राखण्यासाठीची जी राजकीय चळवळ श्री छत्रपती शिवरायांच्या निमित्ताने सुरू झाली; यात हे कारण सापडते असे म्हणता येते. समकालीन भागवत संत श्री तुकाराम महाराज यांच्याशी थेट छत्रपतींनी संपर्क साधला. श्री संत तुकारामांनी छत्रपतींच्या चळवळीला सामाजिक व धार्मिक बळ दिले असे दिसते. कीर्तनप्रसंगी परचक्राचा वेढा पडला, त्यावेळी धर्मकीर्तन प्रसंगी परचक्राचा वेढा पडू शकतो याची लाज वाटते असे म्हणत; श्री तुकारामांनी आकांत मांडला –

श्री तुकाराम म्हणतात –

*‘न देखवे डोळां ऐसा हा आकांत ।*
*परपीडे चित्त दुःखी होते ।।१।।*
*काय तुम्ही येथें नसलासें झालें ।*
*आम्ही न देखिले पाहिजें हें ।।२।।*
*परचक्र कोठें हरिदासांच्या वासे ।*
*न देखिजे तद्देशे राहाटिया ।।३।।*
*तुका म्हणे माझी लाजविली सेवा ।*
*हीन पणें देवा जिणें झाले ।।४।।’*

*‘काय म्यां मानावें हरिकथेंचे फळ ।*
*तारिजे सकळ जनी ऐसें ।।१।।*
*उच्छेद तो असे हा गे आरंभला ।*
*रोकडें विठ्ठला परचक्र ।।२।।*
*पापाविण नाहीं पाप येत पुढें ।*
*साक्षीसी रोकडें साक्ष झालें ।।३।।*
*तुका म्हणे जेथें वसतील दास ।*
*तेथें तुझा वास कैसा आतां ।।४।।’*



*‘भीत नाहीं आतां आपुल्या मरणा ।*
*दुःख होतें जनां न देखवे ।।१।।*
*आमची तो जाती ऐसी परंपरा ।*
*कां तुम्ही दातारा नेणां ऐसी ।।२।।*
*भजनीं विक्षेप तेंचि पै मरण ।*
*न वजावा तो क्षण एक वाया ।।३।।*
*तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा ।*
*ते स्थळीं दातारा ठाव मागें ।।४।।’*

तुकाराम महाराजांच्या या रचनांमधून तुकारामांनी पांडुरंगांनी आता प्रकटच झाले पाहिजे, असा आकांत मांडला आहे. सर्वाभूति विष्णू पाहणाऱ्या श्री तुकोबारायांना अर्थातच पांडुरंगाचे हे प्राकट्य जनांमध्ये अपेक्षित आहे, हे स्पष्ट आहे. जनसागरात ही स्वधर्मरक्षणाची अस्मिता जागृत करण्यासाठीच; पुण्यात, पासोड्या विठोबाच्या मंदिरात, श्री शिवाजी कीर्तनात बसले असतांना; त्यांनी पकडण्यासाठी आलेल्या परकीय सैन्याला सर्वाभूती श्री शिवछत्रपतीच दिसू लागले; हा योग चमत्कार श्री तुकाराम महाराजांनी घडविला. अवघा समाज शिवरूप व्हावा हीच अपेक्षा यांतून प्रकट झालेली दिसते. परकीय आक्रमण हे पूर्वजन्मीचे पाप आहे अशी संभावना करून; पापातून मुक्तीसाठी पांडुरंग भक्तीसह संघर्षाला सिद्ध होण्याचा संदेशच श्री तुकाराम महाराज देतात.

असे असले तरी प्रत्यक्ष राजकारणापासून ते अलिप्त राहतात. शिवाजीराजे यांनी श्री तुकोबारायांना आपल्याकडे आणण्यासाठी अबदागिरी, घोडा व नजराणा घेऊन कारकून पाठविला त्यावेळी त्यांनी ते राजपाटाचे वैभव निर्भत्सनापूर्वक त्यागिले. ते म्हणतात –

*‘दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ।।१।।*
*आतां येथें पंढरिराया । मज गोविसी कासया ।।२।।*
*मान दंभ चेष्टा । हें तो शूकराची विष्टा ।।३।।*
*तुका म्हणे देवा । माझे सोडवणें धांवा ।।४।।’*

त्यांनी श्री शिवछत्रपतींनाही निरोप पाठविला –

*आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।।१।।*
*तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिके समान ।।२।।*
*केठी मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ।।३।।*
*म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मजे हें आस ।।४।।*

श्री संत तुकाराम महाराजांना सामाजिक आणि राजकीय व्यवस्थापनाची आणि भक्तियोगमार्ग परंपरेची सांगड अपेक्षित होती हे स्पष्ट आहे. पारलौकिक जीवन अनुभवतांना, लौकिक जीवनात पुरुषार्थपूर्वक प्रकटले पाहिजे हेच तुकारामांना सुचवायचे आहे. कर्मतत्परता, निरपेक्ष कर्तव्यदक्षता यांसह समाजकारण, राजकारण घडले पाहिजे, असेच त्यांना वाटत होते. कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत आणि पुढे वैश्विकतेपर्यंत सामाजिक, राजकीय व्यवस्थेची उतरंड असते; त्याचे कर्तव्यकठोरतेने परंतु निरपेक्षतेने पालनच अपेक्षित आहे; असे भागवत संतांचेही मत आहे. सर्वच स्थितीगतीत श्रीकृष्णभक्ती त्यांना अभिप्रेत आहे, हे स्पष्ट आहे.

श्री स्वामी समर्थ रामदास यांनी तर या बाबतीत स्पष्ट भूमिकाच मांडली आहे – छत्रपती आणि समर्थ यांतील पत्रव्यवहार आणि संबंध पाहिला की ही भूमिका अगदी स्पष्ट होते. 'श्री शिवछत्रपती समर्थ योग' या ग्रंथात अलिकडे हा पत्रव्यवहार व संबंध स्पष्ट केला आहे. श्री रामदास म्हणतात –

*'मुख्य ते हरिकथा निरुपण । दुसरें तें राजकारण ।*
*तिसरें तें सावधपण । सर्व विषयी ।।*
*राजकारण बहुत करावें । परंतु कळोचि नेदावें ।*
*परपीडेवरी नसावे । अंतःकरण ।।'*

मात्र समर्थ स्पष्टच उपदेश करतात –

*'धर्मासाठी झुंजावें । झुंजोनि अवघ्यांसि मारावें ।*
*मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ।।*



*मारितां मारितां मरावें । तेणे गतीस पावावें ।*
*फिरोनि येतां भोगावे । महद्‌भाग्य ।।*
*दीक्षा बरी मैत्री बरी । तीक्ष्ण बुद्धी राजकारणें बरी ।*
*आपणांस राखे नाना परीं । अलिप्तपणे ।।*

*या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी न होतां कष्टी ।*
*राजकारणें मंडळ वेष्टी । चहुंकडे ।।*
*मुख्य सूत्र हाता घ्यावें । करणें ते लोकांकरणीं करवावें ।*
*कित्येक खळक उगवावे । राजकारणामध्यें ।।*
*बोलके पहिलवान कळवटे । तयासीच घ्यावें झटे ।*
*दुर्जनें राजकारण दाटें । ऐसें न करावें ।।*
*खळदुर्जनासी भ्याले । राजकारण नाही राखिलें ।*
*तेणे अवघें प्रगट जालें । बरे वाईट ।।'*

रामदासांनी दासबोधात 'राजकारण निरुपण' स्वतंत्र समास लिहून; प्रबोध केला आहे. हे लक्षात घेतले; तर संतपरंपरेमध्ये, रामायण, महाभारत आणि पुराणे या आर्ष साहित्याचा सतत संदर्भ देणाऱ्या संतपरंपरेमध्ये, राजकारण या समाजजीवनास अर्थात मानवी जीवनास सनातनपणे आवश्यक अंगाकडे समर्थांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले असेच म्हणावे लागते.

स्वामी रामदास म्हणतात –

*'लोक पारखून सांडावे । राजकारणे अभिमान झाडावे ।*
*पुन्हा मेळऊन घ्यावें । दुरील दोरे ।*
*हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें ।*
*समंध पडता सोडून जावें । येकीकडे ।।*
*ऐसे असो राजकारण । सांगतां ते असाधारण ।*
*सुचित अस्तां अंतःकरण । राजकारण जाणे ।।*

*गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भूजा ।*
*ऐसा पाहिजें की राजा । कैपक्षी परमार्थी ।।*
*हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।*
*ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ।।*
*हुंब्यासीं हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।*
*लौंदास पुढे उभा करावा । दुसरा लौंद ।।*
*धटासी आणावा धट । उत्धटासी पाहिजे उत्धट ।*
*खटनटासी खटनट । अगत्य करी ।।*
*जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हां मज्यालासी थाटे ।*
*इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ।।'*

राजकारण निरुपणातून व्यवहारज्ञान आणि राजकीय व्यक्तिमत्त्वाचा परिपोष श्री रामदासांनी केलेला दिसतो. श्री शिवछत्रपतींच्या बाबतीत तर श्री रामदासांचा थेट संबंध असल्याचे जाणवते. शिवछत्रपतींच्या रुपाने पुन्हा श्री प्रभूरामांनीच अवतार धारण केला आहे असा प्रबोध जनसामान्यांना करायलाही ते धजावतात. भागवत संतपरंपरेच्या तुलनेत श्री रामदास अगदी उघडपणे राजकीय व्यवस्थापनेचे धर्मकारणातील अस्तित्व, महत्त्व आणि सहभाग आवश्यकता स्पष्ट करतात असे दिसते. 'आनंदवनभूवन' संकल्पनेत जणू शिवछत्रपतींच्या स्वराज्य संकल्पनेची तुलना रामराज्याशी आणि समकार्याशी केली आहे असे म्हणता येते.

शिवछत्रपतींकडून अपेक्षा व्यक्त करतांना समर्थ म्हणतात –

*'म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचे माजले बंड ।*
*या कारणे अखंड । सावधान असावे ।।*
*देवद्रोही तितुके कुत्ते । मारोनी घालावे परते ।*
*देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाही ।।*
*सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।*
*परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।*
*एकांती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।*
*नाना विचारणा करावी । अरि मित्रांची ।।*
*मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।*
*ये विषयी न करता तकवा । पूर्वज हासती ।।*
*देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला*
*आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावे ।।'*

*'देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।*
*मुलुख बडवावा वा बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठी ।।*
*या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही ।*
*महाराष्ट्र धर्म राहिला कांही । तुम्हांकरिता ।।*
*सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।*
*धर्मसंस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ।।*
*सकळ लोक येक करावे । गलीम निपटून काढावे ।*
*ऐसे करतां कीर्ति धांवे । दिगंतरी ।।*
*बहुत लोक मिळवावें । येकविचारें भरावे ।*
*कष्टें करोन घसरावें । म्लेंच्छांवरी ।।*
*आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मेळवावें ।*
*महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ।।'*

श्री समर्थांची अपेक्षापूर्ती करणाऱ्या छत्रपतींविषयी समर्थ म्हणतात –

*'शिवरायांचें आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।*
*शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।*
*शिवरायासी आठवावें । जीवित्व तृणवत मानावे ।*
*इहलोकी परलोकीं उरावें । कीर्तिरूपे ।।*

*निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।*
*अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।*
*यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।*
*पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।'*

श्री स्वामी समर्थ रामदासांना अपेक्षित असलेले श्री रामावतारातील राजकीय व्यवस्थापन आणि कार्य, शिवछत्रपतींच्या अवतार रूपाने पूर्ण झाल्याचे समाधान, समर्थ प्रकट करतात. भागवत संतपरंपरेने संपूर्ण समाज स्थिरमनस्क, धर्मपरायण करण्याचे भूमिसंपादन कार्य केले; त्याचवेळी त्या भूमीतील धर्मपरायण आत्माभिमान्यांना समर्थांनी राजकीय पुरुषार्थ दृष्ट्या क्रियाशील केले. एकप्रकारे प्रभुरामचंद्रांचे प्राकट्य घडविले आणि अर्जुनालाही युद्धसज्ज केले. समाजपुरुषाचे असे अवतारित्व प्रकट करण्याचे महत् कार्य वैष्णवांनी केले. त्यात रामदास यांनी उघडपणे चळवळीचे बाळकडू देऊन समाज उभा केला असे म्हणता येते.

५. श्री समर्थांनी दासबोधामध्ये अध्यात्मविद्येबरोबरच भौत्तिकातील पुरुषार्थविद्येला महत्त्व दिल्याचे लक्षात येते हेही रामदासांचे कार्य सूत्रबद्ध प्रबोधकाचे आहे. भागवत संतांनी संसारातील पाखांड खंडन परखडपणाने करून; निष्काम कर्मपरतेने 'बैसोनी संसारी जिव्हे वेगु करी' म्हणत समाजाला पुरुषार्थ प्रवणच केले. हे करतांना मोक्ष या पुरुषार्थाकडे; सच्चिदानंदसुखसोहळा याचि देही भोगण्यावर भर दिला हे खरेच. परंतु आणखी एक गोष्ट पुढे येते ती म्हणजे समाधीयोग विज्ञानाचे धडेही भागवत संतांनी भक्तियोगात अंतर्भूत केले आहेत. राजयोगाची भक्तियोगाशी सांगड घालण्याचे कार्य भागवतांनी केले. श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या दोन्ही ग्रंथात या योगविद्येचा अर्थात ब्रह्मविद्येचा विचार केला आहे. श्री ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायातील विवेचन या दृष्टीने महत्त्वाचे आहे. श्री नामदेवांचे योगविज्ञान, त्यांच्या अभंगातून प्रकट



झाले आहे; तीच गोष्ट श्री संत तुकारामांची दिसते. 'अणुरेणूया थोकडा, तुका आकाशा एव्हढा' या अभंगातून समाधीसुखाचा उलगडा होतोच. नाथांनी भागवतात योगमार्गाचे विवरण निमित्ताने तरी विस्तृतपणे केले आहेच. याच परंपरेत शेख महंमदांचा 'योगसंग्राम' लक्षणीय आहे. हे सर्व भागवत संत एक प्रकारे योगीच होते. सिद्ध, साधू होते हे म्हणण्यास नाथसंप्रदायाची गुरूपरंपरा साक्षीभूत आहे. संत श्री स्वामीसमर्थ हे तर स्वतःला स्वामी आणि समर्थ म्हणवितात; यातच योगमार्गाचा, सिद्ध संप्रदायाचा स्पष्टपणे उल्लेख होतो, हे लक्षात येते. रामदासांनी दासबोधामध्ये प्रपंच आणि परमार्थ निरुपण करतांना 'भक्तियोग' नवविधाभक्ती यांचे विवरण, भागवत संतांप्रमाणेच केले आहे. त्याचबरोबर योगमार्गाचेही, सूत्रबद्ध विवेचन व स्पष्टीकरण केले आहे; हे विसरून चालत नाही. भक्तियोग हाही योगमार्गच होय असे म्हणतांना; त्याही पुढे जाऊन; पुरुषार्थ संपादन ही योगसाधनाच आहे असे श्री समर्थांनी स्पष्टपणे सूचित केले आहे. श्री शिवछत्रपतींना 'श्रीमंत योगी' असे संबोधून; त्यांनी 'योग' मार्ग साधनेची व्यापकता सिद्ध केली आहे. ब्रह्मचारी व्रती चिरंजीव भक्तियोगी मारुतीरायांचा आत्मसंयमनयोग हिरीरीने प्रसारित करण्याचे कार्य श्री रामदासांनी केले आहे. योगमार्गासाठी त्यांनी एकांत आणि लोकांत, साधना आणि सेवा, भक्ति ज्ञान वैराग्य आणि ज्ञानोत्तर भक्ति या गोष्टी सूत्ररूपाने प्रबोधित करून; लोकशिक्षकाची भूमिका पार पाडली. थेट प्रबोधन हे त्यांचे वैशिष्ट्य'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' यासारखेच आहे, हेही लक्षात घ्यावे लागते. दासबोधातील पाचवे, सहावे, पंधरावे, विसावे दशक विशेषत्वाने योगमार्गाविषयी चर्चा करणारे आहे.

६. महाराष्ट्राच्या पटलावर भागवत संप्रदायाने 'भक्तियोग' मार्गाची परंपरा निर्माण करतांना 'भक्तियोग' ही योगमार्गाची एक शाखा आहे हे

भगवद्‌गीतेच्या आणि श्रीमद्‌भागवताच्या आधारे सांगून; योगमार्ग लोकांतात आणण्याची मौलिक कामगिरी केली. प्रपंच आणि परमार्थ यांचे समायोजन नारदीय भक्तिसाधना मार्गाने सुलभतेने होऊ शकते; हे सांगतांना भक्तीची निस्सीमता, अनन्यता स्पष्ट केली. वेद उपनिषदे, अर्थात श्रृती, स्मृती, पुराणे, दर्शने यांचे प्रामाण्य स्वीकारून वर्णाश्रमधर्म व पुरुषार्थ यांना परखड पाखांडखंडनासह पूर्ण तत्त्वनिष्ठापूर्वक पुनः प्रस्थापित केले. मात्र असे करीत असतांना पारलौकिक जीवनाचा पुरस्कार करीत; संसार असारतेवर भर देण्याकडे; विवेचन, कीर्तन, प्रवचन, अभंग लेखन यांतून; लोकांचे लक्ष वेधले गेले हे खरे. समाज प्रबोधित करतांना निष्काम कर्मयोगाबरोबरच भज्य अथवा उपास्यावर भार घालून; श्रद्धापूर्वक कर्मपर असण्यावर भर दिल्याने; नकळत प्रत्यक्ष चळवळ स्वरूपात पुरुषार्थ संपादनाविषयी काही प्रमाणात उदासीनता निर्माण झाली.

श्री समर्थ रामदासांनी भागवत संतांचाच मार्ग स्वीकारतांना उदासीनता नाकारून; कोदंडधारी प्रभु रामचंद्रांचे, विष्णूरूप लोकजीवन पुढे मांडले. लोकधारणा प्रबोधितपणे करणाऱ्या भक्तियोगी तुकारामांमध्ये आणि रामदासांमध्ये भेद येथेच आहे. दोघेही लोकधारणा करण्यासाठीच तळमळत आहेत; तथापि सामाजिक न्याय, अभेदता आणि सर्वाभूती परमेश्वरत्व या दृष्टीने 'तुका विष्णू नाही दुजा' याची प्रचिती येते. हे विष्णूपण पुरुषार्थप्रवण समाजपुरुषामध्ये रामरूपाने उभे करण्याची चळवळ श्री रामदासांनी उभारली. 'भक्तियोग' हा लौकिकातील, पुरुषार्थ संपादनातील ऐहिकता स्वीकारून अनुसरण्याचा मार्ग रामदासांनी अनुसरला. व्यवहारनिष्ठ आणि इहवादी संत म्हणून रामदासांची संभावना केली जाते व त्यांचे वेगळेपण अधोरेखित केले जाते. मात्र भागवतांचे कार्य आणि प्रबोधन यात रामदासांचे संदर्भात तत्त्वात्मक भेद नाही; तर तपशीलात्मक भेद आहे; हे लक्षात घेतले; तर रामदासांचे वैष्णव परंपरेपेक्षा वेगळेपण गुणात्मकतेपेक्षा तपशीलात्मकतेने अधिक अधोरेखित होते. अन्यथा



'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास, कठीण वज्रास भेदू ऐसे ।' असे म्हणणाऱ्या तुकारामांमध्ये आणि रामदासांमध्ये भेद करता येत नाही. दोन्हीही भक्तिसांप्रदायिकांना; सामर्थ्यसंपन्न, धर्मपरायण, समावेशक, अभेदमूलक, नीतीमान समाजपुरुष अपेक्षित असून; या समाजपुरुषाचे लक्ष्य आत्मस्वरूपज्ञान हेच असावे असे वाटते. मात्र 'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणाशी । बोलिले जे ऋषी साच भावे वर्तावया ।।' असे म्हणणारे श्री तुकाराम, समाजपुरुष निर्मितीचे कार्य करतांना केवळ पाखांडखंडनात्मक वर्तन करतात व त्यासाठीच प्रबोधन करतात; तर श्री रामदास पाखांडखंडनाबरोबर 'सामर्थ्य आहे चळवळीचे' असे म्हणून; अध्यात्मिक चळवळीपेक्षा भौत्तिक चळवळीकडे अधिक लक्ष देतात; म्हणूनच श्री रामदास हे वशिष्ठांप्रमाणे एकप्रकारे समाजपुरुष, राष्ट्रपुरुष उभे करण्याचे कार्य प्रबोधनातून करतात व त्यासाठी प्रभु रामचंद्रांच्या अवताराची कांक्षा शिवछत्रपतींवर विरोपीत करतात. श्री तुकाराम स्वतःच प्रत्यक्ष कारुण्यमूर्ती मात्र शंख चक्र गदा पद्‌मधारी श्री विष्णू असल्याची प्रचिती लोकांना येते. आधुनिक परिप्रेक्षामध्ये भागवत परंपरा आणि रामदासी परंपरा या दोन्ही परंपरा विवेकपूर्वक सामरस्याने अनुसरण्याची शिवछत्रपतींची दृष्टीच आवश्यक वाटते.

**समारोप** : मध्ययुगीन महाराष्ट्राची वैष्णवपरंपरा पाहता भक्तियोगाचा विनियोग लोकोद्धारासाठी आणि लोकधारणेसाठी संतांनी केला असून; मोक्षमुक्तीपेक्षा लौकिक जीवनात अलौकिकाची अनुभूती सोहं जागवून घेता येते याकडे लक्ष वेधणारी त्यांची दृष्टी आहे. या परंपरेमध्ये श्री समर्थ रामदासांनी अधिक भौत्तिक दृष्टिकोन ठेवून; ऐहिक जीवनात पारलौकिक लक्ष्यकेंद्रिततेने परंतु लोकनिष्ठेने, पुरुषार्थप्रवण होऊन; भक्तियोग साधण्याची हनुमंत दृष्टी प्रबोधित केली आहे; असे म्हणता येईल. एव्हढे वेगळेपण सोडले; तर भागवत भक्तियोग परंपरा आणि रामदासी भक्तियोग परंपया

यांत तात्त्विक भेद दिसत नाही असेच म्हणावे लागेल. दोन्ही परंपरा ह्या विष्णूतत्त्वाने लोकधारणा, लोकजागरण आणि लोकोद्धार करण्याचा आत्मोन्नतीपूर्ण मार्ग म्हणजे नारदीय भक्तियोग परंपरा असे मानणआऱ्या परंपरा आहेत, असे म्हणता येईल. दोन्ही मार्गांविषयी वितंड करून द्वंद्व मांडण्यापेक्षा या समान धारणांचा विचार लोकोद्धाराच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय जाणिवेनेही महत्त्वाचा वाटतो. भक्तियोगाने परब्रह्मसुखसोहळा लौकिकात अनुभूत करण्याचे सामर्थ्य या परंपरांमध्ये आहे. समर्थ रामदासांनी भक्तियोगाचा विनियोग सामर्थ्यसंपन्न विराटपुरुष निर्मितीसाठी रामभक्तीचा प्रकर्ष केला तर भागवतांनी याचसाठी श्री विठ्ठलात हा महासमन्वय साधला.

* * *



# माऊलींचा भक्तियोग

संतपरंपरेमध्ये खरे म्हणजे स्त्रीपुरुष भेद असत नाही. भक्तिसाधनेत अवघा भेदच विरून जातो. आत्मा, परमात्मा, जीवात्मा यांचे भक्तियोगे अद्वैत घडते. चराचराचा रंग एक होतो. लौकिकजीवनात मात्र, संतांचा उल्लेख करतांना स्त्री संत, पुरुष संत असा भेद केला जातो. एक मात्र खरे की लौकिकाचा रंग भक्तिगंगेत प्रवाहित होतांना; स्त्रीभाषा, स्त्रीसंवेदना भक्तिभावनेतूनही मुखर होते.

१. संतपरंपरेत मुळातच जीवनमुक्त असलेल्या श्री निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांना अनुभवतांना देखील; मुक्ताईच्या रचनांमधून आपण स्त्रीभावनासंवेदांचा प्रत्यय घेऊ लागतो –

*‘नाम बळे देही असोनि पै मुक्त ।*
*शांतिक्षमाचित्त हरी भजने ।।१।।*
*दया धर्म चित्ती सर्वभूती करुणा ।*
*निरंतर वासना हरी रूपी ।।२।।*
*माधव मुकुंद हरिनाम चित्ती ।*
*सर्वत्र पै मुक्ति नामपाठे ।।३।।*
*मुक्ताईचे धन हरिनाम उच्चार ।*
*अवघाचि संसार मुक्त केला ।।४।।*

देही, विदेही अनुभूती घेण्याची क्षमता नामभक्तीत आहे. केवळ नामपाठानेही सर्वत्र, अर्थात सर्वांगे, मुक्तीचा अनुभव येतो. व्यवहारातील चिंतांपासून मुक्त होण्याचे साधन म्हणजे धन होय. मुक्ताबाईजवळ असे धन आहे; की अवघ्या संसारामधून मुक्ति प्राप्त झाली. संसारप्रपंचाचे 'कुल' स्त्री हे होय. संसार प्रपंचाच्या चिंता तिला वाहाव्या लागतात. अशा चिंता वाहताना तिला संसार फुलवावा लागतो. ह्या व्यवहारातील मुख्य साधन, धनलक्ष्मी असते. संसारातील यातायातींनी जीवन नकोनको होते. यातून मुक्त झालो तर आनंद मिळेल; अशा श्रद्धेने पांडुरंगाकडे साकडे घालायचे. मुक्ताबाईंना हा कुटंब संसार मात्र अभिप्रेत नाही. मूळातच जीवनमुक्त अशा मुक्ताबाई, संपूर्ण जीवनमुक्तीचे, खरे साधनरूप धन म्हणजे नामभक्ती होय; असे संसारी लोकांना सुचवितात. चित्त हरिभजनी लागले की दया क्षमा शांती आपसुकच ठायी निर्माण होतात. सर्वांभूती करुणा हाच धर्म होतो. प्रपंचाचे पाश हे पाशच राहात नाहीत; अशी प्रपंची मुक्ततेची अनुभूती केवळ नित्यनेमे, अनन्यभावे नामस्मरणाने घडते. केवळ नामभक्तीने मूळ माहेर, अर्थात परब्रह्मस्वरूप प्राप्त होते आणि परमशांतीचा लाभ होतो; असे ती पांडुरंगभक्तांना 'सासर' रूपकातून; भारूड स्वरूपात, 'माहेर' रूपकात जाण्याचा नामभक्तीमार्ग प्रबोधित करते. भेदिक स्वरूपात मांडलेल्या सासरमाहेरच्या रूपकातून मुक्ताई सांगते –

*बाई मी जाते माहेराला । माझ्या मूळ घराला ।।१।। धृ ।।*
*माझ्या मुलीचे तीन सासरे । त्यांत दोन वाईट आहेत खरे ।*
*एक आहे गरीब बिचारा । मानीत नाही मी त्याला ।।२।।*

सत्त्वरजतमात्मक तीन सासऱ्यांच्या, वासनादेहाच्या सगुण रूपातून निसटून मी मूळ घर, निर्गुण परब्रह्मस्वरूप होते. असे म्हणत प्रपंचाचे सांगरूपक मुक्ताबाईंनी मांडले आहे –



*माझ्या मुलीचे सहा दीर । काय सांगू मी त्यांचा कुविचार ।*
*काम क्रोध मद मत्सर गर्व अहंकार । गांजिती मजला ।।३।।*
*आशा मनशा इच्छा कल्पनेने । घात केला या चौघी जणींने ।*
*वासना नांदुली मोठी चावुटली । धरिती गालुच्या गाला ।।४।।*
*माया सासू मोठी घांगडी । हिला प्रपंचाची गोडी ।*
*येता जाता थापडी । धरिती गालाला ।।५।।*
*मोठ्या हौसेने पति म्या केला ।*
*जाऊनी राहिली त्यांच्या घराला ।*
*परी तो उगा मौनचि ठेला । बोलत नाही मजला ।।६।।*
*ऐसी मुक्ताई गांजिली । या सादुसंताशी शरण गेली ।*
*जाऊनी तेथेची राहिली । मुळ स्वरूपाला ।।७।।*

सांगरूपकातून सासुरवाशीणीच्या गांजल्या रूपाचे संवेद्य दर्शन घडवित साधूसंतांच्या संगतीतून भक्तिमार्ग स्वस्वरूपानुभूती घडविणाऱ्या मुक्ताबाईंनी, भक्तिमार्गे जाऊन; सच्चिदानंदरूप होण्याचा, प्रापंचिकांना प्रबोध केला आहे.

२. 'नामयाची दासी' म्हणविणाऱ्या जनाबाईंच्या रचनांमधून स्त्रीसंवेदनेतून परमार्थ प्रबोध प्रबोधित होत राहिला आहे. संसारप्रपंचात राहून कीर्तनभक्तीमधून भक्तियोग साधना करणाऱ्या नामदेवांचे दास्यत्व स्वीकारून; सेवावृत्तीमध्ये रमलेल्या जनाबाईंच्या ठिकाणी स्वाभाविकपणे, स्त्रीसुलभ सेवा, शरण्यता, प्रपंच्याधारशक्तिमत्ता, श्रद्धा, करुणा, दया, प्रेमभाव जाणवतो. स्त्रीचे सांसारिक गृहिणीपदीचे श्रमजीवनही सहजच प्रकट होते. नामदेवांच्या दास्यत्वाने हरिभक्तीपरायण झालेल्या जनाबाई, श्रमसेवेच्या लयबद्ध अवस्थेत नामभक्तीचा लयबद्ध आविष्कार करतात–

*दळण्याच्या मिषें । विठ्ठल सावकाशें ।।१।।*
*देहबुद्धीचे वैरण । द्वैत खडा रे निसून ।।२।।*

*एकलीच गातां दुजा साद उमटता ॥३॥*
*कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ॥४॥*
*खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोतां जनींच्या भावा ॥५॥*

नामभक्तियोगाने द्वैताचा खडा निसून देहबुद्धी हरपते ही अद्वैतानुभूती जनींच्या ठायी प्रकटते. पांडुरंग आणि जनाबाईंचे हे 'अद्वैत'; द्वैत भावातून भज्य–भक्त स्वरूपात, भक्तिरूपाने 'अद्वैत' होऊन प्रकटते –

*जनी जाय शेणासाठी । उभा आहे तिच्या पाठी ॥१॥*
*पितांबराची कांस खोवी । मागे चाले जनाबाई ॥२॥*
*गौऱ्या वेंचूनि बांधिली मोट । जनी म्हणे द्यावी गाठ ॥३॥*
*मोट उचलून डोईवर घेई । मागे चाले जनाबाई ॥४॥*

भक्तिपरायण जनाबाई फक्त पुंडलिकांचा मोठेपणा गाते. पांडुरंगाला पंढरपुरात आणल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते –

*पुंडलिक भक्तबळी । विठू आणिला भूतळी ॥१॥*
*अनंत अवतार केवल । उभा विटेवरी सकळ ॥२॥*
*वासुदेवा न कळे पार । नाम्यासवें जेवी फार ॥३॥*
*भक्त भावार्त विकला । दासी जनीला आनंद झाला ॥४॥*

नामदेवांची दासी जनाबाई श्री ज्ञानेश्वरांना सखा, बंधू मानते आणि 'माऊली' श्री ज्ञानेश्वरांना विनविते–

*ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥१॥*
*मरोनियां जावें । बा माझ्यापोटा यावें ॥२॥*
*ऐसें करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥३॥*
*जावे ओवाळूनी । जन्मोजन्मी दासी जनी ॥४॥*

स्त्रीसंवेदनाची, भक्तियोगातून, जनाबाईंच्या ठायी घडलेली ही परमावधी होय. कुटुंबवत्सलतेचा अनुभव घेत, जनाबाईंनी ज्ञानदेवांचे परब्रह्मरूप साक्षीभूत केले आहे.

भेदिक रचनेतून देखील, जनाबाई याच कुटुंबवत्सलतेने परात्पर परमेश्वराला, 'विठ्ठल' सगुण रूपात अनुभवतांना; ब्रह्मविद्येची तत्त्वमिमांसा,



भक्तियोगाच्या साधनेतून, स्त्रीभाषेतून साधतात –

*अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ॥१॥*
*तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ॥२॥*
*तुझे गेलें मढें । तुला पाहून काल रडे ॥३॥*
*उभी राहूनी आंगणी । शिव्या देत दासी जनी ॥४॥*

व्रात्य, आडदांड, अवखळ, खोडकर परंतु तेव्हढाच गोजिरवाणा लडिवाळ अशा आपल्या बाळ्याला मातेनं शिव्या घालून लाड करावेत त्याचे खोडकरपण सांभाळता होणाऱ्या त्रेधातिरपिटीबद्दल मातेनं स्वतःला शिव्या घालाव्यात किंवा बायकोनं वैतागून आपल्या प्रियाला शिव्या घालाव्यात तेव्हढ्या आत्मियतेने जीव ओवाळून टाकून श्री विठ्ठलाला जनाबाई आवाहीत करीत आहेत.

भक्तिरंगात रंगून जातांना जनाबाई म्हणतात –

*हरिहर ब्रह्मादिक । नामे तारिलें तिन्ही लोक ॥१॥*
*ऐसा कथेचा महिमा । झाली बोलायाची सीमा ॥२॥*
*जपे तपे लाजविलीं । तीर्थे शरणागत आली ॥३॥*
*नामदेवा कीर्तनी । ध्वजा आल्या स्वर्गातूनी ॥४॥*
*देव श्रुती देती ग्वाही । जनी म्हणे सांगू कायी ॥५॥*

भक्तियोगाचा महिमा वर्णन करतांना कीर्तनभक्तीची महानता जनाबाई स्पष्ट करतात. कीर्तनापुढे जप, तप, तीर्थयात्रा हे मार्ग फिके होत. हरिकीर्तनाने आणि नामभक्तीने हरिहरब्रह्मादिक यांच्या, तीनही लोकांचा उद्धार झाला आहे; याची ग्वाही स्वतः देव आणि श्रृतीही देतात; असे जनाबाई सांगतात. म्हणूनच –

*ऐसा कीर्तन महिमा सर्वामाजी वरिष्ठ ।*
*जड मूढ भाविका सोपी केली पायवाट ॥*
*नामयाची जनी लोळे संतांच्या पायी ।*
*कीर्तन प्रेमरस अखंड देंईगे विठाई ॥*

जनाबाई कीर्तन प्रेमरस अखंड असावा; एव्हढ्याच कृपेची श्री विठ्ठलांकडून अपेक्षा करतात. नारदांनी भक्तीची व्याख्या करतांना भक्ती ही 'प्रेमरूपा' आहे अशी व्याख्या केली आहे. प्रापंचिकांना गोतावळ्यात हा प्रेमानुभव घेता येतो यासाठीच भगवंतांनाच जनाबाई आपल्या कुटुंबक्रीडेत, श्रमजीवनात सामावून घेतात.

३. संतांच्या संगतीत, 'चहू देहाची तुटली दोरी । म्हणे चोखयाची महारी' आवर्जून सांगते –

*नामाचे चिंतन अखंड जयां वाचे ।*
*हेचि साधनाचें सार एक ॥१॥*
*मागील परिहार पुढे वाढें सीण ।*
*नामबीज खूण सांगितली ॥२॥*
*अवघ्या उपाधी तुटताती नामें ।*
*भाविकांसी वर्म सोपें हेचि ॥३॥*
*आणिक नका पडूं गबाळाचे भरी ।*
*म्हणतसे महारी चोखयाची ॥४॥*

गबाळाचे अर्थात संसारात गुंतून पडू नका; संसाराच्या साऱ्या उपाधींवर मात करून जगता येते; ते 'नामाचे चिंतन अखंड' करून!

संत निर्मळालाही प्रपंच, माया एखाद्या सर्पदंशासारखी किंवा नशेसारखी वाटते. प्रपंचाचा छंद निरर्थक आहे असे सांगत ती म्हणते–

*आतां बहु बोलणें सारोनियां ठेवा ।*
*उगवा हा गोवा मायबापा ॥१॥*
*संसाराचा छंद नकोसा हा झाला ।*
*परमार्थ भला संता संगे ॥२॥*
*जे आहे कडु ते लागे गोड ।*
*गोडाचे जे गोडु लागतसे कडु ॥३॥*



*निर्मळा म्हणे सुख तुमचे पायी ।*
*आणिक मी काही देणें दुजे ॥४॥*

संसाराचा छंद टाकून; नामाचा छंद जडला; तर आज गोड वाटूनही दुःखाचीच अनुभूती देणारा संसार, असार अर्थात कडू वाटू लागेल आणि खरे सुख प्राप्त होईल. संतांच्या संगतीत 'गोवा उगवेल' अर्थात अध्यात्मछंद जडेल अशी ग्वाही निर्मळा देते.

संत कान्होपात्रा, वृत्तीने देहाचा उपभोग देऊन उदरनिर्वाह करणारी; गावगाड्याच्या दृष्टीने वेशीबाहेरची 'वेश्या'. वासनाभोगाचा बाजार वेशीवर टांगल्यावर; देहाला निर्वासनामयता येऊन परब्रह्माचा वेध लागतो; असा अनुभव संतसंगातून येतो; अशी ग्वाही देणारी, कान्होपात्रा म्हणते –

*जन्मांतरीचें सुकृत आजी फळासी आले ।*
*म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ॥१॥*
*धन्य भाग्य आजी डोळिया लाधलें ।*
*म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ॥२॥*
*धन्य चरण माझे या पंथे चालिले ।*
*म्हणोनी देखिले विठ्ठल चरण ॥३॥*
*येऊनियां देहासी धन्य झाले ।*
*म्हणोनी देखिलें विठ्ठल चरण ॥४॥*
*घाली गर्भवाला कान्होपात्रा म्हणे ।*
*जन्मोजन्मी देखेन विठ्ठल चरण ॥५॥*

सत्संगछंद जडला की जातपातधर्म, उच्चनीचभेद, स्पृश्यास्पृश्य सर्व सोवळेओवळे विटाळ अवघे विरून जातात. 'सच्चिदानंदघन वर्षावात' स्त्रीपुरुष, जीवजगत, चर अचर, अवघा भेद विराम पावतो. मग स्त्रीत्व–स्त्रीसंवेदना देखील व्यापक कारुण्यात रूपांतरित होते. मुक्ताबाईंनी म्हटल्याप्रमाणे; 'मुंगी उडाली आकाशी तीने गिळीले सूर्याशी' मुंगीस्वरूपाला महाकाश स्थिती प्राप्त होते आणि अमृतानुभवातील शिव–

शांभवी योग घडतो. केवळ कैवल्यस्थिती राहते. म्हणूनच सोयराबाई म्हणतात –

*आनंद सोहळा आषाढी पंढरी ।*
*कीर्तन गजरी वाळवंटी ।।१।।*
*होता जयजयकार आनंद सोहळा ।*
*अमृत गळाला वैष्णवासी ।।२।।*
*नाठवे भावना देहाचा विसर ।*
*विठ्ठल उच्चार संतजनी ।।३।।*
*तेथे जीवें भावे प्रेमाची आरती ।*
*लोटांगणी जाती सोयरा भावे ।।४।।*

अमृताच्या वर्षावात सचैल स्नान करण्याचा परमानंदसुखसोहळा केवळ वाळवंटातल्या कीर्तनगजरात अनुभवता येतो. भावना, वासना याने ओतप्रोत इहस्थूल देहाचा देहीच विसर पडतो. सोयरा भाव जागृत होतो आणि केवळ प्रेमपूर्ण आरती जीवेभावे घडू लागते. चैतन्याला चैतन्याने प्रकाशरूप पाहावे असा हा अनुभव.

४. श्री संत एकनाथकालीन वेणाबाईंनी आपल्या भक्तिमार्गावरील वाटचालीत स्फुट रचनांऐवजी 'रुक्मिणी स्वयंवरा'सारख्या आख्यान कविता; नाथांच्या अभिप्रायात्मक अध्यात्मिक चर्चेच्या स्वरूपात, लिहिण्याचा केलेला प्रयत्नही लक्षणीय आहे. ग्रंथरूपाने कीर्तन करण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. आख्यान कविता लिहिण्याचा स्त्रीसाधकाचा असा हा अपवादात्मक प्रयत्न होय. रामायण आणि कृष्णचरित्रातले विषय त्यांच्या स्त्रीसुलभ स्वभावाशी संवादी आहेत.

एकोणीसाव्या शतकातल्या आनंदसंप्रदायी श्री संत संतामायी याच आनंदसुखसोहळ्याचा अनुभव सांगतांना म्हणतात –



*करिता ध्यान गळाले मन । नाही देहाची आठवण ।।१।।*
*सापडली गुरुकिल्ली । स्वरूपास पुढे दिली ।।२।।*
*बाहेर निघाया नको वाटे । झाले आनंदाची भेट ।।३।।*
*सखया कृपे संती म्हणे । दृढभाव धरा ध्यानी मनी ।।४।।*

लौकिक अर्थाने कोळी समाजात जन्माला आलेल्या संतामायी निक्षून सांगतात –

*जात नाही मला गोत नाही मला*
*एकटा नटला स्वयंभची ।।१।।*
*स्वयंभ तो हरी बाळ क्रीडा करी ।*
*गोपीका त्या नारी भुलविल्या ।।२।।*
*भुलविल्या वेणुनादाचे छंदे ।*
*ब्रह्मादिक पदे अशाश्वते ।।३।।*
*सखयाकृपे संती जाणोनी स्वयंभ ।*
*होऊनी निरालंब राहिली असे ।।४।।*

देहभान हरपण्याची प्रक्रिया प्रत्येक स्त्रीसंताच्या अभंगातून संवेदित होते. त्याचप्रमाणे, मातृत्व, कुटुंबवत्सलत्व आणि प्रियु प्रिया भावातील अद्वैत हे विशेष स्पंदन स्त्रीसंतविभूमत्त्वातून श्रवत राहते; हे सहज उल्लेखातूनही ध्यानात येते. असे असले तरी हा देहभाव, ही प्रकृतीची स्पर्श संवेदनाही स्वयंभूतत्त्व अनुभूत होतांना गळून पडते हेच सातत्याने प्रकटलेले दिसते.

५. संतकृपेची समीक्षा करून; श्रेयनामावली प्रसिद्द करणारी संत बहिणा स्त्रीसंतपरंपरेत विशेषत्वाने प्रकट होते. अवघ्या संतपरंपरेचा मागोवा घेतांना ती म्हणते –

*संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।*
*ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।*
*नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें ते आवार ।।३।।*

*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।४।।*
*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।५।।*
*बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपणा केले ओजा ।।६।।*

अशी श्रेयनामावली प्रसिद्ध करतांना ती पूर्वसूरी संतांची 'बहिणाबाई' झाली असल्याची संवेदना सहजच प्रकट होते. 'अक्का' आणि 'माऊली'च्या वृद्धत्वाखेरीज कोडकौतुकाने ही नामावली प्रकट कशी झाली असती? आपल्या अंतकाळी 'अद्वैत' होण्याचे भाग्य आपल्या कपाळी लिहिले असल्याची स्वच्छ जाणीव बहिणीला आहे –

*घट फुटलियावरी । नभ नभाचे भितरी ।।१।।*
*ऐसा देह गेलीयानें । उरे स्वरूप चिद्धन ।।२।।*
*जळ आटलिया जाण । प्रतिबिंब म्हणे कोण ।।३।।*
*त्यागली कापुरासी । अग्नीरूप नाही म्हैसी ।।४।।*
*बहिणी ऐसें नाम माया । गेले ध्याऊनी अद्वया ।।५।।*

वेदान्त स्वरूप झालेल्या बहिणांचा अधिकार खरोखरीच मोठा. म्हणूनच सद्गुरू तुकारामांसह, श्री संत ज्ञानेश्वरांपर्यंत सर्वांचे गुणवर्णन त्या मोठ्या आत्मियतेने किंबहुना वात्सल्याने करतात.

संत संगाने संसारपाश वासना तुटून जाते याची अनुभूती त्या ठामपणाने व्यक्त करतात –

*चित्त नाहीं शुद्ध जयाचें अंतर ।*
*विषयी तत्पर सर्व काळी ।।१।।*
*तया ज्ञान साधे असे तों घडेना ।*
*ज्ञानावीण जाणा मोक्ष कैंसा ।।२।।*
*नाहीं ज्या अपेक्षा साधनाची चाड ।*
*दोषाचा तो घड ओतलासे ।।३।।*
*बहिणी म्हणे ज्ञान संतसंगे होय ।*
*चित्त जरी राहे सदा पायी ।।४।।*



ज्ञान होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संतसंग होय, असे सांगून; ज्ञान हेच सर्वांचे अंतिम 'लक्ष्य' हवे असे बहिणाबाईंना वाटते. ज्याला ज्ञानाची चाड नाही तो वासनादेह म्हणजे केवळ दोषांनी भरलेला घडा होय असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

'ज्ञान' प्राप्त झाले तर अंतरी मन प्रसन्नात्मा होते तो आत्माराम सिद्ध झाला; तर देहभोग, प्राक्तन, प्रपंच, सारे काही आपल्या हाती येते. त्याचा विनियोग विदेही होण्यासाठी सहज करता येतो; असे बहिणांना वाटते. त्यामुळे प्राक्तनामुळे देहभोगाची कल्पना, त्या ज्ञानमार्गी होऊन धुडकावून लावतात. 'कुळ'भोक्ती स्त्री जेव्हा 'अकुल' अनुभूती घेऊ लागते तेव्हा ती केवळ ज्ञानानंद उपभोगते. हा आनंद भोगण्यासाठी तुकाराम वृत्तीने मन सिद्ध केले पाहिजे असे बहिणांना सुचवायचे आहे. त्या म्हणतात –

*शरीराचें माथां वर्तते प्राक्तन ।*
*शरीर तें जाण प्राक्तनाचे ।।१।।*
*ज्ञानियांचे मत देह मिथ्या ।*
*प्राक्तनाची कथा तेथें कोण ।।२।।*
*प्राक्तन भोगवी भोग तो शरीरीं ।*
*ज्ञानिया अंतरी सुखरूप ।।३।।*
*बहिणी म्हणे देह प्राक्तन तोवरी ।*
*विचारी अंतरी निश्चयाचा ।।४।।*

सच्चिदानंद पदवी प्राप्त करण्याचा अर्थात ज्ञानात्मक होऊन आनंद भोगण्याचा निश्चय मनाने केला; की प्राक्तन आणि देह दोहोंवरही विजय मिळविता येतो असे स्पष्ट मत बहिणांनी व्यक्त केले आहे. बहिणांची भूमिका ही समाजधुरीण कर्त्या स्त्रीची आहे. लोकशिक्षक भूमिकेतून तरीही वत्सलभावाने ती प्रबोध करते.

अभेदत्वाने ज्याचे विभूतिमत्व प्रकटते तोच खरा ब्राह्मण होय;

असे साधे सूत्र बहिणाबाईंनी प्रसृत केले आहे. जन्माने पुरोहित ब्राह्मण झाला, म्हणजे त्याला जातीचा ब्राह्मण म्हणतात. मात्र तो केवळ नावाचा ब्राह्मण; वृत्तीचा ब्राह्मण नव्हे ते त्यांनी स्पष्ट करून; अवघ्या पाखांडावर प्रहार केला आहे; तो जाणकार धुरीण स्त्रीच्या भूमिकेतूनच होय! त्या म्हणतात –

*गुणांत असोनी गुणांसी नातळे ।*
*क्रियेसी नाकळे अणुमात्र ।।१।।*
*तोचि गा ब्राह्मण वोळखावा जनीं ।*
*द्वैत जयास्वप्नी आढळेना ।।२।।*
*षडूर्मीरहित षड्भाव नातळे ।*
*दोषांचेनि मेळे सापडेना ।।३।।*
*बहिणी म्हणे सत्य न संडी सर्वथा ।*
*ब्राह्मण तत्त्वता तोचि एक ।।४।।*

खऱ्या अर्थाने ब्रह्मस्वरूप झालेल्या, सच्चिदानंदपदवी प्राप्त केलेल्या, श्रीसंत तुकारामांचा अनुग्रह बहिणाबाईंना घडला होता. त्यांच्याकडून बहिणाबाई प्रकाशमान झाल्या होत्या. सद्गुरूशिष्य अद्वैत हे प्रत्यक्ष परब्रह्मस्वरूपच होय. बहिणाबाई अशा कृतकृत्य झाल्या. त्या म्हणतात–

*तुकारामरूपें प्रत्यक्ष बोलत ।*
*होई सावचित्त सावधान ।।१।।*
*पाहे परतोनी आपुलिया दिठी ।*
*सांगितली गोठी एक कानी ।।२।।*
*तयाचा उच्चार करू नये वाचे ।*
*झालेसें चित्ताचे समाधान ।।३।।*
*बहिणी म्हणे मना केलासे प्रकाश ।*
*अस्ता उदयास ठाव नाही ।।४।।*

परब्रह्मस्वरूप अवस्था प्राप्त झाली, अर्थात ज्ञानमय अवस्था प्राप्त झाली की 'अद्वैत' अवस्थेत उदय आणि अस्त हे द्वैतही नाहिसे होते. अवघ्या



भेदरहिततेचा ठेवा म्हणजे सच्चिदानंदस्वरूप होय; याचा अनुभव बहिणांनी सद्गुरू श्री संत तुकारामांमध्ये घेतला. 'कुल', 'अकुला'चे द्वित्त सरले की स्त्रीपुरुष संवेदनाही आपसूकच हारपते. संतसंगात ही अद्वैत सुखसोहळ्याची परमावधी घडते. बहिणाबाईंनी, भागवत संप्रदायात, ही भक्तीची परमावधी गाठली. म्हणूनच त्यांच्या अभंगातील 'फडकती ध्वजा' हे बिरूद खरेतर त्यांनाच लावता येते.

**समारोप** : अध्यात्म साधनेत सर्व भूतमात्रातील, सर्व प्रकारचे द्वैत अर्थात भेद नाहिसे होतात. सच्चिदानंदपदी पोहोचले की देहभावच नाहीसा होतो. मग तेथे स्त्रीसंवेदना, भावना या गोष्टी केवळ भाषा प्रतिमापुरत्या लौकिक अनुभूती स्पष्ट करण्याच्या मिशाने येतात. मुक्ताबाईंपासून बहिणाबाईंपर्यंतच्या स्त्रीसंतांचा मागोवा घेतला तर मुळात 'स्त्रीसंत' हा शब्दप्रयोगच चुकीचा ठरतो. 'संत' या पदावर कोणताही रूपभेद, देहभेद, विचारभेद राहातच नाही. लौकिक जीवनातील, स्थूल दृष्टी चिकित्सक अर्थात, बुद्धीजन्यतेने विचार करू लागले की असे भेद, भासमान होतात. भेदमूलक आविष्करण हे संतवाणीतील आविष्काराचे 'लक्ष्य'च नसते तेथे स्वस्वरूप, सच्चिदानंद अनुभूतीचे आत्माविष्कारण घडते. त्या आविष्करणाला साधन आणि माध्यम दोन्ही स्वरूपात भाषेचा वापर करावा लागतो. मात्र शब्दज्ञानाच्या आधाराने त्या संतवाणीची उकल करू गेले तर अर्थाचा अनर्थच होणार, हे उघड आहे. म्हणूनच संत, स्त्री असो की पुरुष असो त्यांच्या शब्दब्रह्माची उकल अध्यात्मलक्ष्यीपणानेच केली पाहिजे. स्त्री संतांचा मागोवा घेतला; तर संतपरंपरेतील भक्ति, ज्ञान, वैराग्य, ज्ञानोत्तर भक्ति अर्थात सर्वाभूती परमेश्वराची निरपेक्ष प्रेमभावे, उपकारापुरती सेवा एव्हढाच साध्य, सिद्ध भाव उरतो. 'अद्वैतात' अवघेच द्वित्त भेद हरपून सच्चिदानंदस्वरूप अवकाशच राहते!

* * *

# श्री ज्ञानेश्वरीतील दृष्टांताची मात

## (श्री ज्ञानेश्वरीतील दृष्टांत सृष्टी आणि दृष्टी)

*''कां जे लळेयांचे लळे सरती । मनोरथांचे मनोरे पुरती ।*
*जरी माहेरे श्रीमंत होती । तुम्हां ऐसी ।।''*

(अ. ९-१३)

या ओवीत श्रीमंत माहेराचा दृष्टांत देत, श्री ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांचा गौरव करीत, मोठ्या सलगीने 'अभिनववाग्विलासिनी' स्वरूपातील आपले 'भावार्थदीपिकेतील' अर्थात 'श्री ज्ञानेश्वरीतील' प्रवचन; मराठी बोली भाषेत; श्रोत्यांपुढे प्रतिभाप्रसादाने, रसाळपणे सादर केले आहे. श्रोत्यांना आणि ग्रंथ वाचणाऱ्या वाचकांना, त्या प्रवचनाचा सतत नाविन्यपूर्ण आणि अलौकिक अनुभव येत राहिला आहे. मोठ्या आत्मविश्वासाने या अनुभवाचे वर्णन करतांना श्री ज्ञानेश्वर म्हणतात, ''ऐका रसाळपणाचिया लोभा । की श्रवणीची होती जिभा । बोले इंद्रिया लागे कळंभा । एकमेकां ।। (अ. ६, २८). अशा अलौकिक अनुभव घडविणाऱ्या काव्याच्या काव्यसौंदर्याविषयी श्री ज्ञानेश्वरीच्या निर्मितीपासून सतत चर्चा होत राहिली आहे. श्री ज्ञानेश्वरीच्या काव्याची अशी अलौकिक अनुभूती घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्या उपमादृष्टांत सृष्टीत अर्थात प्रतिमासृष्टीत आहे; असा शोध घेतला; तर श्री ज्ञानेश्वरांच्या 'रेखेची वाहाणी'चे सौंदर्य अधोरेखित



करता येते.

श्री ज्ञानेश्वर हे जाणिवेची कला वाढविणारे प्रतिभावंत कवी होते हे जेवढे खरे तेवढेच ते जाणीवपूर्वक 'कलाकवींप्रमाणे' कलाकुसर म्हणून 'उपमादृष्टांत कोंदाकोंदी' करीत नाहीत हेही खरे. प्रतिभेचा वाग्विलास स्वाभाविकपणे प्रेममयतेने त्यांच्याकडून घडतो. डॉ. वाळिंबे म्हणतात तशी ती श्री ज्ञानेश्वरांची 'विदग्ध रसवृत्ती' असते. अलंकारशास्त्राचा विचार केला तर; एखाद्या विषयाचे वर्णन करून वैशिष्ट्य पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा दाखला किंवा उदाहरण दिल्यास दृष्टांत अलंकार होतो. त्या उदाहरणातून त्या वर्ण्यविषयाचे स्वरूपवैशिष्ट्य अगदी तंतोतंत, पूर्णरूपाने संज्ञापित होते. दृष्टांत असा प्रतिमारूप असतो. तो उपमा, उत्प्रेक्षा अशा साम्याधिष्ठित अलंकाराच्या मालिकेत असला; तरी त्याची प्रतिमारूप संज्ञापन क्षमता केवळ साम्याच्या पातळीवर न राहता अंतर्बाह्य स्वरूप दर्शनापर्यंत पोचते.

**१. बोलीं अरूपांचे रूप दावीन । अतिंद्रिय परि भोगवीन । इंद्रियाकरवी ।।**

– श्री ज्ञानेश्वरांना अवघ्या जगाला परतत्त्वाचा स्पर्श घडवायचा आहे; अशी त्यांची 'लोकनिष्ठ अध्यात्मवादी' जीवनदृष्टी आहे. श्री ज्ञानेश्वरी लेखनामागील त्यांचा हेतू स्पष्ट आहे. प्रापंचिकांना 'अमृतानुभव' घडविण्यासाठी अनुभवांमृत, आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून द्यावयाचे आहे. स्वाभाविकपणे त्यासाठी सर्वसामान्य माणसाच्या ऐंद्रिय अनुभवाच्या पातळीवर जाऊन; 'अतिंद्रिय' अनुभूती मनाला संवेदित होईल असा प्रवचनाविष्कार, श्रोतृसापेक्षतेने घडविणे आवश्यक आहे. त्यासाठी सामान्यांची 'बोली' प्रवचनमाध्यम 'बोल' म्हणून वापरणे आवश्यक होते. परंतु त्याचबरोबर सामान्य माणसाच्या ऐंद्रिय अनुभवाच्या कक्षेत 'अतिंद्रिय ज्ञान' संवेदित करावयाचे होते. अर्थातच त्यासाठी

जनसामान्यांच्या समग्र भावानुभवविश्वातील, सर्वांगीण माहिती, परंपरा, रूढी, लोकव्यवहार या गोष्टींतील दृष्टांत आपल्या प्रवचनात मोठ्या कौशल्याने मांडणे अभिप्रेत होते. त्यामुळे श्री ज्ञानेश्वरीतील काव्य आविष्कृत करण्यामागील हेतू आणि अपेक्षित शैली यांची वृत्तीच्या ठिकाणी पूर्णतः निश्चिती होती; हे लक्षात घेतले पाहिजे. जगाला 'आनंदाचे आवार' बोलीभाषेततून मांडण्यासाठी 'परतत्त्व स्पर्श' - आनंद लक्ष्यी शैलीचा स्वीकार करणे क्रमप्राप्त होते. 'स्वसंवेद्य' 'शब्दब्रह्म'मंडनाखेरीज ते शक्य नव्हते. परंतु असे घडविताना त्यांच्या कवित्वात अगदी स्वाभाविक दिव्य प्रतिभाविलास घडतो; तो त्यांच्या ठायी असलेल्या जनसामान्यांविषयी 'लाभावीण प्रित' करणाऱ्या जगत्माऊलीपणाच्या स्वाभाविक वृत्तीमुळे!

## २. अनिर्वाच्य परि मना परिमाणे ना!

ज्ञान हे शब्दातीत आहे. ज्ञानाची स्वसंवेद्यता केवळ मनाच्या परिमाणानेच अर्थात जाणीवेच्या कक्षेतच अनुभवता येणार यासाठी शब्दब्रह्म ॐकाराला आवाहन करून शब्दातील संवेदनक्षमता जागविण्यासाठी अनुभवांना शब्दरूप देण्याशिवाय पर्याय नाही; हे ज्ञानेश्वरांच्या सूर्यप्रज्ञेला स्वभावगत आहे. दृष्टांत शब्दरूप होताना, ही संवेद्यता प्रज्ञास्पर्शाने अनुभवातील परतत्त्वस्पर्शाचा स्पर्श श्रोत्याच्या भावयित्री प्रतिभेला संवेदित करते. जसे श्रोत्यांच्या भावयित्री, साक्षात्कारी प्रतिभेचे गृहितत्त्व प्रत्यक्ष सिद्ध करण्यासाठी, श्रोतृसंवाद साधताना, श्री ज्ञानेश्वर 'भवादृश सर्वज्ञ श्रोते' असा श्रोत्यांचा गौरव करून; ते मुळातच ज्ञानी आहेत. त्यामुळे त्यांना ज्ञान प्रतिपादन करण्याची आवश्यकताच नाही; असे दृष्टांतातून सलगीने प्रतिपादितात आणि त्यांना ज्ञानोत्सुक करतात.

जसे -

*''अहो हिमकरासी विंजणें। की नादापुढें आइकवणें ।*
*लेणियासी लेणें । हे कहीं आथी ।।१०।।*



*सांगा परिमळे काय तुरंबावें । सागरें कवणे ठायीं नाहावें ।*
*हे गगनचि आडे आघवें । ऐसा पवाडु कैंसा ।।११।।*

(अ. ९-१०-११)

तत्त्वज्ञानातील संकल्पना आणि योगमार्गातील पारिभाषिक संज्ञा आणि अवस्था यांना मूर्त करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर 'शब्दब्रह्म कवळून' दृष्टांत स्वरूप प्रतिमांमधून त्यांना मूर्त करतात.

## ३. अमूर्ताची, मूर्त स्वरूप अनुभूती घडविणारे दृष्टांत

परानुभूती, चैतन्य, परमात्मतत्त्व, कैवल्य, ज्ञान, हळुवारपण, प्रेम, गुरुकृपा, रसानुभूती, ज्ञानमयअवस्था या आणि अशा असंख्य गोष्टी अनुभूती, पारिभाषिक संज्ञा केवळ अमूर्त होत. ज्ञानमार्गावर 'दृष्टअदृष्ट' श्रोतेही ज्ञानमयतेचा अनुभव घेऊन विजयी होवोत हे तर श्री ज्ञानेश्वरांचे पसायदानातील मागणे. दृष्टांत असे सरस; की अमूर्ताची मूर्तस्वरूपानुभूती मनाला घडवून अज्ञान्यालाही ज्ञानानुभूती घडविणारे - जसे-

*''या उपाधीमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।*
*ते तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।।१०।।''*

(अ २-१२६)

असे सर्वगत गुप्तपणे अस्तित्वात असलेले 'चैतन्य' जे केवळ तत्त्वज्ञ आणि संत यांना अवगत होते. ते अमूर्त 'चैतन्य' दृष्टांत मालिकेतून श्री ज्ञानेश्वर सर्वांना अवगत करतात - जसे- (अ. २ मध्ये)

*''सलीलीं पय जैंसे । एक होऊनि मीनलें असे ।*
*परीं निवडुनि राजहंसें । वेगळे कीजे ।। १२७।।*
*कीं अग्निमुखे किडाळ । तोडोनियां चोखाळ ।*
*निवडिती केवळ । बुद्धिमंत ।।१२८।।*
*ना तरी जाणिवेच्या आयणी । करितां दधिकडसणी ।*
*मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ।।१२९।।*

*कीं भूस बीज एकवट उपणितां राहे घनवट ।*
*तेथ उडे ते फलकट । जाणों आलें ।।१३०।।*
*तैसें विचारिता निरसलें । तें प्रपंचु सहजें सांडवलें ।*
*मग तत्वता तत्व उरलें । ज्ञानियांसी ।।१३१।।''*

सद्‌भक्तांच्या ठिकाणी भगवंताविषयी एकनिष्ठेने दृढश्रद्धा असते; ही 'श्रद्धा' कशी हे स्पष्ट करतांना श्री ज्ञानेश्वर दृष्टांत देतात-

*रीगतां वल्लभापुढे । नाही आंगी जीवीं सांकडें ।*
*तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ।।''*

*(अ. १३-६०७)*

यांत सती व पतीचा दृष्टांत आहे. तर-

*''मिळोनि मिळताचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें ।*
*मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ।।''*

(अ. १३-६०)

येथे गंगाजळ-समुद्र यांचा दृष्टांत दिला आहे. तसेच -

*''सूर्याच्या होण्या होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे ।*
*हे विकलेपण साजे । प्रभेसि जेवी ।।''*

(अ. १३-६०९)

यात सूर्य आणि प्रभा यांचा दृष्टांत, किंवा-

*''पै पाणियाचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें ।*
*ते लहरी म्हणती लौकिकें एऱ्हवी ते पाणी ।।''*

(अ. १३-६१०)

लहरी आणि पाणी यांचा दृष्टांत- अशा रितीने श्रद्धा किंवा दृढ विश्वास यांचा अनुभव मूर्त केला आहे.

श्री ज्ञानेश्वरांनी अहिंसा, स्थितःप्रज्ञता, शांती आदि अमूर्त संकल्पनांनाही एकापेक्षा एक सरस दृष्टांतातून श्रोते आणि वाचक यांच्या मनात मूर्तरूप दिले आहे. अर्थातच या अमूर्त गोष्टी स्पष्ट करण्यासाठी श्री



ज्ञानेश्वरांना ऐंद्रिय अनुभूती घडविणाऱ्या व्यावहारिक गोष्टींतूनच दृष्टांत घ्यावे लागले. जसे 'अहिंसे' चे मूर्तरूप उभे करतांना श्री ज्ञानेश्वर अ. १३ मध्ये दृष्टांत देतात-

*''तरी तरंगु नोलांडितु । लहरी पायें न फेडितु ।*
*सांचलु न मोडतु । पाणियाचा ।।२४६।।*
*वेगे आणि लैसा । दिठी घालूनि आंविसा ।*
*जळीं बकु जैसा । पाउल सुये ।।२४७।।*
*कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार ।*
*कुचंबैल केसर । इया शंका ।।२४८।।*
*तैसे परमाणु पां गुंतले । जाणूनि जीव सानुले ।*
*कारुण्यामाजीं पाउलें । लपवूनि चाले ।।२४९।।*
*ते वाट कृपेची करितु । ते दिशाचि स्नेह भरितु ।*
*जीवातळी आंथुरितु । आपुला जीवु ।।२५०।।*
*ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना ।*
*हें अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ।।२५१।।*
*पै मोहाचेनि सांगडे । लासी पिलीं धरी तोंडें ।*
*तेथ दातांचे आगरडे । लागती जैसे ।।२५२।।*
*कां स्नेहाळू माये । तान्ह्याची वास पाहे।*
*तिये दिठी आहे । हळूवार जें ।।२५३।।*
*नाना कमळदळें । डोलविजती ढाळें ।*
*तो जेणे पाडें बुबुळे । वारा घेपे ।।२५४।।*
*तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसीतू जाय।*
*लागती तेथ होय । जीवां सुख ।।२५५।। ''*

या दृष्टांतमालिकेत वर्तनपर्यायांतून आणि वर्तनपर्यायांना कारण असलेल्या भावबंधातून 'अहिंसा' मनाच्या ठिकाणी मूर्त होत जाते. श्री ज्ञानेश्वरांच्या विवेचनात दृष्टांत मालिकांची अक्षरशः कोंदाकोंदी आहे.

परंतु ही केवळ शैलीउपायांची गर्दी नाही. समोर बसलेले श्रोते कोणत्या ना कोणत्या दृष्टांताने (व्यावहारिक प्रमाणाने) ज्ञानात्मक पातळीवर जाऊन वर्ण्यविषय आत्मसात करतील; असा विचार करून जोपर्यंत श्री ज्ञानेश्वरांना श्रोत्यांना समजल्याची खात्री होत नाही; अर्थात हृदयसंवाद परिपूर्ण होत नाही; तोपर्यंत त्यांचा दृष्टांतस्फुरण स्रोत थांबत नाही. थोडक्यात 'शांत' रसाची परिपूर्ण अनुभूती श्रोत्यांना येऊन वक्ता आणि श्रोता यांची समतानता होत नाही तोपर्यंत ही दृष्टांतमालिका सुरूच असते. यामुळेच अलौकिक अनुभूती लौकिकात भोगण्याचे भाग्य श्रोत्यांना लाभते.

### ४. श्री ज्ञानेश्वरांच्या प्रतिभा प्रज्ञेचा, दृष्टांत प्रसृतीकरणातील जीवनव्यापी सर्वांगपरिपूर्ण आविष्कार :–

श्री ज्ञानेश्वरीतील प्रवचनप्रसृतीकरणामधील दृष्टांत सादरीकरणातील आविष्काराचे अवलोकन केले तर श्री ज्ञानेश्वरांच्या समोर तत्कालीन 'समग्र लोक'च नव्हे तर अदृष्ट 'लोक'ही समग्रतेने असल्याचे जाणवते. जगाला 'आनंदाचे आवारू' मांडण्याची ग्वाही देणाऱ्या श्री ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीच्या संदर्भात ते स्वाभाविकही आहे. त्याही अपेक्षा अलौकिक 'प्रज्ञाचक्षू'प्राप्त असलेल्या श्री ज्ञानेश्वरांचे 'स्नेहाळ माऊली' पण त्यांच्या प्रवचन सादरीकरणातून दृष्टांत वेल्हाळपणाने प्रकटते; याचा प्रत्यय रसिकांना येतो. इतिहासपुराणापासून विज्ञान व्यवहार यांचे पर्यंत. जीवनानुभूती मधील कोणतेही अंग सुटत नाही म्हणूनच श्री ज्ञानेश्वरांप्रमाणेच श्री ज्ञानेश्वरीचेही माऊलीपण प्रत्ययास येते.

#### i. पौराणिक कथा दृष्टांत –

वै. ह.भ.प. मामासाहेब दांडेकर कृपा प्रासादिक सार्थ ज्ञानेश्वरी, प्रस्तावना ह.भ.प. हरिश्चंद्र पाटील उर्फ लवटे महाराज या 'मे. शारदा साहित्य' या 'सार्थ श्री ज्ञानेश्वरी' प्रतीत सविस्तरपणे 'श्री ज्ञानेश्वरीतील काही पौराणिक कथा (दृष्टांत) नोंदविलेले आहेत. जिज्ञासूंनी त्या मुळातून पाहाव्यात. त्यांत– जनमेजयाचे अवलीळा दोष हरले, की टिटिभू चांचूवरी



। माप सूये सागरी, तया गीतार्थाची थोरी। स्वये शंभू विवरी ।, ध्वज स्तंभावरी वानरू । तो मूर्तिमंत शंकरू ।, जेणे संग्रामी हरू जिंतिला । निवातकवचाचा ठावो फेडिला । (अ. १– ३७, ६८, ७०, १४१ व २०० अनुक्रमे)

अध्याय २ मध्ये– पवाडा तुवां केला । गंधर्वासी ।।, तरी काय मी भस्मासुरू । अर्जुन म्हणे ।। ओवी क्र. १० व ३८.

अध्याय ३ मध्ये– देख पा जनकादिक । कर्मजात अशेख । न सांडिता मोक्ष सुख । पावते जाहले ।।, मृत गुरुपुत्र आणिला । तो तुवा पवाडा देखिला ।। अशा ओवी क्र. १५२ व ओवी क्र. १६३ अशा प्रकारे श्री ज्ञानेश्वरीतील अठराही अध्यायातील पौराणिक कथा संदर्भ दिले आहेत. अ. १८ मध्ये–

*पहिलिया वैराग्यगरळा । धैर्यशंभु वोडवी गळा ।*

ओवी क्र. ७८९

*सटवीचिये राती । न विसंबिजे जेवीं वाती ।।*

ओवी क्र. ८३७

*तेथ अमरत्वा वोगरिले । ते मरणचि लागे जालें ।*

ओवी क्र. १४७८

*नहुष स्वर्गाधिपति जाहला । परी राहाटी भांबावला*
*तो भुजंगत्व पावला नेणसी कासी ।।*

ओवी क्र. १४७९

*कीं गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती ।*
*मोहमहिषा मुक्ति । आनंदली असे ।।*

ओवी क्र. १६६६

*श्री गुरुचेनि नांवे माती । डोंगरी जयापासी होती ।*
*तेणे कोळिये त्रिजगती । येकवद केली ।।*

ओवी क्र. १७३०

*क्षीरसिंधु पुरिसरी / ... जाला ओ आमुते ।।*

ओवी क्र. १७५१

अशी जवळपास १८ अध्यायातील साठावर उदाहरणे दिली आहेत.

**ii. विज्ञान –**

वैज्ञानिक सूत्रे दृष्टांतांमधून उद्धृत झालेली अनुभवता येतात. उपरोक्त 'श्री ज्ञानेश्वरी' आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेत ह.भ.प. हरिश्चंद्र पाटील उर्फ लवटे महाराजांनी असे दृष्टांत नोंदविले आहेत ती सर्व उदाहरणे जिज्ञासूंनी मुळातून पाहावित. त्यातील काही अशी

**गतिभ्रमविषयक**

*अथवा नावें हन जो रिगे । तो थडियेचें रूख जातां देखे वेगें ।*
*तेचि साचोकारें जो पाहो लागें । तंव रूख म्हणे अचळ ।।*

(अध्याय ४, ओवी क्र. ९७)

*जातया अभ्रासवें । जैसे आकाश न धावें ।*
*भ्रमणचक्रीं न भंवे । धृव जैसा ।।*

अध्याय क्र. १३–४८९

**प्रकाश आणि अंधार विषयक–**

*जैशी पूर्वदिशेच्या राऊळीं । उदया येतांचि सूर्य दिवाळी ।*
*कीं येरीही दिशा तियेची काळी । काळिमा नाही ।।*

अध्याय क्र. ५–८६

**पर्जन्यचक्र विषयक –**

*जैसा मेघांचेनि तोंडे । सिंधु एके आंगे काढे ।*
*आणि नदी थेरीकडे । भरितीची असते ।।*

अध्याय क्र. ५–११९

**भौतिकतेतील भ्रामकतेचे निरसन –**

*ना तरी भौमा नाम मंगळु । रोहिणीते म्हणती जळु ।*
*तैसा सुखप्रवादु बरळु । विषयिकु हा ।।*

अध्याय क्र. ५–११६



**iii. कुटुंब, जाती, समाज, गांवगाडा संबंधविषयक दृष्टांत –**

लोकव्यवहारात कौटुंबिक संबंध, ज्ञातीसंबंध आणि समाजसंबंध, गावगाडा यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. तत्त्वज्ञान समजावून सांगताना यासंदर्भातील दृष्टांतामुळे तत्त्व सहज अनुभवगम्य होऊ शकते. श्री ज्ञानेश्वरांनी माहेर, सासर, मायलेक, ग्रामप्रमुख अशा लोकजीवनातील सर्व संबंधासंबंधीची उदाहरणे दृष्टांतरूपाने दिली आहेत.

**वात्सल्याने** अवधान द्यावे असे सांगताना–

*जैसा स्वभावो मायाबापांचा । अपत्य बोंले जरी बोबडी वाचा ।*
*तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ।।*

अध्याय क्र. १–६४

**सामाजिक संबंधातील कीर्तीचे महत्त्व –**

*लोक सायासें करूनि बहुते । कां वेंचिती आपुली जीविते ।*
*परी वाढविती कीर्तीते । धनुर्धरा ।।*

अध्याय क्र. २–२०९

**धर्मसांडला तर दुःखदोष भोगावा लागेल –**

*जैसी रांधवणी रससोय निकी । करूनिया मोले विकी ।*
*तैसा भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु ।।*

अध्याय क्र. २–२५४

**वात्सल्यभाव –**

*नातरी बालक बोबडां बोलीं । कां वांकुडा विचुका पाऊलीं ।*
*ते चोज करूनी माऊली । रिझे जेवी ।।*

अध्याय क्र. ९–६

*बाळक बापाच्या ताटीं रिगें । आणि बापातेचि जेवऊं लागे ।*
*कीं तों संतोषलेनि वेगें । मुखचि वोढवी ।।*

अध्याय क्र. ९–१५

**सामाजिक संबंध –**

*तो काय बाहुलिचियां काजा नाचवी?। की आपुलिये जाणिवेची*
*कळा वाढवी । म्हणौनि आम्हां या ठेवाठेवी काय काज ।।*
अध्याय क्र. ९–३१

**कर्मदरिद्री–**

*नातरी निदैवाच्या परिवरी । लोह्या रुतलिया आहाती सहस्त्रावरी ।*
*परि तेथ बैसोनि उपवासु करी । कां दरिद्रें जिये ।।*
अध्याय क्र. ९ –५९

**सामाजिक व्यवस्था –**

*जैसी राये अधिष्ठिली प्रजा । व्यापारें आपुलिया काजा ।*
*तैसा प्रकृतिसंगु हा माझा । येर करणें ते इयेचें ।।*
अध्याय क्र. ९ –११४

**श्रीकृष्ण स्वरूपाच्या निमित्ताने – सामाजिक व्यवस्था –**

*मज अकुळाचे कुळ वानिती । मज नित्याचेनि निधने शिणती ।*
*मज सर्वांतराते कल्पिती । अरिमित्र गा ।।अ. ९–१६६।।*
*मी स्वानंदभिरामु । तया मज अनेक सुखांचा कामु ।*
*आघवाचि मी असे समु । कीं म्हणती एकदेशी ।।अ. ९–१६७।।*
*किंबहुना ऐसे समस्त । जे हे मानुषधर्म प्राकृत ।*
*तयांचि नाव मी ऐसें विपरीत । ज्ञान तयांचें ।।अ. ९–१६९।।*
*किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा ।*
*तो मातेचा सोयरा । केतुला पां? ।। अ. १२ –८३।।*
*एरव्ही तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता ।।*
*काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ।।अ. १२–८५।।*

**iv. भूचर खेचर जलचर – प्राणीमात्रांच्या व्यवहारांचा दृष्टांतासाठी उपयोग**

*मोहाचेनि सांगडें लासी पिलीं धरी तोंडें । तेथ दांतांचे आगरडे ।*
*लागती जैसे ।। अ. १३–२५२ ।।*



*वेगें आणि लेंसा । दिठी घालूनि आंविसा ।*
*जळी बकु जैसा पाऊल सुये ।। अ. १३–२४७।।*
*हे उघड पांचवेउली । पंचधा आगी लागली ।*
*जीव पंचानना सांपडली । हरिणकुटी हे ।।*
*ऐसा असोनि इये शरीरीं । कोण नित्यबुद्धी सुरी ।*
*अनित्यभावाच्या उदरी । दाटीचिना ।। अ. १३–१०७० –७१।।*
*आतां माझियां जैसे मोहळ । जलचरां जेवीं जळ ।*
*कां पक्षियां अंतराळ मोकळें हें ।। अ. १६–१६८।।*
*पैं वासरूवाचा भोकसा । गाईपुढें ठेवूनि जैसा ।*
*उगाणा घेती क्षीररसा । बुद्धीवंत ।। अ. १६– ३८६।।*
*तरी तक्षकाची फडे । ठाकोनि कैं तो मणि काढे ।*
*कैं नाकींचा केशु जोडे । सिंहाचिये? ।। अ. १७–२४ ।।*
*पांख फुटे पाखिंरु । नुडे तरी नभीच स्थिरु ।*
*गगन आक्रमी सत्वरु । तो गरूडही तेथ ।। अ. १८. –१७१२।।*

**v. विविध धातू, साधने, व्यवहारातील वस्तू यांच्या व्यवहारांचा दृष्टांतासाठी उपयोग.**

*सिवतलियाही परिसे । लोहत्वाचिये अवदसे ।*
*न मुकिजे आयसें । गै कवणा बोलु।। अ. १८–१७७१*
*कीं औषधाचिया कडुवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी ।*
*ते आहाच न दिसे परी गुणीं । प्रकट होय ।। अ. २–८९।।*
*सांगें पितळेची गंधिकाळिक जै फिटली होय निःशेख ।*
*तै सुवर्ण काई आणिक । जोडूं जाईजे? ।। अ. ४–६४।।*
*जरी मंत्रेचि वैरी मरे । तरी वायां कां बांधावी केदारें? ।*
*रोग जाय दूध साखरें । तरी निंब कां पियावा ।। अ. ४–२२२।।*
*देखैं सोनयाचे निखळ। मेरूयेसणें ढिसाळ ।*
*आणि मातियेचें डिखळ । सरिसेंचि मानी ।। अ. ६–१२।।*

दर्पणाचिया जवळिका । दुजेपण जैसें ये मुखा ।
कां कुंकमे स्फटिका । लोहियत्त्व ये ।। अ. १३-१०१८।।
कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था ।
जीवी तैसे सर्वथा । कुटके जाले ।। अ. १६-३६८।।

### vi. पंचमहाभूते, पर्यावरण, वनस्पती इ.

उदयिला आकाशी । रवीची रवीतें प्रकाशी ।
हे नामव्यक्ती तसी ब्रह्मचिकरी ।। अ. १७-४०४।।
जैसा पर्जन्योदकाचा लोटु । विपाये धरी साळीचा पाटु ।
तो जिरे परी अचाटु । उपयोगु आथी ।। अ. १८-३८६ ।।
आघविया आकाशीं जैसे । अवकाशचि होऊनि आकाश असे ।
तूं सर्वपणे तैसें । पातलासि सर्व ।। अ. ११ -५३४।।
मग अग्निकुंडी बीजे घातली । तिये अंकुरदशे जेवी मुकलीं ।
तेवीं न फळतीचि मज अर्पिलीं । शुभाशुभें ।। अ. ९-४०२।।
जैसा वारा कां गगनीं विरे । मग वारेपण वेगळे नुरे ।
तेवी भक्त हे पैज न सरे । जरी ऐक्या आला ।। अ. ७-११४।।
हे रोहिणीचें जळ । तयाचें येइजे मूळ ।
तैं रश्मि नव्हती केवळ । होय ते भानु ।। अ. ७-२९।।
सांगे वात वर्ष आतपु धरें । ऐसे अभ्राच्छायाचि जरी सरे ।
तरी त्रिमाळिकें धवलारें करावीं का ।। अ. ५ ११४ ।।
ना तरी प्रलयवन्ही महावातु । या दोघा जैसा सांघातु ।
तैसा हा गंगासुतू सेनापति ।। अ. १ -११८ ।।
नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनी उभा ।
कां अवयवचि नभा । उदयला तो ।। अ. ६- २९५।।
परी उदकी जाली बाबुळी । ते उदकातें जैसी झांकोळी ।
कां वायाचि आभाळीं । आकाश लोपे ।। अ. ७-६०।।



### vii. अलौकिक कल्पनारम्य, श्रद्धापूर्ण दृष्टांत –

श्रुतिगौरवाच्या मांडवी । काम सृष्टीचा वेलु वाढवी ।
जंव कर्मफळेसी पल्लवी । अल्पवर्गी टेंके ।।
ऐसा नियतु कां कंदर्पु । जो भूतां या बीजरुपु ।
तो मी म्हणे बापु । योगियांचा ।। अ. ७-५०,५१।।
की आनंदाचीं वनें सासिन्नली । जैसी सौंदर्या राणीव जोडली ।
तैसी मनोहरें देखिलीं । हरीची वस्त्रें ।। अ. ११-१९८।।
अहा थोर वाउर जाहलें । अमृते संमार्जन म्या केले ।
वाटिके घेऊनि दिधले । कामधेनूतें ।।
परिसाचा खडवाचि जोडला । कीं फोडोनि आम्ही गाडोरां घातला ।
कल्पतरू तोडोनि केला । कूप शेता ।।
चिंतामणीची खाणी लागली । तेणें करें वोढाळे वोल्हांडली ।
भैसी तुझी जवळिक धाडिली सांगातीपणे ।।
अ. ११ -५३८, ५३९, ५४०।।
गंधर्वदुर्ग कामी पाडावे । काय शशविषाण मोडावे ।
होवावे मग तोडावे । खपुष्प की ।। अ. १५ -२१५।।
जैसा पळयांबूचा उभडु । बुडवूनि विश्वाचा पवाडु ।
होय आपणपे निवाडु । आपणचि ।। अ. १६-१३८।।
नाना कळा वैषम्यें चंद्रु । कां सांडिला आधीं नरेंद्रु ।
नातरी क्षीरसमुद्र । मंदराचळे ।। अ. १७-२२६ ।।

### viii. सर्वांगे दृष्टांत दर्शन –

वर उल्लेखिल्याप्रमाणे विश्वरूप दर्शन घडविणारे श्री ज्ञानेश्वर सर्वांगे दृष्टांत दर्शन घडवितात. याचा प्रत्यय श्री ज्ञानेश्वरीच्या पानोपानी, सर्व अध्यायातील विवेचनात घेता येतो, यात वरील अंगांशिवाय श्रीगुरुकृपा, अध्यात्मानुभूती, विविध योगांतील अनुषंगिक अवस्था, भावावस्था आणि कर्ममिमांसा, ज्ञानग्रहणसोहळा अर्थात गीताप्रसंग सोहळा; भज्य, भजक, भक्तीमिमांसा, द्वैताद्वैत मिमांसा, ज्ञानविज्ञान मिमांसा, मोह, माया,

प्रपंच आदि आदि कितीतरी सूक्ष्म विषयांच्या अंगांच्या स्पष्टीकरणार्थ दृष्टांत मालिका आलेल्या पाहावयास मिळतात. दृष्टांत विषयांचे पृथःकरण हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय, अलंकार विवेचकांच्या दृष्टीने होऊ शकेल.

**५. तेथ अभिप्रावो अंभिप्रायाते विये :**

श्री ज्ञानेश्वरांची दृष्टांत सृष्टी अक्षरशः थक्क करून सोडणारी आहे. प्रवचन हेतुपूर्वक असले तरी विषयज्ञान उद्‌घटित करताना स्फुरणारे काव्य म्हणजे केवळ प्रतिभाविलास आहे. समानधर्माश्रोता सलगीने अभिरूची संपन्न घडवून प्रसृतीकरण करण्याची; वक्ता म्हणून; श्री ज्ञानेश्वरांची स्वाभाविक लकब किंवा वृत्ती, त्यांच्या मनस्वी प्रतिमेस (आनंदाचे आवारू मांडू जगा) पूरक आहे.

दृष्टांत मालिका अनुभवू लागले की सरसतेच्या चढत्या कमानीमुळे श्रोता हरखून जातो. श्रोता विषयात एवढा गुंततो की श्री ज्ञानेश्वरांच्या आणि त्याच्या मनाचे अद्वैत घडते. कारयित्री आणि भावयित्री प्रतिभा प्रज्ञाविलासाने त्रिवेणीसंगमासारखी एकरून होऊन रसगंगा दुथडी भरून वाहू लागते.

*जेथ शांताद्‌भुत रोकडे । आणि येरां रसां पडप जोडें ।*
*हे अल्पचि परी उघडें । कैवल्य जेथ ।। अ. ११-१२ ।।*

अशी अवस्था निर्माण होते. अनावर आनंद प्रसंग अनुभवास येतो.

**i.** श्रोत्यांशी सलगी करून 'हृदय संवादास' सानुकुल, उत्सुक आणि आतुर करण्यासाठी श्रोत्यांची महती गाणारे दृष्टांत पाहिले की रसकल्लोळ निर्मिती प्रसंगीचे श्री ज्ञानेश्वरांचे दृष्टांत स्फुरण किती सहज कलाविष्कार घडविते हे लक्षात येते - (अ. ९)

*नातरी बालक बोबडां बोली । कां वांकुडां विचुकां पाउलीं ।*
*तें चोज करूनि माउली । रिझे जेवी ।।६।।*



*वाचुनि माझिये बोलतिये योग्य ते । सर्वज्ञ भवादृश्य श्रोते ।*
*काय धड्यावरी सारस्वतें । पढों सिकिजे ।।८।।*
*अवधारा आवडे तेसणां धुंधरू ।*
*परि महातेजीं न मिरवे काय करूं ।*
*अमृताचिया ताटीं वोगरूं । ऐसी रससोय कैंची? ।।९।।*
*हां हो हिमकरांसी विंजणे । कीं नादापुढें आइकवणें ।*
*लेणियासी लेणें । हें कहीं आथी? ।।१०।।*
*सांगा परिमळें काय तुरंबावे? सागरें कवणें ठायीं नाहावें? ।।*
*हे गगनचि आडे आघवें । ऐसा पवाडु कैंचा? ।।११।।*

अशी दृष्टांत मालिका संपूच नये एव्हढी मनोवृत्ती दंग करण्याची ताकद या स्फुरणात आहे.

**ii.** आत्मन वस्तुंच्या अविनाशित्वाचे व कैवल्याचे ज्ञान झालेली व्यक्ती ही निर्विकार होते व समत्वाने पाहू लागते याविषयी प्रवचन करताना- श्री ज्ञानेश्वरांच्या दृष्टांत मालिकेला बहर येतो. (अ. १२)

*पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं ।*
*रिपुमित्रा दोहीं । सरिसा पाडु ।।१९७।।*
*कां घरिचिया उजियेडु करावा । पारखियां आंधारू पाडावा ।*
*हें नेणेंचि पांडवा । दीपु जैसा ।।१९८।।*
*जो खांडावेया घावो घाली । कां लावणी जयानें केली ।*
*दोघां एकचि साउली । वृक्षु दे जैसा ।।१९९।।*
*नातरी इक्षुदंडु । पाळितया गोडु ।*
*गाळीतया कडु । नोहेंचि जेवीं ।।२००।।*
*तिही ऋतूं समान । जैसें कां गगन ।*
*तैसा एकचि मान । शीतोष्णीं जया ।।२०२।।*
*दक्षिण उत्तर मारुता । मेरू जैसा पंडुसुता ।*
*तैसा सुखदुःखप्राप्तां । मध्यस्तु जो ।।२०३।।*

*माधुर्ये चंदिका । सरिसी राया रंका ।*
*तैसा जो सकळिकां । भूतां समु ।।२०४।।*
*आद्यवियां जगा एक । सेव्य जैसें उदक ।*
*तैसें जयातें तिन्हीं लोक । आकांक्षिती ।।२०५।।*
*जी सबाह्य संगु । सांडोनियां लागु ।*
*एकाकीं असे आंगु । आंगी सूनी ।।२०६।।*

याचप्रमाणे 'संतुष्ट मौनी', 'सश्रद्ध' अशा ज्ञानीभक्तांच्या अंगीची गुणात्मकता दृष्टांत मालिकेतून श्री ज्ञानेश्वर प्रकट करतात. सर्वत्र वर्ण्यविषयावरील ज्ञानात्मक प्रवचन करतांना श्री ज्ञानेश्वरांची दृष्टांत मालिका ओघवत्या प्रवाही स्वरूपात प्रकटते.

**६. दृष्टांत प्रसृतीकरणाची मात :**

उपमा, उत्प्रेक्षा, अपन्हुती, रूपक दृष्टांत हे साम्याधिष्ठित अलंकार होत. या सर्वच अलंकारांतून 'प्रतिमा' उभी करण्याचे सामर्थ्य प्रकट होते. अलंकार विकसित होत गेला. त्याने मन व्यापले, संवेद्यतेची परिसीमा गाठली आणि प्रत्यक्ष पूर्णस्वरूप अनुभूती देण्याची किंवा घडविण्याची क्षमता प्रकट झाली की 'प्रतिमा' स्वरूपता येते. भक्त, भगवंत व्हावा अशीच ही संवेद्यतेची परिणती होय. दृष्टांतात मूळातच 'प्रतिमा' स्वरूप होण्याची क्षमता अधिक असते. श्री ज्ञानेश्वरांच्या संदर्भात 'उपमादृष्टांत' असा उल्लेख अनेकजण करतात. दांडेकर प्रतीतही तसा उल्लेख आहे याचे कारण असे की, श्री ज्ञानेश्वरांच्या स्फुरणाने सर्वच साम्याधिष्ठित अलंकार दृष्टांतांच्या स्वभावाने प्रकटतात आणि दृष्टांत प्रतिमेच्या क्षमतेने श्रोत्यांच्या मनांत संवेदित होतात. श्री ज्ञानेश्वरीतील प्रवचन/विवेचन हा एकूणच श्रोतृसंवाद असतो. या हृदयीचे त्या हृदयी घातले अशी अवस्था अनुभूत होईपर्यंत हे दृष्टांत स्फुरण तत्त्वप्रतिपादनाला अनुसरून सुरू असते. श्रोत्यांचा गौरव, श्रोत्यांना आवाहन, मराठी भाषा, मराठी बोली, वर्ण्यविषय, श्रीसद्गुरू गीतेतील श्रीकृष्णार्जुन संवादातील अलौकिकता, गीतेतील तत्त्वज्ञान या व अशा सर्व विषयांच्या संदर्भात श्री ज्ञानेश्वरांना श्रोतृसापेक्ष प्रवचन करावयाचे असते. त्यांचे प्रवचन त्यांचे श्रीगुरु श्री निवृत्तीनाथ यांच्या कृपाप्रसादाने आणि त्यांच्या समक्ष घडत आहे. श्री सच्चिदानंद बाबा त्या प्रवचनात स्फुरलेला शब्द नि शब्द लिहून घेत आहेत; मात्र श्री ज्ञानेश्वर प्रतिपाद्य विषय, श्रोत्यांची अनुकुलता आणि प्रतिसाद यांशी प्रतिभा आणि प्रज्ञेसह एकरूप होऊन रसक्रीडा करीत आहेत; नव्हे त्यांच्याकडून ती चिंतनसौंदर्यमग्नतेने घडत आहे. याची जाणीव श्रोत्यांना आणि श्री निवृत्तीनाथांनाही येते. त्यांच्या प्रतिमासृष्टीशी एकरूप होत श्रोता उत्कंठित आणि आतूर होऊन; अष्टभाव दाटून आलेल्या अवस्थेसह परतत्त्वानुभूतीसाठी उतावळा होतो. अर्जुनाच्या पंगतीला बसून रसास्वाद घेण्यास तरवरलेपणाने सरसावल्याचे श्री ज्ञानेश्वरांनाही जाणवते. श्रोत्यांच्या संसारात गुंतलेल्या मनावर आणि तत्त्वज्ञानासारख्या गंभीर विषयांवर आपल्या दृष्टांतस्फुरण घडविणाऱ्या प्रतिभाविलासह श्री ज्ञानेश्वर आपल्या दृष्टांत मालिकेने सौंदर्यभावनेसह आनंदमयतेने मात करतात. दृष्टांतातून दिव्य अनुभूती घडवितात.

**समारोप** : श्री ज्ञानेश्वरांच्या या दृष्टांत प्रतिमासृष्टीने श्रोता आणि वाचक दीपून जातो. काव्य हे सहज सौंदर्यस्फुरण असले तरी सौंदर्याच्या अनुभूतीच्या तीव्रतेमुळे; त्या सौंदर्य उद्घाटनाचा हेतु काव्यनिर्मितीमागे असतो. काव्य परतत्त्वाचा स्पर्श घडविणारे असावे, ह्या स्वाभाविक हेतुसह ते प्रकट होणेही तेव्हढेच स्वाभाविक होय. श्री ज्ञानेश्वरीतील ही उत्कट सौंदर्यानुभूती केवळ श्री ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेला स्फुरलेल्या प्रतिमासृष्टीमुळेच घडते. अर्थात प्रतिमास्वरूप दृष्टांत मालिकेमुळेच घडते. म्हणूनच प्रसंगी श्री ज्ञानेश्वरांच्या प्रतिभाजन्य चैतन्यस्फुरणास प्रसन्नतेने थोपवून श्री निवृत्तीनाथांनाही सांगावे लागते –

*''तंव श्रीगुरु म्हणती राहीं । ते तुज बोलावे नलगे कांही ।*
*आता ग्रंथा चित्त देई । झडकरी वेगां ।।''अ. १.८३।।*

* * *

# संतसाहित्य आणि पाखंडखंडन

भारतीय संतपरंपरेचा मागोवा घेतला तर; सर्व पंथोपपंथातील संतांनी आपापल्या तत्त्वज्ञानानुसार प्रबोधन करून; आस्तिकता जागवित, श्रद्धा जोपासत, भक्तिमार्गाने जाण्यास जनमानसाला प्रवृत्त केले. संतांनी आपल्या साहित्यातून अर्थातच आपापल्या शाब्दरचनांतून; उपास्य दैवतांची अर्थात परेश्वराची भक्ती करण्याच्या मिशाने अध्यात्मविषयक प्रबोध केला आहे. महाराष्ट्रातील संतांचा आढावा घेतला तर मराठी संत साहित्यनिर्मिती, पंथाश्रयाने अध्यात्मजागरण आणि प्रसार, प्रचार यात अग्रेसर असल्याचे दिसून येते. ''नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी'' हे त्यांचे ध्येय होते. लोकसारणीमध्ये, महाराष्ट्रातील पंथोपपंथांचा विचार केला तर; भागवत संप्रदाय अथवा वारकरी संप्रदाय या मार्गात अग्रेसर आहे असे म्हणता येईल.

१. संतपरंपरेमध्ये असा संत निवडूनही सापडत नाही; की ज्या संतांनी आपल्या साहित्यातून पाखंडखंडन केले नाही. सर्वच संतांनी पाखंडखंडन केले आहे. पाखंडखंडन केले म्हणजे नेमके काय केले? नास्तिकमत, थोतांड, थोतांडमत, केवळ बुद्धिप्रामाण्य, ठेंगमत (आग्रही खोटेपण), जडवाद, निरीश्वरवाद, वितंडवाद - अर्थात कपटीपणाने, खोटेपणाने, ढोंगीपणाने असत्याग्रहीपणे निरर्थक वाद घालणे; या व



अशा सर्व प्रकारच्या गोष्टींना आपल्या साहित्यातून सत्यान्वेषणासह प्रखर विरोध केला. आपण सर्व अभ्यासक, अनुयायी, संशोधक, उपासक, या प्रकारच्या पाखंडखंडनाची असंख्य प्रमाणे देऊ शकू. अनेकांची ती मुखोद्‌गतही आहेत. आधुनिक बुद्धिप्रामाण्यवादी, निरीश्वरवादी, नास्तिक, तथाकथित विज्ञानवादी एव्हढेच काय अभारतीय-परंपरानुयायी; संतसाहित्यातील या पाखंडखंडन दर्शक वचनांचा किंवा रचनांचा बेमालूम उपयोग करून; संतसाहित्यातील पाखंडखंडनविचार हा तथाकथित अभारतीय धर्मप्रभावातून आला आहे; असे बेमालूम सांगतात. याची उदाहरणे अवतीभोवतीच्या धर्मप्रसार प्रवचनातून पाहावयास मिळतात. संतांचा पाखंडखंडन विचार वैश्विक दृष्टीने; आस्तिक्यवादी, प्रेममूलक मानवतावादाला जागृत करणारा असल्याने कोणीही संतसाहित्यातील वचनांचा या दृष्टीने स्वीकार करून स्वमतास पुष्टी देणे स्वागतार्हच आहे, यात आक्षेपार्ह नाही. परंतु त्याचा सहेतूक स्वरूपात नास्तिकता, निरीश्वरता, प्रेमशून्य जडवाद जागविण्याकरिता उपयोग करणे हा संतमनाचा अपमान ठरेल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पाखंडखंडनात्मक उक्तींची पृथक स्वरूपात अथवा स्वतःच्या म्हणण्यास पुष्टी देणारी उदाहरणे उद्‌धृत करून अनावश्यक लेबले चिकटविणे, उदा- प्रतिगामी, पुरोगामी, धर्मनिरपेक्ष, विज्ञाननिष्ठ, साम्यवादी, उदारमतवादी इ. योग्य ठरणार नाही. अशा शब्दप्रयोगांना सामाजिक, राजकीय इ. वेगवेगळ्या अर्थछटा असतात. संतपदाला गेलेली ही व्यक्तिमत्त्वे अशा सर्व लेबलांच्या पलिकडे गेलेली व 'हंस' 'परमहंस' स्वरूपात आविष्कृत होत असतात. **म्हणूनच 'पाखंडखंडन' करण्यामागची मनोभूमिका कोणताही पूर्वग्रह न ठेवता तपासणे गरजेचे वाटते.**

२. संतांच्या साहित्यातून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे अध्यात्म अर्थात परमेश्वर; ही आहे. म्हणून साहित्याची भूमिका सांगताना

श्रीसंत ज्ञानेश्वर लिहितात–

*वाचे बरवे कवित्त्व । कवित्त्वी रसिकत्व ।*
*रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शू जैसा ।।*

परतत्त्व स्पर्श, संवेदना, जाण, ज्ञान हे संतांच्या साहित्याचे अंतिम लक्ष्य आहे. ते साधण्यासाठी संतांचे साहित्य साधन, माध्यम आणि साध्य स्वरूपात आविष्कृत होते; याकडे लक्ष वेधले पाहिजे. आविष्कृत होणे, नवविधा भक्तीच्या माध्यमातून आत्मनिष्ठ आणि लोकनिष्ठ अशा दोन्ही स्वरूपात असते. संतांचे साहित्य हे स्वमनाचे आणि समूहमनाचे बोधन करण्यासाठी समूहमनाला परतत्त्वानुभूती घडविण्यासाठी आविष्कृत होते हे लक्षात घ्यावयास हवे. म्हणूनच तो मनाने मनाशी आणि मनाने समूहमनाशी एकाचवेळी केलेला संवाद असतो. संतसाहित्याची ही भाववृत्ती 'माऊली' स्वरूपाची असते. ''बुडती हे जन न देखवे डोळा ।।'' संत, अशी जनमाऊली असते, लोकमाऊली असते. ती 'माऊली' 'करी लाभावीण प्रिती' या स्वाभाविक वर्तनवृत्तीने व्यवहारात प्रकटते. **संतांचे 'पाखंडखंडन' हे ज्ञानोत्तर भक्तिपूर्णवर्तनाची कळवळ्याने आविष्कृत होत राहिलेली, सत्यश्रद्धाभूत व्यवहार मिमांसा असते. ती संतनीती असते.**

पाखंडखंडन करताना संतस्वभावात काही जाणिवा गृहितकांसारख्या दृढमूल होत्या हे लक्षात ठेवूनच त्यांनी केलेल्या पाखंडखंडनाची संगती समजून घ्यायची असते –

**(i)** अध्यात्मविषयक अर्थात ईश्वरविषयक दृढ श्रद्धा किंवा अढळ श्रद्धा. अध्यात्म हेच अंतिम सत्य, भेदरहिततेची स्वच्छ, अढळविश्वासपूर्ण संवेदना (यालाच वेद आणि वेदान्त प्रामाण्य असे म्हणता येईल.) ही संतांची ठाम मनोभूमिका असते.

**(ii)** सत्यविषयक ज्ञान अर्थात अध्यात्मविषयक ज्ञान लोकजीवनात जागृत करणे, त्याकरिता जे जे म्हणून या ज्ञानापासून दूर नेणारे, भ्रमित करणारे, अज्ञानवश अहंकार जागविणारे, तात्कालिकतेला स्वार्थवासनामयतेने कवटाळणारे असे असेल ते सर्व पाखंड होय. ते नष्ट केले पाहिजे. त्यासाठी अज्ञानमूलक रूढीपरंपरांवर पाखंडखंडनात्मक आघात अपरिहार्य ठरतात.

**(iii)** ज्ञानमयतेतच खरा निःसीम आणि केवल आनंद आहे याची जाणीव घडविणे व त्या ज्ञानमयतेपर्यंत जाण्यासाठी जीवनातील सुखदुःख देणारी व्यवहारासक्ती नष्ट होण्यासाठी, पाखंडखंडन – प्रदर्शनात्मक कर्मकांडातील वय्यर्थतेवर आघात करून जीवनाकडे क्रीडा म्हणून पाहण्याची दृष्टी, लोकजीवनाला प्राप्त करून देण्याची धडपड संत करीत असतात.

**(iv)** जीवन क्रीडा स्वरूप करण्याचा एकमेव आनंदमय मार्ग म्हणजे निष्काम कर्मयोगाची दृढमूलता, ही धारणा त्यांना रुजवायची असते.

**(v)** ईश्वर, कृष्ण, सत्य, प्रभू, परमात्मन् सत्तेने पंचमहाभूतात्मक चक्रनेमीक्रमाने व्यवहाराची अपरिहार्यता लक्षात घेऊन सत्यापर्यंत पोचण्यासाठी भक्ती, ज्ञान, वैराग्य, परतत्त्वस्पर्श, स्वस्वरूपता साधनेचा प्रपंचातून परमार्थापर्यंत नेण्याचा मार्ग प्रबोधित करण्यासाठी पाखंडखंडन करणे आवश्यक.

या पंचसूत्रीसाठीचा परवल म्हणजे–

*विष्णूमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम । अमंगळ ।*
*कोणाही जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।।*

ही पाखंडखंडनामागची मनोभूमिका समजून घेणे आवश्यक आहे.

३. लोकजीवनात पाखंडपरंपरा नेहमी वासनाश्रयी स्वार्थपरतेतून निर्माण होतात. युगानुयुगे पाखंडपणाचा प्रवास सुरू आहे. स्थल काल परिस्थितीनुरूप पाखंडपणाच्या दृष्य प्रकारांमध्ये तपशीलात्मक बदल होतात. उदा. भ्रष्टाचार, अनाचार आणि दंभाचार यांना तथाकथित

नीतिमूल्यांचा मुखवटा चढवून बढीवार माजविणे. नवविधाभक्तिसाधनेच्या बाबतीत मठ, मंदिरे, संस्थाने यांची उभारणी आणि संचालन करण्याच्या संदर्भात ठायी ठायी परस्परांच्या पाखंडपणावर आरोप प्रत्यारोप होतच आहेत.

४. श्री संत ज्ञानेश्वरांनी 'अ-सम' दृष्टीवर केलेला प्रहार, सन्यास सोंग, आणणारे आणि तथाकथित ब्रह्मवेत्ते यांच्यावर केलेला प्रहार, संत नामदेवांनी संसारावर केलेला आघात, मुक्ताईने 'मायासासू' आणि 'वासना नादुली' यांवर केलेली टीका, जनाबाईनी 'जनी हित पंडित सांडित गेले । अहंतागुणे ब्रह्मराक्षस झाले' म्हणणे, चोखा, चोखोबाची महारी, निर्मळा, सोयरा, बंका, कान्होपात्रा यांनी विटाळ यातीहीनता, यांविषयी मांडलेला आकांत, गोरा, सेना, नरहरी, सावता, कर्मकांड, रूढी यांवर केलेला आघात आणि कर्मयोगावर दिलेला भर. व्यक्त केलेली यातीहीनतेची खंत-

५. संत एकनाथांनी तीर्थाटने, जत्रायात्रा, सोंगढोंग यांवर केलेले आघात, भेदाभेदावर ओढलेले कोरडे, रूढीग्रस्ततेवर केलेले प्रहार, देवदेवतांचा बाजार, हिंसा यांचा केलेले निरोध, भारुडे, रूपके यांच्या सहाय्याने केलेले पाखंडखंडन प्रसिद्ध आहे. कबीर, शेखमहंमद इ. आणि सुफीसंतांनी वर्णाश्रम, जातीभेद यांवर केलेले आघात आणि आरत्या, प्रार्थना इ.चा डांगोरा यांवर केलेला प्रहार, नवससायास, खेट्या यांवर जादूटोणे, मंत्रयंत्र यांची स्पष्ट केलेली व्यर्थता, रामदासांचा मनबोध, मुर्खलक्षणे यांतून घडलेले पाखंडखंडन.

६. संतपरंपरेच्या साहित्याचा कळस ठरलेले श्री संत तुकाराम, यांनी तर समग्र व्यवहारी जीवनातील अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचारावर



'सत्यासत्याशी मन केले ग्वाही । जुमानिले नाही लोकमता ।।' असे म्हणून आसूड ओढले आहेत. यातीहीनता आणि जातीभेद, व्यसनाधीनता, सोंगढोंग, कर्मठब्राह्मण्यग्रस्तता, देवदेवता, भूतेखेते, नवससायास, व्यापारउदीम, नातेगोते यांतील भ्रामकता, जादुटोणे, गंडेदोरे, खेट्या, अंगात येणे, मांत्रिक, तथाकथित मंत्र देणारा गुरू, सासुरवास इ. जीवनाच्या सर्व अंगावर परखडपणे पाखंडखंडन केले आहे.

७. श्री संत तुकारामोत्तर काळातील निळोबाराय, बहिणाबाई इ.नी देखील पाखंडखंडन केले आहे. अलिकडच्या काळात सांतामाई, श्री संत गुलाबराव महाराज, गाडगे महाराज आणि ठळकपणे श्री संत तुकडोजी महाराज बदललेल्या परिस्थितीत पाखंडखंडनात अग्रेसर दिसतात. विवाहादी प्रथेतील अनाचार, जत्रायात्रा, व्यसनाधीनता, मंत्रतंत्रजादुटोणे, वारी आणि खेट्या, भक्तीचे प्रदर्शन, दारिद्र्य, अज्ञान, दास्य, लाचारी, गुलामगिरी या मानसिकतेवर त्यांनी थेट प्रहार केले आहेत.

**समारोप** : एकूण संतपरंपरेचे पाखंडखंडन पाहता मानवी जीवनातील आसक्ती, वासनाधिनता, व्यसनाधिनता, नवविधाभक्तीतील आणि कुलधर्मकुलाचारातील पुरोहितांचा वापर आणि सवंगता, नवससायास, मंत्रतंत्रयंत्र तोडगे इ. विधीविधाने, स्वार्थपर ढोंगीपणा, दांभिकता आदि सर्व गोष्टींवर एव्हढेच नव्हे तर माणसामाणसांचे संबंध, साधनशुचिता, धर्मव्यवहार, अर्थव्यवहार, राजव्यवहार, न्याय व्यवस्था या सर्व अंगामधील भ्रष्टता, सवंगता, दांभिकता, अज्ञानमूलकता, अदूरदर्शीपणा आणि जातीव्यवस्था यावर, रूढी, परंपरा, समजुती इ. परखडपणे पाखंडखंडनात्मक लेखन केले आहे. मात्र हे करताना संतांना अश्रद्धता, धर्मनिरोधता, अनिर्बंधता, बुद्धिप्रामाण्यवादाचा अतिरेक, केवळ आर्थिक व सामाजिक मानवी समता प्रस्थापित करावयाची नव्हती तर

परमेश्वरविषयक निःसीम श्रद्धा, सत्यनिष्ठा, सर्वाभूती 'सम'मानोवृत्ती, निष्काम कर्मनिष्ठा, देव, मठ, मंदिरे, गुरुत्व, ज्ञान या विषयी पूज्यभाव नवविधाभक्तीतील श्रद्धापूर्ण शुचिता अभिप्रेत होती. स्वतःबरोबर सर्वांना उन्मनी करण्यासाठी आपला जन्म आहे या भावनेने त्यांचे पाखंडखंडन हे ज्ञानोत्तर भक्ती होते. या निश्चित भूमिकेतून संतसाहित्यातील पाखंडखंडन विचारात घेतले पाहिजे.

* * *



# मनावरी स्वार व्हावे ।
# अवघे आत्मस्वरूप व्हावे ।।

ब्रह्मविद्येचे अर्थात योगमार्गाचे 'लक्ष्य'; 'सोहं', 'तत्त्वमसि' 'अहंब्रह्मास्मि', 'सच्चिदानंदस्वरूप', 'ब्रह्मस्वरूप', 'कैवल्यस्वरूप' अर्थात 'अद्वैत' पावणे हे होय! ब्रह्मविद्येची साधना यासाठीच करावयाची. ही साधना करण्याचे साधन मात्र परब्रह्मातून आविष्कृत झालेला, प्रकृतिमत्तास्वरूप स्थूल देह हे होय. या देहाचा स्वभावच मुळी प्राकृतिक. म्हणूनच देहाला, वासनादेह असे म्हणतात. या देहवृत्तीची जाणीव मात्र आत्मतत्त्वाच्या योगाने प्राप्त चैतन्य तत्त्वामुळे घडते. या चैतन्य तत्त्वाची जाणीव, अर्थात जिवंतपणाची जाणीव करून देणारे, अमूर्त असे साधन, म्हणजे 'मन' होय. आत्मा, परमात्मा, जीवात्मा असे भेद चर्चिले जातात, तेही मनाच्याच सहाय्याने होय. अध्यात्म शास्त्रात जे प्रश्न उपस्थित झाले त्या सर्वांचे मूळ कारण ही मनोसंवेदना होय. म्हणूनच सर्व तत्त्ववेत्त्यांनी 'मन' या संकल्पनेची चर्चा केली आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील पुरुषोत्तम योगामध्ये मनाचा उल्लेख 'षष्ठानि इंद्रियाणी' असा केला आहे. याचाच अर्थ मनाला केवळ इंद्रियाचे स्थान दिले आहे आणि जिवंतपणाचे मूल कारण आत्मतत्त्व हेच सांगितले आहे. म्हणजेच अन्य इंद्रियांप्रमाणे मनालाही साधन आणि फार म्हणजे माध्यम एव्हढेच स्थान दिले आहे.

*ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।*
*मनःषष्ठानिन्दियाणी प्रकृतिस्थानि कर्षति ।।७।।*

अर्थात– संसारामध्ये कर्ता–भोक्ता म्हणून ख्यातकीर्त असलेला, जो कोणी आहे तो परमात्म्याचाच अंश आहे. तो माझा जीवरूप अंश आपल्या कर्मादि प्रकृतीमध्ये या देहरूपी क्षेत्रांत असलेली सहा इंद्रिये त्यांना आकर्षण करतो. प्रत्येक जीव माझा अंश आहे. हाच इंद्रियांचे–प्राणाचे रक्षण करतो. परंतु या 'मन' नावाच्या इंद्रियाचा मोठेपणा एवढा की 'मन' या अस्तित्वावरून 'मानव' हे अस्तित्व संबोधित होते. म्हणूनच 'मन' आणि आत्मन् यांची अवस्था कार्य आणि मानवी जीवाच्या दृष्टीने श्रेय यांचा विचार सर्वच ऋषी, मुनी, तपस्वी, साधू, सिद्ध, संत, विचारवंत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवि, कलावंत अशा सर्व साधकांनी केला आहे.

१. श्री संत ज्ञानेश्वरांनी पुरुषोत्तम योगांतील उपरोक्त श्लोकावर भाष्य करतांना मोठ्या रंजकतेने मनाची कामगिरी विशद केली आहे. श्री ज्ञानेश्वर लिहितात

*तैसे अनादिपण न मोडे । माझे अक्रियत्व न खंडे ।*
*परी कर्ता भोक्ता ऐसें आवडे । ने जाण गा भ्रांती ।।*
(३५० अ. १५)
*किंबहुना आत्मा चोखटु । होऊनि प्रकृतीसी एकवटु ।*
*बांधे प्रकृतिधर्माचा पाटु । आपणपया ।।५१।।*
*पै मनादि साही इंद्रियें । श्रोत्रादि प्रकृतिकार्यें ।*
*तिथें माझीं म्हणौनि होये । व्यापारारुढ ।।५२।।*
*जैसे स्वप्नीं परिव्राजें । आपणपयां आपण कुटुंब होईजे ।*
*मग तयाचेनि धांविजे । मोहें सैरा ।।५३।।*
*तैसा आपलिया विस्मृती । आत्मा आपणचि प्रकृती– ।*



*सारिखा गमोनि पुढती । तियेसीचि भजे ।।५४।।*
*मनाचां रथीं वळघें । श्रवणाचिया द्वारें निघे ।*
*मग शब्दाचिया रिघे । रानामाजी ।।५५।।*
*तोचि प्रकृतीचा वागेरा । करी त्वचेचिया मोहरा ।*
*आणि स्पर्शाचिया धोरा । वनाजाय ।।५६।।*
*कोणे एके अवसरी । रिघोनि नेत्राचां द्वारीं ।*
*मग रुपाचां डोंगरीं । सैरा हिंडे ।।५७।।*
*कां रसनेचिया वाटा । निघोनिया गा सुभटा ।*
*रसाचा दरकुटा । भरोंचि लागे ।।५८।।*
*नातरी येणेचि घ्राणें । देहेशु करी निघणें ।*
*मग गंधाचीं दारुणें । आडवें लंघी ।।५९।।*
*ऐसेनि देहेंद्रियनायके । धरूनि मन जवळिकें ।*
*भोगिजती शब्दादिकें । विषय भरणे ।।३६०।।*

या चर्चेमध्ये श्री ज्ञानेश्वरांनी महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. त्यासाठी संन्याशाचे चपखल उदाहरण दिले आहे – एखाद्या संन्याशाने स्वप्नातच आपणच आपल्याकरिता बायको–मुले व्हावे आणि त्यांच्या पालनपोषणाच्या मोहाने इकडेतिकडे धावावे; त्याप्रमाणे जीवात्मा मनाच्या रथात बसतो, कानाद्वारे बाहेर जातो आणि मग शब्दाच्या रानात प्रवेश करतो. कारण हा जीवात्मा स्वतःच्या ब्रह्मस्वरूपाच्या विस्मरणाने आपणच मनाच्या आधीन होऊन प्रकृतिरूप आहोत, असे मानून पुनः त्याच शरीरादि प्रकृतीची विषयसंपादन द्वारा, सेवा करतो. एकूण आपले आत्मस्वरूप विसरून विषयसमुदायाचा उपभोग मनाच्या सहाय्याने घेतला जात असतो. तो आपणच घेत आहोत असे वाटून, रंगून जातो. अर्थात मनाच्या आधीन होऊन; खरे स्वरूप जे 'आत्मा' त्या मूळ स्वसंवेद्य रूपालाच पारखा होतो.

२. श्री संत ज्ञानेश्वरांनी मनाच्या आधीन होऊन विषयोपभोगातच रमलेल्या आत्मतत्त्वाला समाधीयोगाच्या निमित्ताने प्रबोधित केले आहे. आत्मसंयमयोग विवरीत करतांना – भगवद्गीतेतील –

*उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत ।*
*आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मेव रिपुरात्मना ।*

(श्लोक ५ अ. ६)

या श्लोकात आत्म्याच्या मदतीनेच आत्म्याचा उद्धार करावा, त्याला अधोगतीला जाऊ देऊ नये; तसे केल्याने आपणच आपले शत्रू किंवा आपणच आपले मित्र असे होईल. म्हणून

*बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मनाजितः ।*
*अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ।।६।।*

आपले मन जिंकले आहे त्याचा परमात्मा आत्मभावाने त्याच्याजवळच राहतो आणि तो इंद्रियाद्वारा अर्थात स्थुल देहाद्वारा भोगण्यातील, सुखदुःखापासून स्थितप्रज्ञतेने राहू शकतो.

या श्लोकांवर प्रवचन करतांना श्री ज्ञानेश्वरांनी मोठ्या सूचक अशा विवेचनातून मानवी अस्तित्वाचे शाश्वततत्त्व नेमके कशात आहे ते सांगितले. शरीर भ्रामक असून; तात्कालिक असून; आत्मा शाश्वत आहे. जीवातील आत्मतत्त्व हे त्या जीवाचे सत्य शाश्वत असे आत्मस्वरूप असे मूल्य आहे. अर्थात तेच जीवाचे साक्षात 'लक्ष्य' होय. कारण हे शाश्वत स्वरूपच दुःखदायक, तात्कालिक, क्षणभंगूर, फसव्या संसार पाशांचा नाश करून; शाश्वत आनंद प्रदान करू शकते. समाधीयोगाचेही अंतिम लक्ष्य तेच आहे. माणसाला सनातनपणे पडलेल्या स्वअस्तित्वाच्या प्रश्नाचे सच्चिदानंदस्वरूपता अर्थात आत्मस्वरूपता हेच खरे उत्तर आहे. प्रपंचात अडकलेला माणूस आत्मतत्त्वाच्या विस्मृतीमुळे स्थुलवासनादेहाच्या प्रकृतीतील, भोगकारकतेत मग्न होतो. तो विस्मृत आत्मस्वरूपामुळे मनाने शारीर अनुभूती भोगतांना प्रत्यही दुःखी होतो.



म्हणून आत्मसंयमनयोग आवश्यक होय. – समाधीस्थानी –

*तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।*
*उपविश्यासने युञ्ज्याद्भोगमात्मविशुद्धये ।।१२।।*

अर्थात आसनावर बसून चित्त व इंद्रिये जिंकून, मन एकाग्र करून; अंतःकरणाच्या शुद्धीसाठीचा म्हणजे 'आत्मस्वरूप' स्मरण करण्याचा योगाभ्यास करावा.

समाधीयोगामध्ये मनाच्या संयमावर भर दिला आहे. मनाचा संयम म्हणजे मनाचे इंद्रियांच्या आधीन होण्याच्या प्रक्रियेला पूर्ण थांबवून आत्मन्च्या शासनात बद्ध करणे होय. म्हणजेच मनावर आत्म्याचे शासन हवे किंवा मन आत्म्याच्या स्वभावानुसार वागेल अशी नियमितता साधावी. देहदुर्ग किंवा देह राजवाडा आत्मसंयमनाने जिंकून आत्मस्वरूपाचा आनंद लुटावा म्हणजेच 'सर्वत्र समं पश्यति' योग साधावा. आणि परम सुख प्राप्त करून घ्यावे म्हणजे स्व चे खरेखुरे शाश्वत अस्तित्व भोगावे.

खरेतर याच शाश्वत आनंदानुभूतीसाठीच भक्तियोगसाधना करावयाची. केवळ भक्तियोगाने परमात्मज्ञान प्राप्त होऊन वैराग्य साधता येईल. अखेर भगवंत म्हणतात –

*योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।*
*श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्त तमो मतः ।।४७।।*

अर्थात, भगवंत म्हणतात, माझ्या ठिकाणी अंतःकरण जडवून जो श्रद्धायुक्त होऊन; माझे भजन करतो तो सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ होय. श्री ज्ञानेश्वर यावर प्रवचन करतात की परमभक्तियुक्त होऊन अनन्यपणे आत्मतत्त्वावर मन एकाग्र करावे. जीवात्म्याने मनाला आत्मसंयम योगाने स्वाधीन करून परब्रह्मसुख भोगावे. परमात्मतत्त्वाला प्रिय व्हावे.

३. श्री संत एकनाथ महाराजांनी भगवद्भक्तीची अर्थात भक्तियोगाची चर्चा करतांना भागवद ग्रंथातही; सिद्ध साधू होतांना आत्मसंयमन योगाची

आवश्यकता वर्णन केली. परमात्मसुखापर्यंत जाण्यात देहभावना अर्थात स्थूल देह, प्रकृतीभोगात अडकल्याने व आत्मविस्मृती होऊन; मन देहाच्या ठिकाणी गुंग झाल्यामुळे; माणूस आत्मसुखाला पारखा होतो; असे म्हणून मनोनिग्रहालाच महत्त्व दिले आहे. श्री संत एकनाथांनी लिहिलेल्या अध्यात्मिक प्रकरणांत; अर्थात चिरंजीवपद, आनंदलहरी आणि स्वात्मसुख या प्रकरणांमध्ये मानवाचे खरे अस्तित्व म्हणजे त्याचे आत्मतत्त्व होय, हेच प्रतिपादिले आहे. एव्हढेच नव्हे तर; विश्वातील चराचराचे खरे अस्तित्व आत्मतत्त्वच होय हे स्पष्ट केले आहे. हे लक्षात घेऊन ते आत्मतत्त्वस्वरूप अनुभवण्याचे 'लक्ष्य' किमान माणसाने ठेवले पाहिजे. त्यासाठी योगसाधना करणे आवश्यक आहे. 'स्वात्मसुख' प्रकरणात त्यांनी याची विशेष चर्चा केली आहे. आत्म्याच्या साक्षात्काराने होणारे सुख म्हणजे स्वात्मसुख होय. ते म्हणतात– 'जे आपुली स्वरूपस्थिती । ते वानावी अभिनव कीर्ती ।। आपली स्वरूपस्थिती अर्थात आपले खरे अस्तित्व हे देह नाही तर जीवात्मा हे आपले खरे अस्तित्व होय. जीवात्मा हा परमात्माच आहे. मात्र जीवाच्या ठिकाणी तो अंशात्मकतेने चैतन्यप्रेरित करतो आणि मनाच्या सहाय्याने शरीराच्या सहकार्याने तो प्रकृतीचा अनुभव घेतो, असे त्यास भासमान होते. मात्र प्रकृतीही त्याच्यातूनच निर्माण झालेली असते. म्हणजेच आत्मस्वरूपाला, शारीरअनुभवांच्या प्रक्रियेत स्वविस्मृती होते आणि मन व शरीर; त्यातही स्थूल शरीर हेच अस्तित्व वाटू लागते. भ्रामकतेत, विस्मृत अवस्थेत गेलेल्याला, आत्मतत्त्वाला आत्मसंयमनाने जागृत करून त्याचे निर्गुण निराकारत्व भोगणे म्हणजे स्वात्मसुख होय. तेच परब्रह्मस्वरूप भोगणे होय. जीवनाचे अंतिम आनंदमय परमलक्ष्य हे शाश्वत सुख भोगणे होय. भक्तियोग वा अन्य योग मार्ग हे ह्याच ध्येयाप्रत नेणारे होत. परंतु सांसारिकांना भक्तियोग हा सहज योग मार्ग होय.

आत्म्याचे स्वरूप स्पष्ट करतांना सत्, चित् व आनंद ही त्याची



तीन लक्षणे होत असे ते म्हणतात. मात्र ती तीन स्वतंत्र लक्षणे नसून ती त्रिविध किंवा अभिन्न आहेत –

*मृदु तिख आणि पिवळी । ती नांवे एक चापेकळी ।*
*तेवी सच्चिदानंद बोली । वस्तु एकली एकत्वे ।।*

अर्थात आत्मतत्त्वाचे अस्तित्वच अद्वैतरूप होय. स्थूलदेहाला विश्व विस्ताराने, भिन्नत्वाने भासमान होते परंतु तत्त्वतः सारे विश्व एक आत्मरूपच आहे असे 'स्व'चे सर्वात्मक आणि सर्वात्मकाचे 'स्व' स्वरूप; हेच शाश्वत, निरामय, निखळ आनंदमय अर्थात ज्ञानमय होय. तद्रूप होण्यासाठी भेद, भिन्नता आणि विस्तार तपशील यांच्या ऐंद्रिय अनुभूतीतून निसटून; आत्मसंयमनाने अर्थात मनाला आत्मतत्त्वाच्या आधीन करून; स्वात्मसुख प्राप्त करावयाचे. हेच ज्ञानमय होणे. असे ज्ञान प्राप्त करण्यासाठी आत्मतत्त्वाची, सगुण वा निर्गुण तत्त्वातील अनन्य भक्ति होय. नारदीय भक्तिपरंपरेत, सगुण, नवविधा भक्तियोगानेही हे साधता येते. परंतु त्यासाठी मनावर स्वार होऊन; प्रकृतीदुर्गावर विजय प्राप्त करावा लागतो, ऐंद्रिय शक्तींना साधनेने स्वाधीन करून देह दुर्ग जिंकून, मनाच्या एकाग्रतेने 'स्वात्मसुखा'पर्यंत जायचे असते. एकनाथ महाराज महत्त्वाचा विचार सांगतात तो देहाभिमान समूळ नष्ट करून आत्मसुख भोगणे म्हणजे समाधी हा होय. भक्तियोगात देखील हीच अवस्था आवश्यक आहे. त्यासाठी सद्गुरू सेवा हे साधन जोडावे लागते आणि सद्गुरू–शिष्याचेही अद्वैत व्हावे लागते. नाथ महाराज म्हणतात –

*निरुपण कायें चालवावे । प्रमेय कैसें आकळावें ।*
*हे काहीं सर्वथा जीवें । म्यां विवरिलें नाही ।।*
*माझें मनी रिघाला जनार्दन । माझी जिव्हां ते जाला आपण ।*
*माझा हात धरूनिया जाण । ग्रंथलेखन तो करवी ।।*

'स्वात्मसुखातील' या ओव्यांमधून सद्गुरू–शिष्य जसे प्रकटले आहेत तेव्हढी मनाचे ठिकाणी आत्मतत्त्वाची स्थिती घडली पाहिजे; मन

आत्मतत्त्वाशी अनन्य व्हावयास हवे. तरच –

*ना तरी रतीच्या अंती । जे होय सुखप्राप्ती ।*
*ते सर्वदा सर्वांगे भोगती । सांडुनी रतिसंबंधु ।।*

किंवा

*तेथ देवाचें देवपण सरे । भक्ताचें भक्तपण विरे ।*
*तऱ्ही भजन उरे निर्विशेषी ।।*

ही स्वात्मसुखानुभूती होय. अशारीर अवस्था मनाच्या ठिकाणी निर्माण व्हावी. एव्हढी मनाची एकाग्रता अथवा आत्मरती साधली पाहिजे. 'भागवत', 'रामायण' या ग्रंथांमध्येही चर्चा करतांना हीच चर्चा सूचकतेने केली आहे. एकनाथ महाराजांनी 'आनंदलहरी'मध्ये मन आणि आत्मतत्त्व यांचे 'अद्वैत' अनुभूती वर्णन केले आहे –

*मन असतां आनंदाभीतरी । तेथें उठति सुखाचिया लहरी ।*
*म्हणोनि वदली वैखरी । प्रेमानंदलहरी म्हणिजे इयेते ।।*

अर्थातच नारदीय भक्तिसूत्रातील भक्तीच्या व्याख्येप्रमाणे –

'स्वात्मऽस्मिन् परमप्रेमरूपा' हे सूत्र येथे एकनाथांनी सहजच चर्चेत गोवले आहे. मनाची आत्मतत्त्वाशी अनन्य अवस्था म्हणजे प्रेममयता. प्रेमाची परमावधी म्हणजे निखळ आनंदमयता म्हणूनच एकनाथ 'प्रेमानंद लहरी' असा उल्लेख करतात.

४. शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांनी 'शेख महंमद अविंद त्याचे हृदयी गोविंद' म्हणून 'परमप्रेमरूपा' भक्तीचा योग उल्लेखित केला आहे. त्याचप्रमाणे 'योगसंग्राम' या ग्रंथात समाधीयोगाने 'परमात्मस्वरूपता', 'अद्वैत' साधण्यासाठी स्थूलाचा गड सर करावा लागतो असे म्हणून 'संग्रामाचे' रूपक योजले आहे. त्यात 'मन' या सहाव्या इंद्रियाचा अतिशय चपखल उल्लेख 'तेजिया' अर्थात 'घोडा' असा करून मनाची चंचलता आणि स्थूल देहाशी अधिनता उल्लेखित करून 'योगसंग्राम' करतांना 'आत्म'तत्त्वाला या मनाच्या वारूवर स्वार व्हावे लागते. आत्मा



तेजियावर स्वार होऊन; ऋद्धिसिद्धी, स्वाधिष्ठानचक्र, त्रिकूट व श्रीहरी, गोल्हाट व औटपीठ, अर्धमातृका, ब्रह्मरंध्रापर्यंत चढाई व अखेर समाधी. अर्थात अद्वैतानुभूतीपर्यंत आत्मा यशस्वी कसा होऊ शकतो; हे कथन केले आहे. हा समाधीयोग भक्तियोगानेही साधता येतो हे स्पष्ट केले आहे. श्री संत ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायप्रणित योगसाधना आणि भक्तियोगसाधना यांची सांगड घालून भक्तीची परमावधी मनाच्या अद्वैत साधनेत कशी घडते हे 'दर्पणी पाहता रूप न दिसे हो आपुले । बाप रखुमादेवीवरे मज ऐसे केले' असे उल्लेखून स्पष्ट केले आहे. मात्र मनाचा साधन म्हणून आणि भक्तियोग आणि ब्रह्मविद्येच्या दृष्टीने योजकतापूर्वक रूपकात्मक उल्लेख शेख महंमदबाबांनी 'योगसंग्राम'मध्ये केलेला आहे. त्यांच्या या उल्लेखाने योगविज्ञानातील मनाचे नेमके स्थान; जे योगीजनांना अभिप्रेत आहे; ते थेट स्पष्ट झाले. नवविधा भक्तियोगात तर सर्व प्रकारच्या आसक्तींची अनन्यता परमात्मतत्त्वाशी जोडून स्थूलापासून मनाला आवरून आत्मतत्त्वाचे साधन स्वरूपात मनाला कसे वापरायचे या संयम सामधनेचे विवरण केले आहे. नारदीय भक्तिसूत्रात परमेश्वराविषयी गुणमहात्म्यासक्ति, रूपासक्ति, पूजासक्ति, स्मरणासक्ति, दासासक्ति, सख्यासक्ति, कांतासक्ति, वात्सल्यासक्ति, आत्मनिवेदनासक्ति, तन्मयासक्ति, परमविरहासक्ति असे भक्तीचे आसक्ति प्रकार दिले आहेत.

५. स्वामी समर्थ रामदास यांनी –

*भक्तिचेनि योगे देव । निश्चये पावती मानव ।*
*ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथी म्हणून ।।*

भक्तियोगाने देवस्वरूप होता येते असे स्पष्ट करतांनाच; मनाला स्पष्टपणे बोध केला आहे.

*'मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।*
*तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।।'*

असे सूत्रबद्धतेने सांगितले. 'मनाचे श्लोक' हे लेखन म्हणजे मन आणि व्यवहार, मन आणि योगसाधना आणि मन व एकूण प्रपंचविवेक यामध्ये मन हे चैतन्यमय साधन होय असे स्पष्ट करून; मनःशक्तीचा वापर करून; विवेकाने मन हरिचरणलक्ष्यी लावण्याचा प्रबोध केला आहे. पूर्व जन्मात आणि वर्तमान जन्मातील सर्व कर्मांची जबाबदारी मनावर टाकून त्या मनाला आत्मसंयमन योगाचा प्रबोध केला आहे. ते म्हणतात– 'मना त्वांचि रे पूर्वसंचित केले । तयासारखे भोगणे प्राप्त झाले ।' असे स्पष्ट बजावून मनावर आपल्या आत्मतत्त्वाचे शासन असणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे सूचित केले आहे.

मन नेहमीच देहमार्गाने वासनाभोगात रमते आणि जीवात्मा आत्मतत्त्वाविषयी अज्ञानी घडविण्यात सहभागी होते. आत्मतत्त्वाला देहाची भावना आपणच भोगतो आहोत असा आभास निर्माण होतो. म्हणूनच रामदास थेट प्रबोध करतात. मनामध्ये ज्या शक्ति असतात त्यात 'विवेक' शक्तीच मनाला स्थूलदेहाच्या वासनानुनयापासून वाचवू शकेल; हे लक्षात घेऊन संपूर्ण मनाचे श्लोक त्यांनी मांडले आहेतच. तथापि दासबोधाचे स्वरूप पाहिले तर सर्व कल्याण साधण्यासाठी मानवी मनालाच रामदासांनी केलेला तो प्रबोध आहे हे सहज लक्षात येते. दासबोधातील विषय पाहिले की प्रत्येक दशकात मनाला केलेला प्रबोध आवर्जून पाहावयास मिळतो. पातंजल योगविज्ञान हे जसे खरेतर मानसशास्त्र आहे; तसे 'दासबोध' हे खरेतर लौकिक आणि पारलौकिक जीवनाविषयीचे मानसशास्त्र आहे असे लक्षात येईल. नरदेहस्तवन निरुपणातून नरदेहाचे महत्त्व सांगतांना आत्मसंयमन योग साधनेसह, भक्तियुक्ततेने नरदेहाचा विनियोग रामरूप होण्यासाठी करणे अभिप्रेत असल्याचे लक्षात येते. मूर्खलक्षण दशक तर पूर्ण मनोबोधच आहे. प्रत्येक दशकातील विषय वेगवेगळे वाटले तरी ते मन केंद्रित प्रबोध करून; स्वस्वरूप लक्ष्य गाठण्यासाठी आहेत हे लक्षात येते. विवेक



आणि वैराग्य विषय मांडणारे बारावे दशकही थेट मनाला उन्नयित करण्यासाठीच आहे. आत्मदशक आणि पुढील बहुजिनसी, शिकवण आणि पूर्णविचार ही दशकेही बोध करून मनावर स्वार होऊन भक्तिपंथे जाण्याचा योग साधावयास सांगणारीच आहेत.

६. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज योगी यांनी तर सर्व यश संपादनाचे मूळ साधन (कारण) मानवी मन हेच आहे असे स्पष्टपणे म्हटले आहे.

*मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचे कारण ।*
*मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।धृ।।*
*मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ।*
*मनें इच्छा पुरविली । मन माऊली सकळांची ।।२।।*
*मन गुरू मन शिष्य । करी आपुलेंचि दास्य ।*
*प्रसन्न आपआपणांस । गति अथवा अधोगति ।।३।।*
*साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।*
*नाही नाहीं आन दैवत । तुका म्हणे दुसरे ।।४।।*

तुकारामांनी मनाला दैवताचे स्थान दिले आहे. सर्व ज्ञानाची संगती मनःपूत आहे याकडे श्री तुकारामांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. म्हणूनच मनाला प्रसन्न करण्याचा आदेश त्यांनी दिला आहे. योगशास्त्रातील अत्यंत कळीची गोष्ट तुकारामांनी सहजवचनातून सांगितली आहे.

मन प्रसन्न करायचे म्हणजेच मन आत्मलीन करायचे होय. कारण मोक्ष आणि बंधन या दोन्ही गोष्टी मनाने साध्य होणार आहेत. बंधनात दुःख आहे हे तुकारामांनी परोपरीने सतत आकांताने सांगितले आहे. आनंदस्वरूप व्हायचे असेल तर मन आत्म्याच्या आधिन केले पाहिजे हे उघड आहे. आत्मतत्त्वाशी मनाचे प्रेमपूर्ण स्वरूप निर्माण झाले की तोच मोक्ष होय. तुकारामांनी मनात परमात्मस्वरूपसुखसोहळ्याचा निश्चय केला

आणि तुकारामांनी 'आनंदाचे डोही आनंद तरंगा'चा अनुभव घेतला. म्हणूनच तुकाराम आपल्या कीर्तनातून 'मन करा रे प्रसन्न' असा प्रबोधक संदेश देतात. तुकारामांना हा उपदेश करण्याची आवश्यकता वाटते याचे कारणही उघड आहे. ते म्हणतात –

*मन माझें चपळ न राहे निश्चळ ।*
*गडी एक पळ स्थिर नाहीं ।।१।।*
*आता तू उदास नव्हे नारायणा ।*
*धावे मज दीना गांजियेलें ।।२।।*
*धांव घालीं पुढे इंद्रियाचे ओढी ।*
*केले तडातोडी चित्त माझें ।।३।।*
*तुका म्हणे माझा नचले सायास ।*
*राहिलों हें आस धरूनि तुझी ।।४।।*

ज्या संग्रामाचा उल्लेख शेख महंमदांनी केला तोच संग्राम मनाच्या या वासनादेहस्वाधीनतेमुळे घडतो आहे. म्हणून नारायणालाच अर्थात आत्म्यालाच वासनाधीन मनाला आकळण्याची विनवणी तुकाराम करतात. प्रयत्न करूनही मन आकळता येत नाही म्हणून नवविधा भक्तीचे साधन संतांनी स्वीकारीले. सगुण भक्तीने इंद्रियांना आणि मनाला चित्त स्थिर करण्याचा अभ्यास घडेल. हेच नारायणाला आवाहन करणे असते.

मनाचा अनुभव मात्र विचित्र आहे –

*नित्य या मनासी करितों विचार ।*
*तों हें अनावर विषयलोभी ।।१।।*
*आतां मज राखें आपुलिया बळें ।*
*न देखें हें जावें उगवतां ।।२।।*
*सांपडला गळीं नाहीं त्याची सत्ता ।*
*उगळी मागुती घेतला तो ।।३।।*
*तुका म्हणे मी तों अज्ञानचि आहें ।*
*परि तुझी पाहें वास देवा ।।४।।*




श्री तुकाराम महाराजांनी येथे निस्सीम अनन्यभक्तीचे महत्त्व स्पष्ट केले आहे. 'सच्चिदानंदपदी' ब्रह्मस्वरूप व्हायचे असेल तर भक्तीचा अभ्यास हेच आपल्या हाती आहे. भक्तीच्या अभ्यासानेच मन आत्मरूप होऊन ज्ञान घडू शकेल. असे मन प्रसन्न झाले की स्थूल देहाच्या ऐहिक जीवनातील सर्व वांच्छा मावळून दुःखद वाटणारे जीवन निरासतेमुळे जीवन क्रीडा वाटू लागेल आणि शूद्रपण झडून आकाशपण प्राप्त होईल. अवघे विश्वच आनंदमय होईल. म्हणूनच मनावर स्वार होण्याचा 'परमात्मलक्ष्यी' अभ्यास करावा आणि 'ब्रह्मसुख'स्वरूप व्हावे.

**समारोप** : अध्यात्म असो की लौकिक व्यवहार असो; लौकिक आणि पारलौकिक जीवनातील यशस्वीता मनाच्या आत्मतत्त्व निष्ठेवर अवलंबून आहे. आत्मनिष्ठता भक्तियोगाने साधता येईल. भक्ति अभ्यासातून शक्य आहे. सर्व प्रकारच्या आसक्ती परमेश्वराशी जोडण्यासाठी नवविधा भक्तीचा मार्ग श्रेयस्कर होय. अभ्यासाने मन योगाधीन होण्याची शक्यता आहे हेच सर्व धुरिणांनी जाणले म्हणूनच नारद, व्यास, योगेश्वरकृष्ण, नवनारायण आणि त्यांच्या मार्गे भागवतांनी विशेषतः हा नवविधा भक्तीचा मार्ग स्वीकारला आणि मनावर स्वार होण्यासाठी अभ्यास सुरू केला. भक्तियोगाचा हा परवल आहे त्याचे केंद्रिभूत सूत्र आहे 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ । कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।' या सेवाभक्तीने मनाला विवेकानुकुल करायचे यातूनच भक्ति, ज्ञान, वैराग्यपूर्णता; हा मार्ग अवलंबून अवघे आत्मरूप होता येईल.

* * *

# मलपृष्ठावरील मजकूर



भक्तिसाहित्याचे आणि भक्तिवाङ्मय प्रयोगांचे लहानपणापासूनच आकर्षण होते.

'ज्ञानेश्वरीतील साहित्यविचार' ह्या दास्ताने रामचंद्र आणि कं. यांनी १९९१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाला; ज्ञानेश्वरी लेखन सप्तशताब्दी निमित्ताने १९९२ मध्ये कांचीकामकोटी पीठाच्या जगद्गुरू शंकराचार्यांकडून विद्वत् पुरस्कार देऊन गौरविले गेले. विद्यापीठ स्तरावर संदर्भग्रंथ म्हणून या ग्रंथाचा स्वीकार झाला. २००५ मध्ये द्वितीय आवृत्ती प्रसिद्ध.

पद्मगंधा प्रकाशनाने २०१० साली प्रसिद्ध केलेल्या 'अगस्त्य' ऋषींच्या कार्यावरील कादंबरीस महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांनी रामाचार्य अवधानी तत्त्वज्ञानविषयक लेखन पारितोषिक देऊन सत्कारित केले.

'अगस्त्य महात्म्य' ही अगस्त्य ऋषींविषयीची उपासना पोथी २००८ मध्ये प्रसिद्ध करून; पितृस्मरणार्थ, अगस्ति देवस्थान ट्रस्ट अकोले, अहमदनगर, यांना ट्रस्टच्या कायमस्वरूपी उत्पन्नसाधन म्हणून दहा हजार प्रतींसह प्रदान केली.

समग्र संत साहित्याचा लोकबंधात्मक अभ्यास घडावा यासाठी २०११ मध्ये एक चळवळ स्वरूपात 'अभंगपौर्णिमा' प्रकल्प, 'आनंदोत्सव' प्रतिष्ठानच्यावतीने राबवून, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी यांच्या माध्यमातून 'अभंगपौर्णिमा' या ग्रंथाचे प्रकाशन करविले. याही ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेने गौरविले. विद्यापीठ स्तरावर या ग्रंथाचे संदर्भग्रंथ म्हणून स्वागत झाले.

'लोकी अलौकिक तुकाराम' हा ग्रंथ, २०१२ मध्ये पुणे विद्यापीठाचे संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख व प्राध्यापक महामंडलेश्वर डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांनी प्रकाशित करून सन्मानित केले. ग्रंथ विद्यापीठ स्तरावर संदर्भग्रंथ म्हणून स्वीकृत आहे.

समर्थ त्र्यंबकराजस्वामी महाराज लिखित 'बालबोध' (बालावबोध) या संत एकनाथकालीन ग्रंथाचा 'समर्थ त्र्यंबकराजस्वामी महाराज ग्रामविकास ट्रस्ट, देवळाली प्रवरा', राहुरी, अहमदनगर, यांच्यावतीने 'सार्थ बालबोध' (भावानुवाद व टीपांसह) लेखन, संपादन २०१२-१३ घडले.

श्री शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर लिखित 'योगसंग्राम' या ग्रंथाचे श्री संत शेख महंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठानच्यावतीने 'सार्थ योगसंग्राम' (भावानुवाद व टीपांसह) लेखन संपादन २०१४ मध्ये घडले.

'नारद' पौराणिक कादंबरी पद्मगंधा प्रकाशन, पुणे,

'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' तत्त्वज्ञानपर ग्रंथ, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

अशा सर्व संत वाङ्मयविषयक सेवेबद्दल गुरुकुल भागवताश्रम, चिचोंडी पाटील यांचेवतीने २०१४ मध्ये जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

लोकसाहित्यविषयक कार्य मौलिक असून; समीक्षा, संशोधन, कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललित स्फुटलेखन, संपादित अशा स्वरूपातील चाळीसावर पुस्तके प्रसिद्ध आहेत.

---

*कैवल्य कृपा झाली । सच्चिदानंद दीपावली ।*
*झाले ऋषी वेदोपनिषद । एकाक्षराचे भांडार ।।*
*नारद कृष्ण गोरक्ष । अवघे उघडिले कवाड ।*
*सद्गुरूनाथे धरिला हाता । धर्मभूमी केले ओजा ।।*

*'संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।१।।*
*ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।२।।*
*नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें ते आवारा ।।३।।*
*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।४।।*
*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।५।।*
*बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरुपणा केले ओजा ।।६।।'*

---